# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १२

## सभावृत्तांत

दिनांक – २०.१.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१८ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.१.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१५) मा.गायकवाड निर्मला मनोज
१६) मा.सागर बाळासाहेब गवळी
१७) मा.गोफणे अनुराधा देविदास
१८) मा.बारसे प्रियांका प्रविण
१९) मा.अजित दामोदर गव्हाणे
२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
२१) मा.लांडगे सारिका संतोष
२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण
२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
२५) मा. अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
२८) मा.लांडे विक्रांत विलास
२९) मा.गीता सुशिल मंचरकर
३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले
३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर
३३) मा.मंगला अशोक कदम
३४) मा.तुषार रघुनाथ हिंगे
३५) मा.अश्विनी भिमा बोबडे
३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३७) मा.संजय बबन नेवाळे
३८) मा.एकनाथ रावसाहेब पवार
३९) मा.भालेकर प्रविण महादेव
४०) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४३) मा.घोलप कमल अनिल
४४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४५) मा.पवळे सुमनताई मधुकर
४६) मा.चिखले सचिन तुकाराम
४७) मा.यादव मीनल विशाल
४८) मा.वैशाली जालिंदर काळभोर
४९) मा.प्रमोद कुटे
५०) मा.राजू मिसाळ
५१) मा.बाबर शर्मिला राजू
५२) मा.अमित राजेंद्र गावडे
५३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
५४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
५५) मा.ढाके नामदेव जनार्दन
५६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५७) मा.करुणा शेखर चिंचवडे
५८) मा.चिंचवडे सचिन बाजीराव
५९) मा.भोईर सुरेश शिवाजी
६०) मा.अपर्णा निलेश डोके
६१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
६२) मा.कोमल दिपक मेवानी
६३) मा.शाम गणपतराव लांडे

६४) मा.सुजाता सुनिल पालांडे
६५) मा.योगेश मंगलसेन बहल
६६) मा.कदम निकीता अर्जुन
६७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
६८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६९) मा.नढे विनोद जयवंत
७०) मा.पाडाळे निता विलास
७१) मा.काळे उषा दिलीप
७२) मा.कोकणे संतोष अंकुश
७३) मा.पवार मनिषा प्रमोद
७४) मा.बारणे अर्चना तानाजी
७५) मा.अभिषेक गोविंद बारणे
७६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
७७) मा ॲड. भोसले सचिन सुरेश
७८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७९) मा.बारणे माया संतोष
८०) मा.निलेश हिरामण बारणे
८१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम
८२) मा.दर्शले रेखा राजेश
८३) मा.कलाटे राहुल तानाजी
८४) मा.कलाटे मयूर पांडुरंग
८५) मा.ममता विनायक गायकवाड
८६) मा.कामठे तुषार गजानन
८७) मा.चोंधे आरती सुरेश
८८) मा.कस्पटे संदिप अरुण
८९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
९०) मा.सविता बाळकृष्ण खुळे
९१) मा.सुनिता हेमंत तापकीर
९२) मा.चंद्रकांत बारकु नखाते
९३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९४) मा.कुटे निर्मला संजय
९५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे
९६) मा.मुंढे उषा अंकुश
९७) मा.कदम शशिकांत गणपत
९८) मा.लोखंडे चंदा राजू
९९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१००) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०१) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
१०२) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०३) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
१०४) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
१०५) मा.नवनाथ दत्तू जगताप
१०६) मा.संतोष बबन कांबळे
१०७) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
१०८) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
१०९) मा. वाबळे संजय मल्हारराव
११०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर
१११) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू
११२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.गावडे-सह आयुक्त, मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.कडूसकर,मा.खोराटे,मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.राऊत,मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.सवणे,मा.इंगळे,मा.ओंभासे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, ना. स. फरांदे-विधान परिषदेचे माजी सभापती व भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते यांचे यांचे निधन झाल्याने तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

तसेच आजची सभा सोमवार दिनांक ५/२/२०१८ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** आजची सभा सोमवार दि.५/२/२०१८ दु.२.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

**सभावृत्तांत**

(दि.२०/१/२०१८ (दु.२.००) ची तहकूब सभा)

दिनांक – ५.२.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१/२०१८ (माहे जानेवारी २०१८) दु.२.०० वा. ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.५.२.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज
१८) मा.सागर बाळासाहेब गवळी
१९) मा.बारसे प्रियांका प्रविण
२०) मा.अजित दामोदर गव्हाणे
२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
२२) मा.लांडगे सारिका संतोष
२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
२६) मा.फुगे भिमाबाई पोपट
२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
२८) मा.सावळे सिमा रविंद्र
२९) मा.लोंढे नम्रता योगेश
३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
३१) मा.लांडे विक्रांत विलास
३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले
३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर
३५) मा.अनुराधा गणपत गोरखे
३६) मा.केशव हनुमंत घोळवे
३७) मा.मंगला अशोक कदम
३८) मा.अश्विनी भिमा बोबडे
३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
४०) मा.संजय बबन नेवाळे
४१) मा.एकनाथ रावसाहेब पवार
४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४५) मा.घोलप कमल अनिल
४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४७) मा.पवळे सुमनताई मधुकर
४८) मा.चिखले सचिन तुकाराम
४९) मा.जावेद रमजान शेख
५०) मा.यादव मीनल विशाल
५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर
५२) मा.राजू मिसाळ
५३) मा.बाबर शर्मिला राजू
५४) मा.अमित राजेंद्र गावडे
५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
५६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश
५७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
५८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
५९) मा.ढाके नामदेव जनार्दन
६०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६३) मा.भोईर सुरेश शिवाजी
६४) मा.अपर्णा निलेश डोके
६५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
६६) मा.गावडे राजेंद्र तानाजी
६७) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
६८) मा.जयश्री वसंत गावडे
६९) मा.कोमल दिपक मेवानी
७०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
७१) मा.सुलक्षणा राजू धर
७२) मा.शाम गणपतराव लांडे
७३) मा.सुजाता सुनिल पालांडे
७४) मा.योगेश मंगलसेन बहल
७५) मा.कदम निकीता अर्जुन
७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
७७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
७९) मा.नढे विनोद जयवंत
८०) मा.पाडाळे निता विलास
८१) मा.काळे उषा दिलीप
८२) मा.कोकणे संतोष अंकुश
८३) मा.पवार मनिषा प्रमोद
८४) मा.बारणे अर्चना तानाजी
८५) मा.अभिषेक गोविंद बारणे
८६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
८७) मा.ॲड.भोसले सचिन सुरेश
८८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८९) मा.बारणे माया संतोष
९०) मा.निलेश हिरामण बारणे
९१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम
९२) मा.दर्शले रेखा राजेश
९३) मा.कलाटे राहुल तानाजी
९४) मा.कलाटे मयूर पांडुरंग
९५) मा.ममता विनायक गायकवाड
९६) मा.कामठे तुषार गजानन
९७) मा.चोंधे आरती सुरेश
९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर
१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते
१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०४) मा.कुटे निर्मला संजय
१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे
१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल
१०८) मा.मुंढे उषा अंकुश
१०९) मा.कदम शशिकांत गणपत
११०) मा.लोखंडे चंदा राजू
१११) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
११२) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
११४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
११८) मा.नवनाथ दत्तू जगताप
११९) मा.संतोष बबन कांबळे
१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन
१२१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
१२२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
१२३) मा. वाबळे संजय मल्हारराव
१२४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर
१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू
१२७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.गावडे-सह आयुक्त, मा.तुपे,मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.खोराटे,मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.राऊत,मा.झगडे-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.लडकत,मा.गायकवाड,मा.पाटील-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्र-९ दि.१६/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्र-१० दि. २०/११/२०१७ व दि.२८/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.शर्मिला बाबर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १३० विषय क्रमांक – १
दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/कॉश/कावि/१४१/२०१७, दि.२७/११/२०१७
२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ७९ दिनांक २२/१२/२०१७ नुसार
३) मा.स्थायी समितीकडील ठराव क्रमांक १८५५ दि.४/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे ह्‌द्यरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना मदत म्हणून महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या र.रू.२५,००,०००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या अनुदान रकमेतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.१८/१२/२००७ अन्वये या ट्रस्टला दरवर्षी २५ लाख एवढे अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे. तरी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस र.रु.२५ लाख अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.करुणा चिंचवडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उषा उर्फ माई ढोरे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, माझा या विषयाला ना नाही. तरीपण हे जे चॅरीटेबल ट्रस्ट आहे, हे ट्रस्ट नेमके कुठे आहे. या ट्रस्टचे अध्यक्ष कोण, सभासद कोण आहेत. आणि आत्ता वॉर्डमध्ये बरेचसे नगरसेवक इथे निवडून आलेले आहेत. आम्हाला सुद्धा माहित पाहिजे की, आमच्या वॉर्डमध्ये असे कार्यकर्ते लोक त्यांना अचानक काही त्रास होतो, किंवा जे रोगाने पछाडलेले लोक आहेत, अर्धपोटी, कमकुवत आहेत. या ट्रस्टची आम्हाला पूर्णपणे माहितीच नाही. यांना र.रु.२५ लाख द्यायला हरकत नाही. पण या ट्रस्टमध्ये कोण कोण आहेत याची आम्हाला माहिती मिळेल.

**मा.राहूल कलाटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, मला विनंती करायची आहे की, ३ वर्षांपूर्वी या सभागृहात मा.मोहिनीताई लांडे या महापौर असताना याची व्याप्ती वाढवायची असा ठराव झालेला आहे. परंतू गेले तीन/चार वर्षांपासून शासनाकडे हा ठराव पडून आहे. आत्ता या गोरगरीबांना आपण सहाय्य म्हणून पाच हजारांचा चेक देऊ शकतो. ही रक्कम दुप्पट वाढवलीतर गोरगरीबांना मदत होईल. तीन वर्षांपासून शासनाकडे जोठराव पडून आहे. तो ठराव मंजूर करुन आणला तर शहरातील गरजू, आजारी व्यक्तींना निश्चितच मदत करता येईल.

**मा.सचिन चिखले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आत्ताच मा.राहूल कलाटे यांनी सांगीतले की, तीन वर्षांपूर्वी याची व्याप्ती वाढवण्यासाठी सभागृहात ठराव झाला होता. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या विषयाला घेऊन आपल्या महापालिकेचे सर्व नगरसेवक आपल्या नागरीकांना तुमच्या मार्फत मदत करत असतात. खरेतर एवढे महागाईचे दिवस आहेत. या महागाईच्या दिवसांत ज्यावेळी एखादा नागरीक, एखादा गरीब नागरीक हॉस्पीटलमध्ये ऍडमिट होतो, त्यावेळी हॉस्पीटलचे खूप मोठे बील आल्यानंतर आमच्या सारखा नगरसेवक पाच हजारांचा चेक त्या नागरीकाला देतो. त्यावेळी आम्हाला सुद्धा या गोष्टीची लाज वाटते. खरेतर पाच हजारांत सलाईनची सुद्धा बाटली येत नाही. आपल्यामार्फत पाच हजारांचा चेक सर्व नागरीकांना देण्यात येतो. मी आपल्यापला नम्र विनंती करतो की, या रकमेची व्याप्ती वाढवून आपल्यामार्फत नागरीकांना ३० ते ५० हजार दिले जावेत. जेणेकरुन गोरगरीबांना एक आधार होईल. आपण पाहतोय की, मोठेमोठे बजेट, मोठेमोठे रस्ते, मोठमोठ्या शाळा, मोठमोठ्या इमारती, सगळ्या काही गोष्टी पाहतो. पण ज्यावेळी सर्वसामान्य नागरीकांना हॉस्पीटलमध्ये ऍडमिट असताना पैशांची कुणकुण लागते. त्यावेळी खरेतर नागरीकांकडे पैसे नसतात. भरपूर समस्याग्रस्त नागरीकांची अवस्था खूप बिकट आहे. वर्षानुवर्षे वायसीएममध्ये बघा. रोज हजारो नागरीक ऍडमिट होत आहेत. कारण त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, याची अमाऊंट वाढवलीतर तीन वर्षांपासून शासनाकडे हा प्रस्ताव पेंडींग असेलतर या प्रस्तावाची अंमलबजावणी कुठपर्यंत झाली आहे, त्यांनी नक्की काय पाठवले आहे ते सांगण्यात यावे, अशी मी नम्र विनंती करतो.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.कमल घोलप-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/शअ/तां/४/१७५/१७ दि.२९/१२/२०१७

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९२५ दि.१०/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकिय तसेच खाजगी संस्थेकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस परवानगी महापालिके मार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरून घेण्यात येतो. सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/ निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील मागणीः-</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील पायाभुत आराखडा अंतर्गत भुमिगत सेवा वाहिन्यांसाठी रस्ता खोदाईबाबत दि.२३/०१/२०१० रोजी मा.नामदार श्री. अजितदादा पवार, उर्जामंत्री तथा पालकमंत्री यांनी, कौन्सिल हॉल, पुणे येथे झालेल्या बैठकीत सुचित केलेनुसार व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी दि.१०/०२/२०१०, दि.१३/१२/२०१०, दि.६/११/२०११ व दि.२५/०३/२०११ कळविलेनुसार, त्यांच्याकडील पायाभुत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे आकारणी करुन रस्ता खोदाईस परवानगी

द्यावी व याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) जो निर्णय देईल त्याप्रमाणे उर्वरित रक्कम महावितरणाने भरणे बंधनकारक राहिल असे धोरण ठरलेले आहे. तथापि, अद्याप पर्यंत सदर बाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) यांचेकडून निर्णय प्राप्त नाही. त्यानुसार, मा. आयुक्त यांचेकडील दि.२०/०२/२०१०, दि.२३/१२/२०१० व १४/११/२०११ च्या मान्य प्रस्तावानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभूत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात आलेली आहे, व सदर वाहिन्यांसाठी खोदलेल्या चरांची दुरुस्ती मनपामार्फत करण्यात येते.म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी मा.आयुक्त यांच्याकडील दि.१०/०२/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार व आदेश क्र. स्थापत्य/शअ/तां/४/५९/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये र.रु.२३००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) याप्रमाणे सवलतीच्या दराने शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती. म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा- अंतर्गत देणेत आलेल्या मागील ३ वर्षाचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | परवानगी देणेत आलेल्या रस्ता खोदाईची लांबी कि.मी. मध्ये | मनपा कोषागारात जमा र.रु. (लाखात) | दर प्रती रनिंग मीटर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ७९.४२ | १८२६.६६ | २३००/- |
| २ | २०१६-१७ | १.१५२ | २६.५० | २३००/- |
| ३ | २०१७-१८ | ०.१ | २.३० | २३००/- |

पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.पथ/५२८१ दि.२२/११/२०१७ नुसार मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेनुसार मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांची फेरप्रस्तावास मान्यता मिळेल या भरवशावर महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस पुणे महानगरपालिका ट्रेंचिंग गाईड लाईन नुसार पुणे महानगरपालिकेकडे दाखल असलेले तसेच भविष्यातील खोदाई प्रस्तावास ओपन ट्रेंचिंग पध्दतीने र.रु.२,३५०/- प्रती रनींग मीटर दर आकारुन मान्यता देणेत येत असलेबाबत म.रा.वि.वि.कं.मर्या.यांना कळविण्यात आलेले आहे. मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/ काअ(प्र)००४४९०,दि.१६/११/२०१७ व क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/ काअ(प्र) ००४५८५, दि.२४/११/२०१७ च्या पत्रांन्वये म.रा.वि.वि.कं.मर्या., यांनी महापालिका हद्दीमध्ये यांच्याकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS)), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning & Development Committee (DPDC)), व इतर योजने अंतर्गत भुमिगत केबल टाकण्याकरीता व दुरुस्तीसाठी

रस्ता खोदाई करण्यास र.रु.२,३५०/- प्रती रनिंग मीटर या दराप्रमाणे शुल्क आकारुन परवानगी देणेबाबत मागणी केलेली आहे. सदर मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र) ००४५८५, दि.२४/११/२०१७ मध्ये नमुद केलेनुसार म.रा.वि.वि.कं.मर्या., यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने ७०.१६ किमी. उच्चदाब वाहिनी व २८.३५ किमी. लघुदाब वाहिनी व इतर कामे प्रस्तावित असल्याचे कळविले आहे. सदर कामांची एकूण लांबी ९८.५१ किमी. येत आहे. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि.१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार “महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य करारनामा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत” कळविले आहे. सदर सामंजस्य करारनाम्याची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सदर सामंजस्य करारनाम्यातील ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

Ø महानगरपालिका व महावितरण या दोन्ही संस्था नागरीकांसाठी पायाभूत सुविधा पुरविणा-या संस्था आहेत.

Ø विज वाहिन्या टाकण्याबाबत महानगरपालिका व महावितरण यांच्या जबाबदा-या सामंजस्य करारनाम्यातील मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद सविस्तररित्या नमुद केलेले आहे.

Ø दोन्ही संस्था विज वाहिन्या टाकण्यासाठीच्या कामांसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) यांची नेमणूक करेल.

Ø महानगरपालिके मार्फत स्थापत्य विभागाचे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता विज वाहिन्या टाकणे बाबतच्या कामांसाठीच्या कार्यवाहीसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) असतील.

Ø महावितरण यांनी नोडल ऑफिसर यांचेकडे सविस्तर अर्ज सादर केल्यानंतर दोन्ही संस्थांच्या अधिका-यांसमवेत एकत्रित सर्वेक्षण करुन झाल्यानंतर प्रकरण मा.शहर अभियंता यांचेमार्फत मा. आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर केले जातील.

Ø मा.आयुक्त यांच्या मान्यतेनंतर महावितरण यांचेकडून र.रु. १००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे देखरेख शुल्क (सुपरविजन चार्जेस) प्रथमत:मनपा कोषागारात भरुन घेणेत येतील व तदनंतर महावितरण यांना भुमिगत विज वाहिनी टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी देणेत येईल.

Ø सदर खोदलेले रस्त्यातील चर महावितरण यांनी महापालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेद प्रमाणे नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी महापालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाच्या अभियंतांचे देखरेखीखाली तातडीने दुरुस्त करुन पूर्ववत करावयाचे आहे.

Ø सदर चर दुरुस्तीनंतर महावितरण यांनी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे नोडल ऑफिसर यांचेकडून रस्त्यातील खोदलेला चर महानगरपालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेदाप्रमाणे तातडीने दुरुस्त केलेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे.

Ø सदर कामासाठीचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) वरील प्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्राच्या दिनांकापासून दोन (२) वर्षांचा असेल.

Ø सदर दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) मध्ये महावितरण यांनी तातडीने दुरुस्त केलेले चर सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महावितरण यांची राहील.

Ø जर महावितरण यांनी खोदलेला चर तातडीने दुरुस्त करुन रस्ता पुर्ववत करण्यास वा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) मध्ये सदरचा दुरुस्त केलेला चर सुस्थितीत ठेवण्यास असमर्थ ठरल्यास नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी सदरचे चर महानगरपालिकेला दुरुस्त करुन पूर्ववत करावयास लागल्यास त्यासाठी महानगरपालिकेस आलेला खर्च महावितरण कडून महापालिका विज पुरवठ्याबाबत घेत असलेल्या सुविधाबाबतचे विज बिलातून वजा करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि. १८ मार्च २०१६ नुसार महावितरण व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार महावितरणकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्याबाबतची कार्यवाही करणेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. महापालिका सभेला आहे. तरी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.यांना त्यांचेकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning & Development Committee (DPDC), व इतर योजने अंतर्गत भुमिगत सेवा वाहिनी टाकण्याकरीता व सेवा वाहिनी दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास महावितरण व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार परवानगी देणेबाबतची कार्यवाही करणेबाबतचे धोरणात्मक निर्णयासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.चंदा लोखंडे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

१) महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग कंपनी मर्या. यांचे मार्फत येणा-या अर्जास हे दर लागु राहतील.

२) महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग कंपनी मर्या. यांचे कडुन विद्युत कनेक्शन मिळणेसाठी अर्ज करणा-या खाजगी संस्था व इतर कंपण्यांना मनपाने ठरविलेले रस्ता दुरुस्तीचे दर लागू राहतील.

३) रस्त्यामध्ये चर घेवुन रस्ता दुरुस्ती करणे या कामाला कामाचा आदेश देताना त्यामध्ये कामाची मुदत देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,खरेतर या विषयाकडे गांभिर्याने पाहणे गरजेचे आहे. समाजामध्ये जसे भूमाफिया असतात, वाळू माफिया असतात तसे केबले माफिया म्हणून इथे कार्यरत आहेत. मी यासंदर्भात महापालिका सभागृहात यापूर्वी देखील प्रश्न उपस्थित केला होता. त्याची पूर्ण कागदपत्रे इथे उपलब्ध आहेत. अशा अनेक कंपन्या आहेत, ५ कि.मी. ची परवानगी घेतली, पैसे सादर करतात. २५ कि.मी. चे काम संगनमताने सुरु आहे. सुरु आहे अशा शब्दप्रयोग मी करतोय. हे सर्व करत असताना मागील काही कालखंडात एमएसईबी लाईन अडथळा आवश्यक बाब म्हणून आपण अनेक टेंडर केलेले आहेत. एमएसईबी यांची अशी अवस्था आहे की त्यांच्याकडे पगारासाठी पैसे नाहीत. हस्तांतरीत केल्यानंतर या सगळ्या घटना घडत असताना प्रभागनिहाय त्याची वर्गवारी करणे अत्यंत गरजेचे आहे. याठिकाणी याची चौकशी प्रमुख्याने देणे अत्यंत गरजेचे आहे. याठिकाणी पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण रिलायन्स सारख्या काही कंपन्या आहेत, त्यांची याठिकाणी काही मंडळी ठरलेली आहेत. कोणत्या परिसरात किती केबल टाकायची याची देखील हे सर्व करत असताना याची देखील चौकशी करावी, जेणेकरुन महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही अशी विनंती आहे.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, खरेतर २०१७ मध्ये आजपर्यंत किती परवानग्या दिल्या हे सुद्धा पाहणे गरजेचे आहे. आपण महापालिकेच्या माध्यमातून सल्लागार नेमतो. रस्ते खोदायला परवानगी द्यायची गरज का पडते. आपण जर सल्लागार दिलीतर कमीत कमी पाच वर्षे कोणताही रस्ता खोदता कामा नये. आपण सल्लागाराला पैसे देतोय. असा रस्ता खोदायला परवानगी देऊन महापालिकेतील नागरीकांचा कररुपी पैसा विनाकारण जातो आहे. खरेतर महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी महापालिकेने स्वतः डक्ट टाकले पाहीजे. यातून जे कायमस्वरुपी महसूल उपलब्ध होईल हे पाहिले पाहीजे. त्यामुळे महापालिकेला दर महिना महसूल चालू होईल. अश्या परवानग्या देत राहीलो तर आत्ताच मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, ५ मी.साठी परवानगी घेतात, २५ मी. पर्यंत खोदले जाते. परवानगी मागितल्यावर आपले अधिकारी त्यात

टाकतात. परवानगी एका बाजूची दाखवायची, खोदकाम दुस-या बाजूने करायचे. मी तर म्हणतो, एअरटेल असेल, रिलायन्स असेल, व्होडाफोन असेल, आयडीया असेल यांच्या दिलेल्या परवानग्या रद्द करुन महापालिकेने स्वतःचे डक्ट टाकले पाहीजेत. त्यांच्याकडून आपला महसूल उपलब्ध करुन घेतला पाहिजे. ही माझी उपसूचना आहे की, आजपर्यंत दिलेल्या सर्व परवानग्या रद्द कराव्यात व महापालिकेमार्फत डक्ट टाकावेत.

**मा.निलेश बारणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता मा.भाऊसाहेब भोईर यांनी रिलायन्स बद्दल, मा.विठ्ठल काटे यांनी व्होडाफोन बद्दल, यासंदर्भात सगळे चर्चा करतात. मी महापौर साहेबांना आणि आयुक्त साहेबांना देखील मागील टर्ममध्ये या कंपन्यांबद्दल सांगितले होते. आज सगळे ओरडतात. आत्ता रिलायन्सचे कामकाज चालू झालेले आहे. विक्रम टेलिकॉम अशी कंपनी आहे. त्यावर पूर्ण हिंजवडी चालते. त्यांनी महापालिकेची एकही परवानगी घेतलेली नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही माहिती अधिकारात पत्र मागवले तर नाही म्हटले तरी त्याला महिना अखेरीस शंभर ते सव्वाशे कोटी उत्पन्न मिळते. हिंजवडीला जाणा-या सगळ्या लाईन, भोसरीपासून, खडकीपासून सगळ्या लाईन हिंजवडीला जात आहेत. पिंपळे सौदागर इथे असे काही लोक आहेत, स्वतःच्या प्रायव्हेट लाईन्स विकायला चालले आहेत. आपण याचा सर्वे करणार आहात का. नाही म्हटलेतरी रिलायन्स, व्होडाफोन या कंपन्यांनी जो भ्रष्टाचार केलेला आहे. गणित सांगायला गेलोतर पाचशे/सहाशे कोटींचा भ्रष्टाचार होईल. एक संस्था नेमा. महापालिकेत किती भूमिगत वायरी झाल्या आहेत आपण याचा खुलासा केला पाहीजे. मा.महापौर साहेब, आपण चौकशीचे आदेश द्यावेत. आपला कायदा विभाग असेल, पोमण साहेब असतील. सर्वांना माहित आहे, या महापालिकेत काय चालले आहे. कोण पैसे घेतोय. हा माझा तुमच्या सगळ्यांवर आरोप आहे. सगळे पैसे घेत आहेत. सगळेजण यात पैसे घेत आहेत. खोदायला ५ कि.मी.ची परवानगी घेतात आणि १००/१०० कि.मी.ची लाईन खोदत आहेत. मा.महापौर साहेब, एक पूर्ण लाईन टाकल्या आहेत. पोमण साहेब, संगणक विभागात काम करतात. किती वायरी टाकल्या आहेत, सगळया लाईनचं मोजमाप केलतर किती वायरी गेल्या आहेत ते कळेल. हा भ्रष्टाचार निघालातर महापालिकेला पाचशे कोटींचे उत्पन्न नक्कीच होईल. हे सांगतो. जयहिंद

**मा.प्रियांका बारसे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सर्वजण घेतात म्हणजे कोण घेतात.

**मा.महापौर-**ताई,तुम्ही बसा. त्यांना बोलू द्यात. तुम्हाला बोलायला देतो. तुम्ही हात वर करा.

**मा.प्रियांका बारसे**-मा.महापौर साहेब, नाही कळू देत ना. इथे सर्वजण घेतात म्हणजे त्यात मी पण येते ना.

**मा.निलेश बारणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ताई, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर असो, विक्रम टेलिकॉम असो, व्होडाफोन असो, आज या कंपन्या काम करत

असताना परमिशन घेण्यासाठी जेव्हा महापालिकेत आल्या, तेव्हा कळाले की ते असे काम करतात. विक्रम टेलिकॉम यांच्याकडे एक मीटरची पण परमिशन नाही. परंतू आज पूर्ण हिंजवडी आय.टी. पार्क त्यांच्याकडून चालवले जाते. याचा खुलासा झाला पाहीजे. आपले भूखंड. आपण भाडे भरतोय. यांनी फुकट लाईन करायची का. कोणतेही काम करायला गेलोतर ते आडवे येतात. त्यांना परमिशन आहे असे सांगितले जाते. मी पालिकेला विनंती करतो की, आपण ज्या भूमिगत लाईन झाल्या आहेत, त्याचे एक यंत्र येते. त्यातून कळते, किती पोल वाढले आहेत, किती लाईन कोणाच्या आहेत, महापालिकेकडून किती वायरची परवानग्या घेतल्या आहेत, परमिशन नसेलतर त्या वायर कट कराव्यात. महापालिकेचे उत्पन्न पाचशे कोंटीनी वाढल्याशिवाय राहणार नाही, याची ग्वाही देतो.

**मा.अजित गव्हाणे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, याठिकाणी हा विषय आपल्यासमोर आल्यानंतर मा.भाऊसाहेब भोईर यांनी जो मुद्दा मांडला. मागील काळात यात एमएसईबीला वेगळ्या प्रकारीच सूट देण्याचे धोरण, जसे पुणे महापालिकेत वेगळे धोरण आहे. एमएसईबी हे शासनाचेच एक अंग असल्यामुळे यांच्यासाठी वेगळे धोरण व खाजगी कंपन्यांसाठी वेगळे धोरण करण्याचे निश्चित झाले. परंतू अनेक वर्षांपासून या शहरात खाजगी कंपन्या अंडरग्राऊंड केबल्स टाकत आहेत. स्थानिक लोकांना हाताशी धरुन मोठ्या प्रमाणात लाईन टाकल्या जात आहेत. याठिकाणी माझ्या सहकारी नगरसेवकांनी उत्पन्नाच्या दृष्टिकोणातून या विषयाकडे पहावे अशी सूचना केलेली आहे. आज महापालिकेचे उत्पन्न दिवसेंदिवस वेगवेगळ्या पद्धतीने कमी होत चालले आहे. आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे की, भविष्यकाळात उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टिकोणातून या विषयाकडे पाहिले पाहिजे. जेणेकरुन यातून महापालिकेला वेगळ्या प्रकारचे उत्पन्न चालू होऊ शकते. आज काळ बदलतोय आणि बदलत्या काळाप्रमाणे इंटरनेट सुविधा या घरोघर पोहचल्या आहेत. व्यावसायिक दृष्टिकोण ठेवून आज व्यवसाय करत आहेत. हा व्यवसाय करत असताना महापालिकेचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान या कंपन्यांनी आजपर्यंत केलेले आहे. संपूर्ण शहरात अशा किती प्रकारच्या परवानग्या दिल्या आहेत. प्रत्यक्षात किती परवानग्या दिल्या आहेत. प्रत्यक्षात किती केबल टाकल्या आहेत, याचे सुद्धा सर्वेक्षण होण्याची गरज आहे. आपल्या इथल्या जे.ई.पासून सिटी इंजिनिअरपर्यंत सगळ्यांना माहित आहे की, कुठे-कुठे विनापरवाना केबल टाकल्या आहेत. अधिका-यांमध्ये धाडस नाही. जेव्हा काम केले जाते आणि अनेक नगरसेवकांनी जेव्हा-जेव्हा सूचना केल्या आहेत की, अशा प्रकारचे बेकायदेशीर काम चालले आहे. परंतू अधिका-यांमध्ये ते धाडस नाही. ते संबंधित कंपन्यांवर अशा प्रकारची कारवाई करु शकत नाहीत. कारण त्यांच्यावर दडपण आहे. आणि अशा पद्धतीने शहरात खूप मोठ्या प्रमाणात हे जाळे पसरलेले आहे. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आपण यात लक्ष घालावे. किमान इथून मागे झालेल्या गोष्टींचे सर्वेक्षण करावे. इथून पुढील काळात जी काही कामे होतील ती शंभर टक्के मंजूरी घेऊनच व्हावीत. मा.आयुक्त साहेब, अनेक ठिकाणी अशी परिस्थिती होती की, दोन महिन्यांपूर्वी डांबरीकरण झाले आहे, आणि दोन महिन्यांत लगेच खोदाई झाली आणि खोदाई केल्यानंतर महिना, दोन तीन महीने तिथे कुठल्याही प्रकारचे काम होऊ शकलेले नाही. कारण अधिका-यांचेच म्हणणे होते की, याची परवानगी घेतली गेलेली नाही. परवानगी घेतली गेली

नसल्यामुळे आणि महापालिकेने त्याचे टेंडर काढले नसल्यामुळे त्याठिकाणी रिपेअरींग झाले नाही. लोकांना नागरीकांना अनेक दिवस मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला आहे. म्हणून मा.महापौर साहेब, आपण याकडे गांभिर्याने पाहून याची चौकशी करावी. प्रत्यक्षात किती काम झाले याची तपासणी करुन संबंधित कंपन्यांवर कारवाई केली पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त करतो. व यात लक्ष घालावे अशी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,आज मूळ विषय सभागृहासमोर ठेवलेला आहे. यात तुम्ही सरकारी कंपनी यांना कमी दरात परवानगी द्यायची. त्यांच्याकडून पैसे येतील ते भविष्यात जी बिले येतील त्यातून ते पैसे डिडक्ट करायचे. असे न करता अधिका-यांनी याची क्लॅरीटी पण करावी. नक्की हा विषय कशासाठी ठेवलेला आहे. कमी दरांत द्या काही म्हणणे नाही. परंतू त्यांचे पैसे डिडक्ट करायचे का. एमएसईबी यांनी ठराव दिला. भविष्यात बील दिलेतरी त्यातून पैसे डिडक्ट होणार. पूर्वी ज्याप्रमाणे सुरुवातीलाच पैसे भरुन घेत होतो. यात निश्चितच महापालिकेचा फायदा होत होता. माझ्या भागात एमएनजीएल यांची खोदाई झाली आहे. त्यांनी अजून पैसे भरलेले नाहीत. मला वाटत नाही. अजून पैसे भरलेले नाहीत. सभागृहाला व्यवस्थित कळू देत, यात नक्की महापालिकेचा फायदा काय आहे.

**मा.निता पाडाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,मला इथे एवढेच बोलायचे आहे की, काळेवाडीत गेल्या वर्षी रोड खोदला आहे. महापालिकेने परवानगी दिलेली आहे. परंतू अजूनही तो रोड झालेला नाही. काढलेले ब्लॉक तसेच पडलेले आहेत. एक वर्षापूर्वी जिओवाल्यांनी रिलायन्सवाल्यांनी तो रोड खोदला असेलतरी प्रशासनाने तो रोड पूर्ववत का केला नाही. त्यावेळी म्हणाले पैसे भरलेले आहेत. मग का केला नाही याचे उत्तर द्या. ज्यावेळी प्रत्येक वॉर्डात खोदतो. जे पैसे भरतात, त्याचे टेंडर त्याच वॉर्डमध्ये काढावे, हिच माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, खरेतर हा विषय राज्य शासनाकडून आलेला आहे. नागपूर महापालिकेने जशी नियमावली केली आहे, त्याची उपसूचना म्हणून फक्त यातून एमएसईबी वगळावे असे त्यांचे मत आहे. सभागृहाने असा निर्णय घेतला आहे. फक्त एमएसईबी यांना प्रायव्हेट मधून वगळावे म्हणजे महापालिकेचा निश्चित फायदा होईल. खरेतर आजच्या काळाची गरज आहे. ज्या काही कंपन्या, जिओ, एअरटेल, आयडीया, व्होडाफोन अशा अनेक संस्था यात आहेत. यात काही प्रायव्हेट संस्था सुद्धा आहेत. पिंपळे सौदागर, रहाटणी, वाकड हा नव्याने विकसित भाग आहे. इथे आय.टी. वर्ग जास्त असल्यामुळे त्यांना या रोडची गरज लागत असते. माझे असे दुमत नाही की, रस्ता खोदाई होते. यात भ्रष्टाचार होतो आहे. तो महापालिकेचा प्रशासनाचा पार्ट आहे. स्थापत्य विभाग प्रत्येक वेळी जो कन्सल्टंट नेमतो. स्थापत्य विभागाकडून १९८६ पासून २०१८ सालापर्यंत प्रत्येक वेळी त्यांच्यावर कन्सल्टंट नेमतो. माझ्या माहितीप्रमाणे स्थापत्य विभागाचे इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट करताना याकडे लक्ष देत नाही. वारंवार सूचना देऊनही प्रत्येक वेळी

बजेट करतो. १८ मी., २० मी. रस्ता करतो, यासाठी कन्सल्टंट नेमतो. त्यावर खूप खर्च करतो. यातून स्टॉर्म वॉटर आहे. ड्रेनेज सिस्टीम आहे. फक्त डक्टेसाठी यात अशा कुठल्या सूचना केलेल्या नाहीत. असे का करतो. म्हणून माझी सभागृहाला, महापौर साहेबांना विनंती आहे की, आपण स्थापत्य विभागाला आदेश द्या. तुमच्या भागात इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट जास्त आहे. तिथे डक्ट करावेत. जेणेकरुन प्रत्येकवेळी महापालिकेचा जो पैसा वाया जातो. आपण यांच्याकडून पैसे जमा करतो. परंतू रस्त्याची जी क्वालिटी असायला पाहीजे तशी मिळत नाही. आपण स्थापत्य विभागाला आदेश द्यावेत की, कन्सल्टंट यांनी नवीन येणा-या रस्त्यांवर इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट करताना डक्टचा त्यात समावेश करावा. महापालिकेत येणारा पैसा इथे लावता येईल. त्यातून महापालिकेला चांगले उत्पन्न मिळेल.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, आज खरेतर रिलायन्स कंपनी, व्होडाफोन कंपनी, अन्य केबल संस्थांचा विषय आपल्यासमोर आला आहे. हा विषय कोणाला डोळ्यासमोर ठेवून आणला हे लक्षात आले नाही. या सभागृहात अनेक वेळा विषय आला होता. या विषयाची चर्चा सुद्धा केली आहे. नवीन ग्रामिण भागात जसे आत्ता मा.शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, नवीन भागात रस्ते विकसित होत आहेत. त्यात महापालिकेने डक्ट टाकलेतरी नक्की आत्ता ज्या केबल संस्था आहेत. इथे आष्टिकर साहेब आहेत. यांना आयुक्त म्हणून बसवले आहे. पण आम्ही इथे ओरडणार, नक्की हे इथून आयुक्तांपर्यंत पोहचवणार आहात का माहित नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, मा.निलेश बारणे यांनी सर्व संस्थांना चौकशी करायला सांगितले होते. यापूर्वी आपल्या भागात या कंपन्यांनी किती लाईन्स खोदलेल्या आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेत अशा किती संस्थांच्या लाईन्स आपल्याकडून गेलेल्या आहेत. किती लोकांनी त्याचे पर्चेसिंग घेतले आहे. किती लोकांनी त्याचे पास भरलेले आहेत. किती लोकांना वसूलीची नोटीस दिली आहे. किंवा वसूलीसाठी तगादा लावला आहे का नाही, याची माहिती सभागृहाला दिलीतर बरे होईल. किती लोकांनी पैसे बुडवलेले आहेत याची माहिती सभागृहाला द्यावी. जसे सदस्यांनी सांगितले होते. जर मला ५ कि.मी. १० कि.मी.ची लाईन न्यायची असेलतर १ कि.मी.ची परमिशन घेतो. आपला कुठलाही अधिकारी त्या लाईनवर कधी गेला आहे का. त्याने या लाईनचा सर्वे केला आहे का. १ कि.मी. ची परमिशन घेतली आणि १० कि.मी. खोदले, असे अधिका-यांनी सांगितले आहे का. याच्यावर आपण काही कारवाई केली किंवा केली नाही असे कुठल्याही अधिका-यांनी सांगितले का नाही, याचा सुद्धा आपण खुलासा करावा. मा.महापौर साहेब, मला विषय सोडून बोलायचे आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेत गेल्या २० फेब्रुवारीला आम्हाला महापालिकेत निवडून येऊन एक वर्ष होणार आहे. फेब्रुवारीत निवडणूक झाली. वर्ष व्हायला आले आहे. मला एवढा आनंद झाला होता. मी सगळ्या पेपरच्या बातम्या घेऊन आलो आहे. आत्तापर्यंत ग्रामीण भागात एक रुपयासुद्धा खर्च झाला नाही. राष्ट्रवादीच्या काळात एकही रुपया खर्च झाला नाही. आणि आम्ही आता इतका धो-धो पैसा टाकला आहे. जशी पिंपरी चिंचवड महापालिका आहे. पूर्वीची गावे तशी आत्ता आमच्या गावांत लगेच डेव्हलपमेंट होणार आहे. जसे ४२५ कोटी गावावर टाकले असे कळाले. सगळ्या गावांत पॅनल लागले. आनंदोत्सव साजरा झाला. विषयांतर अजिबात होत नाही. रस्त्याचा विषय आहे.

**मा.महापौर** – बाकीच्यांनी शांत बसा. मा.दत्तात्रय साने तुम्ही बोला.

**मा.दत्तात्रय साने**-ग्रामिण भागातील सर्व नगरसेवकांना जर अज्ञान असेल तर मी त्यांना सज्ञान करतोय. मला असे कळाले आहे की, रु.४२५ कोटींच्या निविदा काढल्या आहेत. अभय योजनेतून निविदा काढल्या आहेत. त्यात रस्ता विकसित करण्यासाठी घेतले आहेत. त्या रस्त्यांची माहिती घेतला असता, अनेक रस्ते आपल्या ताब्यातच नाहीत. मला अधिका-यांना नियम सांगायचा आहे किंवा त्यांनी हा नियम सांगितला आहे की, ८० टक्के रस्ता जोपर्यंत ताब्यात येत नाही, तोपर्यंत कसलीही निविदा, काहीही करता येत नाही. असे असताना ग्रामिण भागातले अनेक रस्ते ताब्यात नसताना, कुठलाही रस्ता ताब्यात न घेता मग याठिकाणी पैसा टाकायचे कारण नक्की काय याचे अधिका-यांनी उत्तर द्यावे. प्रभागासहीत सांगेन, कुठले कुठले रस्ते किती किती ताब्यात आहेत, हे मी सांगेन.

**मा.महापौर** – हा विषय नाही. विषयांतर करु नका. सगळी माहिती घेतल्यानंतर तो तो विषय आल्यानंतर बोला. त्या त्या संबंधित विषयावर बोला. आत्ता हा विषय वेगळा आहे. तुम्ही फक्त चर्चा करा.

**मा.दत्तात्रय साने**- मा.महापौर साहेब, मी चर्चाच करतोय. तुम्ही टेन्शन घेऊ नका. मी वेगळं काही करणार नाही.

**मा.महापौर** – आम्ही कशाला टेन्शन घेतोय. टेन्शन तुम्हाला आले आहे. एवढी कामं व्हायची आहेत.

**मा.दत्तात्रय साने**- आनंद आहे. एवढी कामे होणार आहेत. म्हणून तर सांगतोय आम्ही.

**मा.महापौर**-हे बघा काका हा विषय नाही. दुसरा विषय आहे. या विषयासंबंधीत फक्त थोडक्यात बोला.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब, जो काही भ्रष्टाचार झाला आहे, तो उघडकीस आणायचा मी प्रयत्न करतोय.

**मा.महापौर**- आपण या विषयासंबंधात फक्त बोला. हा विषय इथे घेण्यासारखा नाही. तो विषय या विषयाला धरुन नाही. बजेटला येईल तेव्हा बोला.

**मा.दत्तात्रय साने**-मा.पक्षनेते आम्हाला एवढेच सांगायचे आहे, ज्या रु.४२५ कोटींच्या निविदा काढल्या आहेत, त्यामध्ये कोणाला वाईट वाटो अगर न वाटो, यात जी घटना घडली आहे. माझ्या स्वतःच्या प्रभागातला, चिखली रोड, साने चौकातून जाणारा चिखली रोड, तो एक टक्का सुद्धा ताब्यात नाही.

**मा.महापौर**- तुम्ही ताब्यात घेण्याचा प्रयत्न करा.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब, माझी पत्रे आहेत. ताबा घेण्यासाठी मी नगररचना सहीत सगळ्यांना शंभर वेळा पत्रे दिलेली आहेत.

**मा.महापौर** – काका, तुम्ही विषयांतर करु नका. तुम्ही असं म्हणताय. आमच्या भागातले टेंडर झाले. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर सरळ लिहिलेले आहे की, जोपर्यंत जागा ताब्यात येत नाहीत, तोपर्यंत याची वर्कऑर्डर देऊ नये. आणि तुम्हाला माहित नसेलतर तर सांगतो. च-होलीतले जे सातीच्या-साती रस्ते आहेत, त्यांचे ९० टक्के ताबे झाले आहेत. आमचा एकच रस्ता राहिलेला आहे. तो सुद्धा शेतक-यांनी आगाऊ ताबा दिला आहे. कारण त्यांना समजले आहे की, जागेचा ताबा दिलातर नक्की रस्ता होईल आणि समाविष्ट गावाचा विकास होईल. तुम्ही पॉझिटीव्ह विचार करा. तुम्ही समाविष्ट गावांतील नगरसेवक आहात. हा तो विषय नाही. तुम्ही दुस-या विषयावर बोला.

**मा.दत्तात्रय साने**-मा.महापौर साहेब, आपण ग्रामिण भागाचे महापौर आहात. म्हणून मी आपले पहिले अभिनंदन केले आहे. आम्हाला आपला अभिमान आहे. मला एकच सांगायचे आहे की, जी काढलेली कामे आहेत. आपल्यासमोर ४२५ कोटींची कामे दिसत आहेत. ग्रामीण भागासाठी खर्च होत असेलतर मी सगळ्या भागातून तुमचे अभिनंदन करतोय. परंतू ही वस्तुस्थिती दाखवलेली एक आहे आणि घडलेली एक आहे. म्हणून तो विषय तुमच्या कानावर घालतोय. जे घडलयं आणि दाखवलयं, यात खूप मोठा घोळ झालेला आहे. आम्ही पत्रकारांना सांगू काय सांगायचे ते. जसे मा.निलेश बारणे यांनी रिलायन्स संदर्भात आपल्याला सांगितले आहे. ज्यांनी कोणी पैसे भरलेले नसतील, विक्रम टेलिकॉम यांचं सगळ्यांत मोठं जाळ आपल्याकडे पसरलेले आहे. त्या माध्यमातून आपण याची चौकशी करणार आहोत का नाही.

**मा.कुंदन गायकवाड**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आमच्या समाविष्ट गावांना न्याय दिल्याबद्दल, प्रथमतः मी महापौर साहेबांचे, चेअरमन मॅडम यांचे, स्थायी समितीचे धन्यवाद करतो.

**मा.महापौर** – थोडक्यात बोला.

**मा.कुंदन गायकवाड**-मा.महापौर साहेब, साने चौक ते चिखली रोड का घेतला नाही. काही लोकांची घरे जात होती. म्हणून दिला नाही. महानगरपालिकेचे काही लोक नगरसेवक होते म्हणून रस्ता करता आला नाही.

**मा.महापौर** – या विषयाची चर्चा नंतर करु.

**मा.कुंदन गायकवाड**-मा.महापौर साहेब, जेवढा रस्ता ताब्यात आहे, तेवढ्याच रस्त्याचे टेंडर काढले आहे.

**मा.महापौर** – या विषयाला धरुन चर्चा करा. मा.चव्हाण साहेब आपण खुलासा करावा. या विषयावर वेगळी जी.बी. घेऊ.

**मा.चव्हाण (शहर अभियंता)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, एम.एस.ई.बी. यांच्याबरोबर प्रति मीटर शंभर रुपये इतकी कॉस्ट घेऊन रिइन्सटेट करण्याची जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकली आहे. त्यांनी व्यवस्थित काम केले नाहीतर आपण ते करणार आहोत. त्याचे पैसे आपण आपल्या त्यांच्या इलेक्ट्रीसिटी बिलातून वळते करुन घेणार आहोत.

**मा.राहूल कलाटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, मा.चव्हाण साहेब तुम्ही इलेक्ट्रीसिटी बिलाचे उत्तर अर्धवट दिले. आम्ही प्रस्ताव वाचला आहे. तुम्हाला व्हिजिबल कसे आहे. तुम्ही अगोदर पैसे भरुन घेत होता.

**मा.चव्हाण (शहर अभियंता) -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, एमएसईबी यांच्यावर रिइन्सटेट करण्याची जबाबदारी दिली आहे. त्यानंतर आपण करणार आहोत.

**मा.राहूल कलाटे**- त्यांनी उशीर केला किंवा केलं नाहीतर. तुम्ही ठरवा ना. आणि मला सांगा तुम्ही एवढे डि.पी. डेव्हलप करताय.

**मा.महापौर-**मा.कलाटे साहेब, चर्चा करु नका, तुम्ही फक्त सांगा. अशी चर्चा करायला लागलेतर सभा दिवसभर चालेल.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, खरेतर मघाशी मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे. महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाला आपण परवानगी देत असू, शासनाचे जरी परिपत्रक आहे. या विषयाला विरोध आहे अशातला भाग नाही. परंतू या विषयाच्या अनुषंगाने महापालिकेची जी चोरी होते, जी लूट होते आणि लयलूट होते. कितीतरी लोकांचे हात यात माखलेले आहेत. अनेक भ्रष्टाचारी अधिकारी यात आहेत. हे सर्वांना ज्ञात असते. त्या त्या भागातले जे.ई. असतील, डेप्युटी असतील, एक्झिक्युटीव्ह असतील, त्यांचा प्रभाग अधिकारी असेल त्यांना सर्वांना माहित असते, आपण कितीची परवानगी दिली आहे, आणि किती रस्ता खोदला जातो. रातोरात खोदतात आणि बुजवतात. आणि लोकांना त्रास होतो. नगरसेवकांना माहित सुद्धा नसते, कोणाला परवानगी दिली आहे. यात त्यांनी सांगितले तो शब्द अगदी बरोबर आहे. काही माफिया, काही गँगस्टर ठरलेले आहेत. यांचा फोन जातो. त्या नगरसेवकाला फोन जातो की, माझा माणूस आहे, यांना काम करु देत. हे सर्व करत असताना आपले अधिकारी गप्प का बसतात. या महापालिकेचा तोटा होतो आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही का. २ कि.मी.ची, ५ कि.मी.ची परवानगी घ्यायची, आणि ५०/५० कि.मी. उखडून काढायचे. ट्रॅक्टर लावतात, जेसीबी लावतात. अशा पद्धतीने कामे केली जातात. या मागे कोण कोण आहेत याची माहिती घ्या. कोणाचे फोन जातात याची माहिती घ्या. मा.महापौर साहेब, एवढेच नव्हे या महापालिकेला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले आहे. टेंडर भरताना फोन येतात फोन. फोन येतो की, हा टेंडर भरतोय. आपले लोक म्हणतात टेंडर भरु नका. मा.महापौर साहेब, आपण जागरुकतेने बघा. एकिकडे आपण डंका पिटतोय की, आम्ही स्वच्छ कारभार करतोय. आणि अशा पद्धतीने काय होते आहे. मा.राहूल

कलाटे यांनी तुम्हाला वाकडचे उदाहरण दिलेच आहे. मा.आयुक्त साहेब मी स्वतः पत्रव्यवहार केलेला आहे. मा.महापौर यांना कॉपी फॉरवर्ड केली होती. संबंधित ठेकेदाराचे पेपर एकाच टेंडरमध्ये काढले जातात. यावर प्रशासनाने मला खुलासा दिला आहे. माझ्याकडे तो लेखी खुलासा आहे. एकाच आय.पी. नंबरवरुन एकाच ठिकाणी बसून एकच माणूस तीन टेंडर भरतो. एक टक्का, दोन टक्के आणि तीन टक्के अबोव्ह. मा.महापौर साहेब, हे लेखी उत्तर आहे आणि मी स्वतः पत्र प्रशासनाला दिले आहे. सिमाभिंतीचे बांधकाम होते. निविदा नो.क्र.५५/२०१७-१८ यात शरद वसंतराव गोटे, त्याबरोबर महेंद्र भालेराव आणि शिवम एंटरप्रायजेस अशा पद्धतीची ही कामे एकाच आय.पी.ॲड्रेसवर भरलेली आहेत. मा.आयुक्त साहेबांना पत्र दिल्यानंतर आयुक्त मला उत्तर काय देतात, कोण कुठेही भरु शकतो, यावर आमचा कंट्रोल नाही. परंतू मला आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे की, आमचे पत्र गेल्यानंतर या निविदा उघडल्या गेल्या नाहीत. कारण त्यांच्या लक्षात आले की, यात रिंग झालेली आहे. मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला दुसरी विनंती आहे की, ज्या लोकांची पत्रे गायब केली गेली, त्याला सहमती आहे का कार्यकारी अभियंताची, त्याला सहमती आहे का डेप्युटीची, त्याला सहमती आहे का टेंडर क्लार्कची. याची चौकशी करा. तुम्ही चौकशी केली नाहीतर मी पुन्हा पत्र देणार आहे. पुन्हा यावर बोलणार आहे. तुम्हाला सांगतो, तुम्ही आज निविदा उघडली नाहीतर तुम्ही भ्रष्टाचारापासून वाचलात. परंतू माझी अजून एक विनंती आहे की, तुम्ही त्यांची परफॉर्मन्स सिक्युरीटी चेक करा. मा.आयुक्त साहेब,तुम्ही टिपून घ्या. नि.नो.क्र.५५/२००७-२००८ त्यामध्ये या ३ ठेकेदारांना फेवर करण्यासाठी ८ लोकांनी निविदा भरली होती. या टेंडर नोटीसमध्ये एकूण १९ कामे होती. समजा माझी एक फॉर्म आहे. मी ५ टेंडर भरले. त्यात ५ टेंडर मधील ४ टेंडरची कागदपत्रे होती तशी आहेत. फक्त या टेंडरमध्ये भाजपाच्या पदाधिका-याचा इंटरेस्ट आहे. त्याला रिंग घडवून आणायची होती. त्या पदाधिका-याने ही सगळी मॅनेजमेंट केली. एका ठेकेदाराला काम देण्यासाठी हे फिजिकली हाताने काढलेले पेपर आहेत. मला सांगा, ५ टेंडरपैकी ४ टेंडरमधील माझे पेपरर्सचा सेट तसाच आहे. मग याच निविदेतील पेपरचा सेट कसा गायब होतो. याला जबाबदार कोण आहे. आपोआप गायब होतो का. दुसरी गोष्ट, समजा मी निविदा भरली असेल. समजा मी १८ ते २० टक्के बिलो टेंडर भरले असेलतर माझी परफॉर्मन्स सिक्युरीटी तेवढीच प्लस येणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, तुम्ही परफॉर्मन्स सिक्युरीटी चेक करा. तुमच्या लक्षात येईल की, मुद्दाम हे पेपर गहाळ केलेले आहेत. तुमच्या लक्षात येईल की, हे मुद्दाम घडवून आणलेले आहे. अशा पद्धतीने जर कामकाज होत असेलतर याला स्वच्छ कारभार म्हणायचे का. एका बाजूला हा रोडचा प्रश्न आहे. मा.महापौर साहेब, मा.दत्तात्रय साने यांनी उल्लेख केला. आम्ही जीव तोडून सांगितलेय की, आमच्या काळात तुम्ही स्वच्छ कारभाराचा झेंडा उचलताय. हेच तुम्ही सुद्धा पहा. दुसरीकडे प्रशासनाचे कौतुक करावे तितके कमी आहे. एसएसआर, डीएसआर वर तुम्ही कार्यशाळा ठेवली. अरे,वा,वा,वा, आयुक्त साहेब तुमचे अभिनंदन केले पाहीजे. आता तुम्ही आम्हाला सांगणार. एस्कलेशन लिमिट काय आहे. बिलो कशाला म्हणतात, अबोव्ह कशाला म्हणतात. हे प्रशिक्षण तुम्ही आत्ता आम्हाला देणार आहात का. आम्ही तुम्हाला पुरावे दिले. आमच्या हातामध्ये माहिती अधिकारात फिगर्स तुम्हाला दिलेल्या आहेत. मी जास्त वेळ घेणार नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या ४२५ कोटींच्या कामामध्ये हा धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांचे यशवंतनगर पासूनचे २७ कोटींचे काम आहे. तो ४.१

टक्का अबोव्ह. ही प्रशासनाने दिलेली माहिती आहे. पुन्हा धनेश्वर कन्स्ट्रक्शन, च-होलीतील पठारे मळा ते डी.वाय.पाटील कॉलेज. मा.महापौर साहेब, तो तुमचा एरिया, तुमचा रस्ता असू शकेल. त्याठिकाणी ३५ कोटींचे काम १ टक्का अबोव्ह. पुन्हा धनेश्वर कन्स्ट्रक्शन रस्ता दाभाडे वस्ती ते इंद्रायणी नदी, ४५ मी. रस्ता, तिथे पुन्हा ४.१ टक्के अबोव्ह. अशा पद्धतीने अजवानींच्या अबोव्ह, मातेरेंच्या अबोव्ह, सर्वांच्या अबोव्ह. आणी तुम्ही आम्हाला सांगताय. आयुक्त साहेब यांची वकीली करत आहेत. आम्हाला सांगतात, यांची एस्कलेशन लिमिट काढतोय. एवढे बिलो आलो. एवढे बिलो आलोतर सन २०१५-१६ आणि २०१६-१७ चे टेंडर बघा. महापालिकेचे १५० कोटी वाचवले आहेत. आणी परत आम्हाला प्रशासनाने सांगायचे की, आम्ही रेट केले, अमुक केले तमुक केले. इथे दिवसाढवळ्या तुम्ही लोकं दरोडा घालताय. अशा पद्धतीने पत्र दिले तर तुम्ही उत्तर तरी द्यावे. अशाच पद्धतीने जाधव साहेब आयुक्त असताना ठेकेदाराने अशीच रिंग केली होती. या रिंगमध्ये दोन टक्का, तीन टक्का टाकला होता. आम्ही त्यावेळी कळवले होते की, यात रिंग झाली आहे. त्यावेळी आयुक्त साहेबांनी कोणालाही वर्कऑर्डर दिली नाही. तुम्ही बघा. आत्ता प्रशासनाने माहिती दिली आहे. लेखी स्वरुपात माहिती आहे. यात याच धनेश्वरने, याच मातेरेने, याच इन्फ्रास्ट्रक्चरने, यात जास्त लोक नाहीत. डांबरीकरणाचे फक्त १२ ठेकेदार आहेत. फक्त १२ ठेकेदार आहेत. या १२ ठेकेदारांनी मिळून ४ टक्के, ५ टक्के, १० टक्के अबोव्हने टेंडर टाकले आहेत. जाधव साहेब आयुक्त होते, तेव्हा ज्या ठेकेदाराला वर्कऑर्डर दिली नाही, त्याच ठेकेदाराने १५ ते १८ टक्के अबोव्ह, अजवानीसारखे २९ टक्के बिलो गेले आहेत. तरीसुद्धा मा.आयुक्त साहेब, तुम्ही मला सांगा. या सदस्यांना कळू द्यात. या सन्माननीयांना पण कळू द्यात. अबोव्ह व बिलो काय असते. एवढे जर अबोव्ह गेले असतीलतर महापालिकेचे किती पटीने जास्त पैसे गेले असतील. किती पटीने टक्केवारी वाढली. किती पटीने भ्रष्टाचार झाला. हे सन्माननीय सदस्यांना कळू द्यात.

आत्ता मा.दत्तात्रय साने म्हणाले की, त्यांचे एक वर्ष पूर्ण होईल. एक वर्षात भ्रष्टाचार कसा झाला हे कळू देत. कसा भ्रष्टाचार होतो ते कळू द्यात. कशी टक्केवारी वाढली ते कळू द्यात. हिच कामे गेल्या वर्षी तो १८ टक्के बिलोने करतो, आज ४ टक्के अबोव्ह करतो. आणि प्रशासन म्हणते भ्रष्टाचार झाला नाही. प्रशासन वकीली करतेय. कुणाची वकीली करतेय. यांनी पत्राच्या अनुषंगाने चौकशी केली असती, मागच्या फाईली पाहिल्या असत्या, या फाईलीमधून त्या ठेकेदाराला पत्र दिले असते की, तुम्ही अजून किती दर कमी करु शकता. या फाईलवर काय येते, चर्चा. या फाईलवर चर्चा, काही नाही. यातून एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर मोकळे आहेत, डेप्युटी इंजिनिअर मोकळे आहेत, सिटी इंजिनिअर मोकळे आहेत, अकाऊंटस् ऑफीसर मोकळे आहेत, चीफ ऑडीटर मोकळे आहेत. दणादण सह्या होतात. पुन्हा सांगतो, कामाला विरोध नाही. काम केले म्हणून पोटात दुखत नाही. काम होतेय म्हणून वाईट वाटत नाही. परंतू ज्या पद्धतीने काम होते आहे, चांगलेच काम होतेय. तुम्ही कामच दाखवताय. काम दाखवताय ते सर्वांना कळू द्यात की, कसे काम करताय, किती टक्केवारीने काम दाखवताय, किती अबोव्हने काम दाखवताय, महापालिकेचे किती नुकसान होते आहे. जनतेला कळू देत, सभागृहाला हे कळू देत. मा.महापौर साहेब,आपण चांगले काम करताय. आपण पेपर वाचत असाल. आपल्यालाही माहीत असेल. भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी या नात्याने तुम्ही सुद्धा याची जाण ठेवली पाहीजे. तोच ठेकेदार, तीच कामे कशी काय १८ टक्के/२० टक्के बिलो

जातात. मग आत्ताच ही कामे कशी काय अबोव्ह जातात. आयुक्त म्हणून त्यांचे काम आहे. त्यांनी लोकांना पत्र दिले असते की, मला हे दर मान्य नाहीत. तुम्ही अजून काही करु शकता का. जर जाधव साहेब करु शकतात मग आयुक्त हर्डीकर साहेब करु शकत नाहीत का. तुम्ही अधिकारी करु शकत नाहीत का. मुख्यलेखापाल लांडे साहेब यांचे तर कौतुक आहे. त्यांना मोठ्ठा हारच घाला. त्यांना बीले अडवता येत नाहीत. मी स्वतः आयुक्त साहेबांकडे तक्रार केली होती. अति.आयुक्त अष्टिकर साहेबांकडे तक्रार केली. मा.महापौर साहेब, एखाद्या कामाचे अमुक आणा, तमुक आणा. पी.एफ.चे पेपर आणा. अमुकचा पेपर आणा. फिरव, फिरव, फिरव. ठेकेदाराला फिरवण्यात वस्ताद आहे गडी. मग काय होते बील लवकर अदा झाली नाही की शॉर्ट टर्म डिपॉझिट. मग महापालिकेचे उत्पन्न वाढवले म्हणून लांडे साहेबांचे कौतुक झाले. त्याच लांडे यांच्या केबिनमध्ये मी मागे म्हटले होते. गोपाळ सुटला मोकाट आणि या गरीबाला झाली शिक्षा. एवढे पैसे तो घेऊ शकत नाही. ते लांडे साहेबांचेच पैसे होते. पैसे घेताना त्याला पकडले. मी परवाच म्हटले होते, एक फाईल पाच वेळा फिरते. त्याचे कारण काय की, टक्केवारी वाढावी. दुस-या बाजूला डिपॉझिट वाढावे. इकडे प्रशासनाचे कौतुक घ्यायचे, तिकडे मलिदा खायचा. मा.महापौर साहेब, आपण लक्ष घाला. लक्ष घाला. शंभर टक्के लक्ष घाला. आणि भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिका-यांना पण माझी विनंती आहे की, तुम्ही सुद्धा लक्ष घाला. कशा पद्धतीने अधिकारी वागतात आणि कशा पद्धतीने भ्रष्टाचार होतो. हे आयुक्त म्हणून, प्रशासक म्हणून तुम्ही जागरुक व्हा. यात प्रशासन सुद्धा सामिल आहे. फक्त एकटा पदाधिकारी हे करु शकत नाही. एका रात्रीत टेंडरवर सह्या होतात. एका रात्रीत निविदा निघते. एका रात्रीत वर्कऑर्डर होतात. असे कसे शक्य आहे. करा काम करा. अजून काम करा. आम्ही तुमच्या सोबत आहोत. परंतू अशा पद्धतीने जमणार नाही. मुळीच जमणार नाही आणि आम्ही खपवून पण घेणार नाही. प्रशासनाने याचे उत्तर दिले पाहीजे. एकाच आय.पी. वरुन, एकाच संगणकावरुन, एका तासाभरात ही तीन टेंडर भरली गेली आहेत. याच्या मागे कोण पदाधिकारी आहेत. वाकडचे उदाहरण मा.राहूल कलाटे यांनी घेतले. त्याठिकाणी त्या ठेकेदाराने टेंडर भरले. तो २२ टक्के बिलो होता. त्याने पत्र दिले की मी चुकून भरले. त्याला पदाधिका-याचा फोन जातो. अरे वा, ही कोणती पद्धत चुकून भरले. माणूस टेंडर चुकून भरतो का. आयुक्त साहेबांना पत्र दिले तेव्हा आयुक्त साहेबांनी ते टेंडर उघडले, ते २२ टक्के बिलो झाले. २ कोटींच्या कामाला २२ टक्के बिलो म्हणजे किती झाले. महापालिकेचे ४४ लाख हडप करायचे काम होते, ४४ लाख रुपयांची लूट करायची होती, ४४ लाख रुपयांचा भ्रष्टाचार करायचा होता. म्हणून ही पद्धत अवलंबली होती. परंतू मा.राहूल कलाटे यांनी वेळीच पत्र दिले. प्रशासनासमोर आणले. ही निविदा उघडली नसती तर तीच निविदा एका महान भारतीय जनता पार्टीच्या एका पदाधिका-याच्या भाच्याच्या खिशात पडले असती. अशा पद्धतीने काम चालू आहे.

**मा.महापौर** – आता तुम्ही मूळ विषयावर बोला. तुम्ही या विषयावर खूप चर्चा केली. तुम्ही मूळ विषयावर बोला.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मी जास्त बोललेलो नाही.

**मा.महापौर** – तुम्ही खूप बोललात. अजून काय बोलायला पाहीजे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, विषय काय ते मला पण कळतेय. मला कळत नाही अशातला भाग नाही. या विषयावर सुद्धा बोलतो.

**मा.महापौर** – तुम्ही खूप बोललात. मूळ विषयावर बोला.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, या विषयामध्ये मोजमापात लूट होते. परवानगी दिली जाते एक आणि तिथे काम केले जाते दुसरेच. यावर अंकुश घालणे गरजेचे आहे. यामागचे भ्रष्टाचारी कोण आहेत, यामागचे माफिया कोण आहेत, या मागचे गुंड कोण आहेत हे बघणे प्रशासनाचे खरेतर मा.महापौर साहेब तुमचे सुद्धा काम आहे.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे. ज्या कंपन्यांना आज मंजूरी देतोय, त्यांना आठ/दहा वर्षे झाली आहेत. त्यांना आजच परवानगी देत नाही.

**मा.कमल घोलप**- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - १३१ विषय क्रमांक – २
दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/शअ/तां/४/१७५/१७ दि.२९/१२/२०१७
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९२५ दि.१०/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकिय तसेच खाजगी संस्थेकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस परवानगी महापालिके मार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरून घेण्यात येतो. सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/ निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी

परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील मागणीः-</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील पायाभुत आराखडा अंतर्गत भुमिगत सेवा वाहिन्यांसाठी रस्ता खोदाईबाबत दि.२३/०१/२०१० रोजी मा.नामदार श्री. अजितदादा पवार, उर्जामंत्री तथा पालकमंत्री यांनी, कौन्सिल हॉल, पुणे येथे झालेल्या बैठकीत सुचित केलेनुसार व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी दि.१०/०२/२०१०, दि.१३/१२/२०१०, दि.६/११/२०११ व दि.२५/०३/२०११ कळविलेनुसार, त्यांच्याकडील पायाभुत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे आकारणी करुन रस्ता खोदाईस परवानगी द्यावी व याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) जो निर्णय देईल त्याप्रमाणे उर्वरित रक्कम महावितरणाने भरणे बंधनकारक राहिल असे धोरण ठरलेले आहे. तथापि, अद्याप पर्यंत सदर बाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) यांचेकडून निर्णय प्राप्त नाही. त्यानुसार, मा. आयुक्त यांचेकडील दि.२०/०२/२०१०, दि.२३/१२/२०१० व १४/११/२०११ च्या मान्य प्रस्तावानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभूत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात आलेली आहे, व सदर वाहिन्यांसाठी खोदलेल्या चरांची दुरुस्ती मनपामार्फत करण्यात येते.म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी मा.आयुक्त यांच्याकडील दि.१०/०२/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार व आदेश क्र. स्थापत्य/शअ/तां/४/५९/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये र.रु.२३००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) याप्रमाणे सवलतीच्या दराने शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती. म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा- अंतर्गत देणेत आलेल्या मागील ३ वर्षाचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | परवानगी देणेत आलेल्या रस्ता खोदाईची लांबी कि.मी. मध्ये | मनपा कोषागारात जमा र.रु. (लाखात) | दर प्रती रनिंग मीटर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ७९.४२ | १८२६.६६ | २३००/- |
| २ | २०१६-१७ | १.१५२ | २६.५० | २३००/- |
| ३ | २०१७-१८ | ०.१ | २.३० | २३००/- |

पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.पथ/५२८१ दि.२२/११/२०१७ नुसार मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेनुसार मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांची फेरप्रस्तावास मान्यता मिळेल या भरवशावर महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस पुणे

महानगरपालिका ट्रेंचिंग गाईड लाईन नुसार पुणे महानगरपालिकेकडे दाखल असलेले तसेच भविष्यातील खोदाई प्रस्तावास ओपन ट्रेंचिंग पध्दतीने र.रु.२,३५०/- प्रती रनींग मीटर दर आकारुन मान्यता देणेत येत असलेबाबत म.रा.वि.वि.कं.मर्या.यांना कळविण्यात आलेले आहे. मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/ काअ(प्र) ००४४९०,दि.१६/११/२०१७ व क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र)००४५८५, दि.२४/११/२०१७ च्या पत्रांन्वये म.रा.वि.वि.कं.मर्या., यांनी महापालिका हद्दीमध्ये यांच्याकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS)), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning & Development Committee (DPDC)), व इतर योजने अंतर्गत भुमिगत केबल टाकण्याकरीता व दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास र.रु.२,३५०/- प्रती रनिंग मीटर या दराप्रमाणे शुल्क आकारुन परवानगी देणेबाबत मागणी केलेली आहे. सदर मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र) ००४५८५, दि.२४/११/२०१७ मध्ये नमुद केलेनुसार म.रा.वि.वि.कं.मर्या., यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने ७०.१६ किमी. उच्चदाब वाहिनी व २८.३५ किमी. लघुदाब वाहिनी व इतर कामे प्रस्तावित असल्याचे कळविले आहे. सदर कामांची एकूण लांबी ९८.५१ किमी. येत आहे. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि.१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार "महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य करारनामा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत" कळविले आहे. सदर सामंजस्य करारनाम्याची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सदर सामंजस्य करारनाम्यातील ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

Ø महानगरपालिका व महावितरण या दोन्ही संस्था नागरीकांसाठी पायाभूत सुविधा पुरविणा-या संस्था आहेत.

Ø विज वाहिन्या टाकण्याबाबत महानगरपालिका व महावितरण यांच्या जबाबदा-या सामंजस्य करारनाम्यातील मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद सविस्तररित्या नमुद केलेले आहे.

Ø दोन्ही संस्था विज वाहिन्या टाकण्यासाठीच्या कामांसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) यांची नेमणूक करेल.

Ø महानगरपालिकेमार्फत स्थापत्य विभागाचे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता विज वाहिन्या टाकणे बाबतच्या कामांसाठीच्या कार्यवाहीसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) असतील.

Ø महावितरण यांनी नोडल ऑफिसर यांचेकडे सविस्तर अर्ज सादर केल्यानंतर दोन्ही संस्थांच्या अधिका-यांसमवेत एकत्रित सर्वेक्षण करुन झाल्यानंतर प्रकरण मा.शहर अभियंता यांचेमार्फत मा. आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर केले जातील.

Ø मा.आयुक्त यांच्या मान्यतेनंतर महावितरण यांचेकडून र.रु. १००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे देखरेख शुल्क (सुपरविजन चार्जेस) प्रथमत:मनपा कोषागारात भरुन घेणेत येतील व तदनंतर महावितरण यांना भुमिगत विज वाहिनी टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी देणेत येईल.

Ø सदर खोदलेले रस्त्यातील चर महावितरण यांनी महापालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेद प्रमाणे नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी महापालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाच्या अभियंतांचे देखरेखीखाली तातडीने दुरुस्त करुन पूर्ववत करावयाचे आहे.

Ø सदर चर दुरुस्तीनंतर महावितरण यांनी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे नोडल ऑफिसर यांचेकडून रस्त्यातील खोदलेला चर महानगरपालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेदाप्रमाणे तातडीने दुरुस्त केलेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे.

Ø सदर कामासाठीचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) वरील प्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्राच्या दिनांकापासून दोन (२) वर्षांचा असेल.

Ø सदर दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) मध्ये महावितरण यांनी तातडीने दुरुस्त केलेले चर सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महावितरण यांची राहील.

Ø जर महावितरण यांनी खोदलेला चर तातडीने दुरुस्त करुन रस्ता पुर्ववत करण्यास वा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) मध्ये सदरचा दुरुस्त केलेला चर सुस्थितीत ठेवण्यास असमर्थ ठरल्यास नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी सदरचे चर महानगरपालिकेला दुरुस्त करुन पूर्ववत करावयास लागल्यास त्यासाठी महानगरपालिकेस आलेला खर्च महावितरण कडून महापालिकाविज पुरवठ्याबाबत घेत असलेल्या सुविधाबाबतचे विज बिलातून वजा करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि. १८ मार्च २०१६ नुसार महावितरण व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार महावितरणकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्याबाबतची कार्यवाही करणेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. महापालिका सभेला आहे. तरी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.यांना त्यांचेकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning &

Development Committee (DPDC), व इतर योजने अंतर्गत भुमिगत सेवा वाहिनी टाकण्याकरीता व सेवा वाहिनी दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास महावितरण व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार परवानगी देणेबाबतची कार्यवाही करणेबाबतचे धोरणात्मक निर्णयास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग कंपनी मर्या. यांचे मार्फत येणा-या अर्जास हे दर लागु राहतील.

२) महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग कंपनी मर्या. यांचे कडुन विद्युत कनेक्शन मिळणेसाठी अर्ज करणा-या खाजगी संस्था व इतर कंपण्यांना मनपाने ठरविलेले रस्ता दुरुस्तीचे दर लागू राहतील.

३) रस्त्यामध्ये चर घेवुन रस्ता दुरुस्ती करणे या कामाला कामाचा आदेश देताना त्यामध्ये कामाची मुदत देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १३२ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैदय/१४अ/कावि/५८४/२०१७ दि.१/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आलेली आहे.

त्यानुसार दिनांक १ एप्रिल २०१७ ते ३१ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत धन्वंतरी योजनेमध्ये अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे अवलंबित तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे अवलंबित यांनी उपचार घेतले असून त्यांची बिलांची संख्या ५८०४ इतकी झाली आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत ३५२२ रुग्णांवर उपचारापोटी केलेल्या बिलांची रक्कम अदा करणे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित बिलांची रक्कम ही र.रु.१८,३२,८७,९९७/- इतकी आहे. त्यामुळे र.रु.१८,३२,८७,९९७/- ची अदायगी धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयांना अदा करणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे झालेला खर्च हा पॅनलवरील रुग्णालयांमार्फत महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर झालेला असल्यामुळे सदरची बिले रुग्णालयांना अदा करणे क्रमप्राप्त आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना या लेखाशिर्षावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी र.रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी दि.२०/१२/२०१७ अखेर

र.रु.९,९४,७७,५८४/- इतकी रक्कम खर्ची पडली असली असून र.रु.५,२२,४१६/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

धन्वंतरी योजने अंतर्गत दरमहा प्राप्त होणा-या कर्मचारी वर्गणी व महापालिकेचा हिस्सा याचा विचार करता धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे लेखाशिर्षावर अतिरिक्त किमान र.रु.१९ कोटींच्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अश्विनी जाधव** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** - १) मा.महापालिका आयुक्त यांचे नर/कावि/१५/१७/२०१७ दि.४/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.६३२ दिः-१०/०२/२०१५ अन्वये प्रदान केल्यानुसार वर नमूद ७ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव शासनास दिः-०३/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आला होता.

उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग पत्र क्र. पीसीसी – ३०१५/ प्र.क्र. ३८१/ नवि-२२, दिः- ०३/०६/२०१६ अन्वये महापालिकेस कळविण्यात आले आहे की, दिनांक ३१/३/२०१५ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरणाची (PMRDA) स्थापना झालेली आहे. या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिचवड महानगरपालिका हद्दीलगतची गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची आता आवश्यकता नाही.

तत्पुर्वी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिः- ०७/०५/२०१३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चाकण सह देहू, आळंदी, म्हाळुंगे, मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणे शक्य आहे काय? याबाबत अभ्यास करुन परिपुर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी शासनास सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सदर बैठकीचे निर्णयाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकात हद्दीत वरील नमूद गावे व इतर परिसराचा समावेश करणेबाबत पिंपरी चिंचवड मनपाचे सर्व पदाधिकारी यांची दि. ३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात बैठक घेण्यात आली. सदर

बैठकीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि पश्चिमेकडील ६ गावे समाविष्ट करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या उत्तरेकडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि पश्चिमेकडील ७ गावे- हिंजेवाडी, जांभे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे अशी एकूण १४ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करून घेणेबाबातचा प्रस्ताव मा. महापालिका सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने ठराव क्र. ६३२ दिः-१०/०२/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे मनपा हद्दीत समाविष्ठ करण्यास मान्यता प्रदान केली. मा. महापालिका सभेच्या उक्त ठरावानुसार पिंपरी चिंचवड महानगरपलिकेने शासनास दि.०३/०६/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर केला होता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ७ गावे समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाने दि.०३/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये नामंजूर केल्यामुळे मनपामार्फत मा.विभागीय आयुक्त, पुणे यांना दि.०७/०४/२०१७ रोजीचे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे, तसेच मनपा हद्दीच्या उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंट क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र आणि आळंदी नगरपरिषदेचे संपुर्ण क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश करण्याविषयी शासनास उचित अहवाल सादर करण्याविषयी विनंती देखील करण्यात आली आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावातील मनपा हद्दीचे पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे, तसेच मनपा हद्दीचे उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंटचे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी भौगोलिकदृष्ट्या संलग्नता असल्याने मनपात समाविष्ट होणे योग्य असून देहुगाव या तिर्थक्षेत्र परिसराचा व मनपा हद्दीचे पश्चिमेकडील ७ गावांचा नियोजनबध्द व सुनियोजित विकास होण्यासाठी आणि भागातील नागरीकांना देखील शहरी भागाच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे या भागाचा विकासाचा वेग पाहता गरजेचे आहे व मनपाचे प्रशासकीय यंत्रणेमार्फत हे शक्य होऊ शकेल.

म्हणून पिंपरी चिंचवड मनपा हद्दीचे पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे व उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंटचे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याबाबत शासनास पुनश्च नव्याने हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.नम्रता लोंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.विकास डोळस** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मौजे दिघी येथील स.नं. ६४ पर्यंत मनपाच्या ह्ददीत ६० मी. रुंद पुणे – आळंदी पालखी मार्ग प्रस्तावीत आहे. सद्यस्थीतीत मनपाच्या हद्दीतील मौजे दिघी पासुन मौजे बोपखेल फाटा येथे जाण्यासाठी सुमारे ७ ते ८ मी. रुंदीचा रस्ता अस्तीत्वात आहे. सदरचा रस्ता रहदारीचा असल्यामुळे दररोज वाहतुकीच्या कोंडीचा नागरीकांना सामना करावा लागतो. सदरचे अंतर सुमारे २ किमी असुन या रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. मौजे दिघी स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंत उजव्याबाजुस VSNL चे क्षेत्र आहे. मौजे दिघी येथील स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंतच्या ६० मी. रस्ता रुंदीकरणासाठी VSNL ची जागा खाजगी वाटाघाटीने अथवा भूसंपादनाने मनपाच्या ताब्यात घेणेची आवश्यकता आहे. तसेच रस्त्याच्या डाव्याबाजुस संरक्षण विभागाची हद्द आहे. ६०.० मी. रस्ता रुंदीकामी संरक्षण विभागाचे हद्दीतील क्षेत्र देखील मनपाचे ताब्यात घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत VSNL चे रस्त्याने बाधीत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी अथवा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेकामी व संरक्षण विभागाचे हद्दीतील ६० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्र मनपाच्या ताब्यात घेणेकामीचा प्रस्ताव संरक्षण विभागास सादर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वसंत बोराटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे हद्दीतील मौजे दिघी येथील स.नं. ६४ पर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्द आहे. मौजे बोपखेल येथील स.नं. १३३, स.नं १३६ ते १४१ हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असुन VSNL (Tata Communication Ltd) चे मालकीचे आहेत. मौजे दिघी येथील स.नं. ४९ ते ६३ व ६५, ६७ हे VSNL (Tata Communication Ltd) यांचे मालकीचे असुन पिं चि मनपाच्या हद्दीत नाहीत. तसेच मौजे कळस येथील स.नं. ३४ ते ३९ व ४४ ते ५५ मधील VSNL (Tata Communication Ltd) यांचे मालकीचे क्षेत्र देखील पिपंरी चिंचवड मनपाच्या हद्दीत नाही. मौजे दिघी लगत मौजे कळसची शीव आहे. मौजे कळस हे पुणे महानगरपालिकेत सामविष्ट आहे. त्यामुळे दोन्ही मनपाच्या हद्दीमधुन दिघी व कळस येथील काही क्षेत्र सुटलेले आहे. मौजे दिघी स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंत उजव्याबाजुस VSNL (Tata Communication) चे क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तरी मौजे दिघी व कळस येथील पुणे आळंदी रस्त्या पासुन बोपखेल गावाकडे जाणा-या रस्त्याच्या उत्तरेकडील बाजुस असलेले VSNL (Tata Communication Ltd) चे क्षेत्र पिं. चि. मनपाच्या हद्दीत समाविष्ट करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.लक्ष्मण उंडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.सचिन चिखले-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, खरेतर नवीन ७ गावांचा समावेश करण्यात यावा, हा विषय पुन्हा एकदा सभागृहासमोर आला आहे. मा.महापौर साहेब, माझ्यासारख्या एका नगरसेवकाला एक प्रश्न उपस्थित होतो. च-होली असेल, मोशी असेल, डुडूळगाव असेल, त्याचप्रमाणे आमच्या शेजारचं गावं, वाकडचा परिसर असेल, त्याच्या आजुबाजूचा परिसर असेल. खरेतर १९९३ साली ही सर्व गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली होती. ही गावे समाविष्ट करुन आपण त्यांना सोयी-सुविधा देणार आहोत का. का विनाकारण त्यांना समाविष्ट करुन भूलवत बसणार आहोत. जी समाविष्ट झालेली गावे आहेत, त्या गावांचे अजून अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. रस्ता असेल, ड्रेनेज असेल, खेळाची मैदाने असतील, वर्षानुवर्षे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. नवीन गावांचा भाग आपण आपल्या अंगावर घेतो आहोत. यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही. शेतकरी बांधवांचा हा खरेतर प्रश्न आहे. नवीन गावांत आमची नातीगोती आहेत. शेतकरी वर्ग आहे. आम्ही शेतक-यांची मुले आहोत. जोपर्यंत पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व गावांची व्यवस्थितपणे डेव्हलपमेंट होत नाही, तोपर्यंत तरी हा विषय तहकूब ठेवण्यात यावा. कारण आजही निगडीतले काही शेतकरी आहेत, त्यांना १२.५ टक्के परतावा मिळालेला नाही. आजही काही शेतकरी असे आहेत, त्यांच्या पिंपरी चिंचवड महापालिकेत रस्त्यांच्या डेव्हलपमेंटमध्ये जमिनी गेल्या. पण आजही त्यांना न्याय मिळालेला नाही. आजही शहरातील व्यापारी वर्ग आहे, त्यांचे आरक्षणात भूखंड गेले, जमिनी गेल्या, दूकाने गेली. हे लोक सुद्धा पैशांपासून म्हणा किंवा त्यांच्या विविध मागण्यांपासून हे लोक वंचित आहेत. खरेतर आत्ताच काही दिवसांपूर्वी पी.डब्ल्यू.डी यांनी सुद्धा पाणीपुरवठ्या संदर्भात, तुम्ही पाणी कमी करा म्हणून पत्र दिले आहे. येणारा उन्हाळा आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ही गावे समाविष्ट केलीतर शहराला आधीच मुबलक पाणी मिळत नाही. काळेवाडी भाग असेल, चिखली असेल, च-होली असेल, इथे कमी दाबाने पाणीपुरवठा करतो. नवीन गावे समाविष्ट केलीतर आपण त्यांना पाणी देऊ शकतो का. नवीन गावे समाविष्ट केलीतर इथला कचरा व्यवस्थितपणे उचलू शकतो का. इथली मैदाने, इथली डेव्हलपमेंट करु शकतो का. का वर्षानुवर्षे शेतक-यांना समाविष्ट करायचे व झूलवत ठेवायचे. महापालिकेने आणि प्राधिकरणाने ॲक्विझिशन केलेले भरपूर प्लॉटस् आहेत दरवर्षी आरक्षणे होतात. पण त्या शेतक-यांना शेतीचे म्हणा किंवा रस्त्यांचे म्हणा. त्यांना मुबलक रक्कम मिळालेली नाही. मी आपल्याला नम्र विनंती करतो की, पुन्हा एकदा या सर्व गोष्टींचा विचार करावा. त्यानंतर हा विषय समजून घ्यावा. धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, यापूर्वी या गावांचा विषय सभागृहात आला होता. त्याही वेळी आम्ही ही गावे आपल्याकडे नको म्हणून, आम्ही राष्ट्रवादी पक्षात असताना सुद्धा विरोध केला होता. मा.महापौर साहेब,आत्ता चेअरमन यांनी मा.सचिन चिखले यांची पाठ थोपटली. आमच्या ग्रामिण भागात आजही काही भागांत

नागरी सुविधा पोचल्या गेलेल्या नाहीत. ते आजही शोकांतिका आहे, हे आम्ही आजही मान्य करु शकतो व करत आहोत. जसे चिखली इथे, च-होली इथे, रावेत इथे, पुनावळे इथे, १९९७ साली गावे ताब्यात घेतली. ॲक्विझिशन केले. त्यानंतर सुद्धा आपल्या सर्वांना माहित आहे, त्यावेळी गावे सोडायची नाहीत, गावे द्यायची नाहीत म्हणून वेगवेगळी आंदोलने झाली. या आंदोलनांमध्ये ५/६ वर्षे गेली असतील. आपल्या भागात आपल्याला सुविधा देता आल्या नाहीत. आजही ग्रामिण भागात १८ गावांना जेवढ्या पाहिजे तेवढ्या सुविधा आजही पुरवल्या नसतांना आपल्याकडे नवीन गावे घेवून आपण नक्की काय साधणार आहोत माहित नाही. आपल्याला माहित आहे. मा.महापौर साहेब, पूर्वी ज्यावेळी हा विषय आला होता. निघोजे, चाकण, चिंबळी, कुरुळी, देहू, आळंदी ही गावे यातून वगळलेली दिसत आहेत. ही सुद्धा गावे घ्या. पिंपरी चिंचवड महापालिकेतील सगळी इंडस्ट्री चाकण परीसरात गेली आहे. हिंजवडी, वाकड इथे गेली आहे. जो हेतू डोळ्यासमोर ठेवूनच आपण ही ७ गावे घेतो आहोत का काय असे वाटतेय की, आपण यातून काय साध्य करणार आहोत. पूर्वी १८/१९ गावे घेणार होतो मग नेमकी ही सातच गावे का घेतो आहोत. यात सगळ्यांत महत्वाचे म्हणजे देहू-आळंदीचा विषय यात यायला पाहीजे होता. देहू-आळंदी आपल्यात आहे. अनेक वेळा देहू-आळंदीला पाणीपुरवठ्यासहीत सगळ्या सुविधा दिलेल्या आहेत. मग ते यात का आणलेले नाही. गावे घेण्याबाबतीत माझा आजही शंभर टक्के विरोध आहे. याला कारण आहे की, मा.सचिन चिखले यांनी सांगितल्याप्रमाणे आजही या गावांमध्ये सगळ्या सुविधा दिलेल्या नाहीत. या गावांना आपण पाणीपुरवठा देऊ शकणार आहोत का. सगळ्या सुविधा देऊ शकणार आहोत का.

**मा.महापौर** – विषयांतर करु नका. लवकर बोला. तुम्ही बोलून घ्या.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.महापौर** – विषयांतर करु नका. लवकर बोला.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब, तुम्हाला धास्ती भरली का.

**मा.महापौर** – तुम्ही विषयांतर करु नका. काय बोलायचे ते बोलून घ्या.

**मा.दत्तात्रय साने-**मा.महापौर साहेब, काही काळजी करु नका. मी काही वेगळे बोलणार नाही. मागे सुद्धा सभागृहात हा विषय आला होता. तुम्ही सुद्धा होते. त्या काळात आपण सगळ्यांनी मिळून हा विषय फेटाळलेला होता. तसाच हा विषय पुन्हा एकदा आला आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयाला माझा किंवा राष्ट्रवादी पक्षाचा विरोध आहे.

**मा.पंकज भालेकर-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, नवीन समाविष्ट गावांबाबत हा विषय आलेला आहे. प्रथमत: मागील इतिहास पाहिला पाहीजे. १९९७ साली महापालिकेत १८ गावे समाविष्ट झाली. गेल्या २० वर्षांत, त्या भागात मुबलक सोयी

सुविधा देण्यात प्रशासनामार्फत भरपूर वानवा आहे. पाण्याची समस्या असेल, ड्रेनेज समस्या असेल, सगळे होत असताना ही ७ गावे घेऊ इच्छितोय. आज आपल्याला पाण्याच्या एवढ्या मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागते आहे. भामा-आसखेडचे पाणी अजून आपल्याकडे यायचे आहे. आणि आपण ही ७ गावे घेण्याचा विचार करताय. तुम्हाला त्यांना पाणी द्यावे लागेल. आज आपल्या असलेल्या गावांना पाणी मिळत नाही. मग या गावांना पाणी आणि बाकी सुविधा कधी देणार म्हणून निश्चितच या विषयावर विचार करायची गरज आहे. आपण हा विचार करावा. प्रशासनाने ही गावे घेण्यासाठी निश्चितच विचार करावा. एवढेच सांगतो व थांबतो. धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, माझे म्हणणे असे आहे की, समाविष्ट ७ गावे घ्यायची आहेत. त्याता देहू, आळंदी, विठ्ठलनगर ही नावे आहेत. वास्तविक पाहता, देहू गाव हे हवेली मतदारसंघात येते आणि त्यांचे रेव्हेन्यू डिपार्टमेंट आहे. सातबारा आणि बाकी प्रत्येक गोष्ट हवेलीशी संबंधित आहेत. मी बिल्डर आहे म्हणून मी तसे बोलत नाही. हिंजवडी व ही इतर गावे महापालिकेच्या हद्दीत आली पाहीजेत. देहू-आळंदी पण घ्या. १९८२ ला पिंपरी,निगडी,चिंचवड,भोसरी ही चार गावे मिळून महापालिका झाली. १९९७ ला १८ गावे महापालिकेत आली. २००४ ला हवेली मतदार संघातील आमदार निवडून आले. ही गावे वगळली म्हणून त्यांनी त्यांना चांगले मतदान सुद्धा केले. ते आमदार झाले. आज अशी परिस्थिती आहे की, पिंपरी चिंचवडमधील पहिली ४ गावे, नंतर १८ गावे आणि आपण आत्ता घेणारी ९ गावे असे मिळून करणार आहोत. पण पिंपरी चिंचवडमधील पहिल्या चार गावांतील किती टक्के डि.पी. डेव्हलप केला, किती टक्के कामे केलीत. ही ९ नवीन गावे घेणार आहोत. यात किती टक्के काम करणार आहोत. माझे एकच म्हणणे आहे की, ही सात गावे घ्या. पण पहिल्या चार गावांमध्ये पहिले काम करा. नंतर १८ गावांमध्ये पण करा. नंतर ९ गावांमध्ये पण करा. नाहीतर एक ना धड भाराभर चिंध्या असे व्हायला नको. एवढे बोलून थांबतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, आत्ता या विषयाला अनुसरून मी बोलू इच्छितो की, ही ७ गावे काय १४ गावे घेतली तरी कमी पडेल. कारण आपल्या संस्कृतीत म्हटले आहे की, एक तीळ सात जणांनी वाटून खाल्ला. त्याप्रमाणे आपल्या शेजारची गावे आहेत, ७० जणांनी वाटून खाऊ. वाटून खाऊ म्हणजे मुलभूत सुविधा ड्रेनेज असेल, पाणी असेल, लाईट असेल या सुविधा शेजारी पण द्या. शेजारच्या गहुंजे गावातील २५ टक्के लोक महापालिकेचे पाणी अनधिकृतपणे वापरत आहेत. त्यांना हे पाणी लिगली मिळालेतर त्यांचाही प्रश्न सुटेल. माझ्या गावात रोडची मुलभूत सुविधा उपलब्ध होईल. तिथे बस नाही. बसची सुविधा नाही. आज मारुंजी,नेरे,गहुंजे याठिकाणी हाच प्रॉब्लेम आहे. आज आपल्याला उत्पन्न उपलब्ध होणार असेलतर नेरे, गहुंजे येथील ९० टक्के नागरीकांची मागणी आहे की,आमचे गाव महापालिकेत वर्ग करावे. आपल्या महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूलसुद्धा उपलब्ध होईल. या महसूलाकडे आपण यात लक्ष द्यावे. आपल्याच भाऊबंधांना मुलभूत सुविधा द्याव्यात. आज आपण देहू गावात कार्यक्रमासाठी, वारीसाठी खर्च

करतो. रोडसाठी खर्च करतो. आता गहूंजे गावाच्या शितळानगर हद्दीत तुम्ही स्मशानभूमीसाठी खर्च करणार असू तर ही गावे अधिकृतरित्या महापालिकेत समाविष्ट करुन घ्यावीत अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवतो.

**मा.विकास डोळस**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, आत्ता माझे मित्र मा.पंकज भालेकर यांनी समाविष्ट गावांची व्यथा मांडली. त्याअगोदर मा.दत्तात्रय साने यांनी पण समाविष्ट गावांमध्ये विकास झाला नाही हे मान्य केले. मी या दोघांचे कौतुक करतो. जेव्हा समाविष्ट गावांचा प्रश्न येतो, तेव्हा पक्ष किंवा काही न बघता समाविष्ट गावांतील नागरीक म्हणून त्यांनी प्रश्न मांडले किंवा व्यथा मांडल्या. आपल्या सभागृहाचे वरिष्ठ नेते मा.योगेश बहल यांनी समाविष्ट गावांतील आत्ता जी ४०५ कोटींची कामे आहेत त्या विषयावर आत्ता आरोप केले. भाईंनी जे आरोप केलेत, त्या विषयाला उत्तर द्यायला सभागृहातील वरिष्ठ नेते आहेत ते सक्षम आहेत. मला इथे हा विषय मांडायचा आहे की, आमच्या गावाला पालिकेत जाऊन २० वर्षे झाली. धड ग्रामपंचायत नाही धड महापालिका नाही. पायाभूत सुविधांची वानवा. समाविष्ट गावांतील प्रत्येक नगरसेवक हे मान्य करतो. जेव्हा आत्ता कुठे आमच्या गावांमध्ये विकास कामे चालू होत आहेत, आणि त्याला जर विरोध होत असेलतर या गावांतील जनता त्यांना नक्कीच माफ करणार नाही. मा.दत्तात्रय साने हे राष्ट्रवादीचे नगरसेवक असूनही त्यांनी हे मान्य केले म्हणून मी त्यांचे कौतुक करतोय. त्यांच्याकडे सत्ता असतानाही पाठिमागे या समाविष्ट गावांत विकास कामे झालेली नाहीत. आमच्या प्रभागाच्या विकास कामांसदर्भात पंधरा दिवसांपूर्वी आयुक्तांच्या कार्यालयात आमची बैठक झाली होती. दिघी स्मशानभूमी शासनाकडून वर्ग सुद्धा करुन घेता आली नाही. एवढे आमच्या गावाकडे दूर्लक्ष झाले आहे. भ्रष्टाचार झाला असलातरी खर्च झाला आहे. तुम्ही २० वर्षे राजरोसपणे भ्रष्टाचार केलेला आहे. आमच्या गावांना विकासापासून वंचित ठेवणं म्हणजे भ्रष्टाचार आहे. पायाभूत सुविधा न देणे म्हणजे भ्रष्टाचार आहे. या गावांतील कररुपी पैसा गोळा करुन तो दुस-या भागात, जिथे मॉडेल वॉर्ड करण्यासाठी तिकडे वळवणे म्हणजे भ्रष्टाचार आहे. आमचे नेतृत्व मा.महेशदादा लांडगे, मा.महापौर नितीन आप्पा काळजे, माझ्या भगिनी मा.सिमाताई सावळे यांचे मी अभिनंदन करतो. कोणाला स्वप्नांत सुद्धा वाटले नसेल की, एकाच वेळी ४०५ कोटींची कामे समाविष्ट गावांसाठी निघू शकतात, होऊ शकतात. मा.महापौर साहेब, आपण मला बोलायला संधी दिलीत, त्याबद्दल आपले धन्यवाद.

**मा.सुवर्णा बुर्डे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, आज समाविष्ट भागाला जो न्याय मिळाला आहे. पक्षनेते, आमदार मा.महेशदादा लांडगे, आमदार मा.लक्ष्मणभाऊ जगताप व चेअरमन मा.सिमा सावळे यांचे मनापासून आभार व्यक्त करते. आज समाविष्ट गावांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. १९९७ ला ही जी गावे महापालिकेत समाविष्ट केली होती, त्यावेळी त्यांच्याकडे दूर्लक्ष केले गेले. आज त्यांना न्याय मिळाला. त्याबद्दल मी सर्वांची खरोखरच आभारी आहे.

**मा.रेखा दर्शले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,समाविष्ट गावांतील जी ७ गावे आहेत. मारुंजी,नेरे, ही सर्व गावे पुनावळेच्या पुढची गावे आहेत. पुनावळे गाव नगरपालिकेत जाऊनही या गावांचा २० वर्षांत अजिबात विकास झालेला नाही. पुनावळे गावाच्या नॅशनल ब्रीजखाली दररोज वाहनांची गर्दी होते. या रस्त्यांची सुधारणा करण्यात यावी. या गावांचा विकास करण्यात यावा. त्यापुढे ही गावे समाविष्ट करण्यात यावीत. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, याठिकाणी ही नवीन गावे आपल्या महापालिकेत समावेश करण्याचा विषय आपल्यासमोर आलेला आहे. मागील काळात सुद्धा हा विषय सभागृहापुढे आलेला होता. यात प्रत्येक सदस्याचे मत वेगळे आहे. कोणाला वाटते गावे घेतली पाहीजेत. कोणाला वाटते गावे घेतली नाही पाहीजेत. परंतू यात त्या-त्या गावातील नागरीकांचे मत अत्यंत महत्वाचे आहे असे वाटते. ग्रामपंचायतीचे म्हणणे काय, तिथल्या नागरीकांचे म्हणणे काय. पिंपरी चिंचवड महापालिकेत येण्यासाठी त्यांचा विरोध असेलतर निश्चितपणे घेतले नाही पाहीजेत. त्यांचा विरोध नसेलतर निश्चितपणे आपण तसे प्रयत्न केले पाहीजेत. या मागील पार्श्वभूमी आपल्याला सांगायची आहे. आत्ता समाविष्ट गावांतील नगरसेवकांच्या ब-याच तक्रारी आहेत. त्यांनी मागील काळात वारंवार या विषयावर सभागृहाचे लक्ष वेधले आहे. समाविष्ट गावांत अधिक निधी दिला पाहिजे. त्याठिकाणचा विकास झाला पाहीजे. विकासाच्या दृष्टीकोणातून ही गावे मागे पडली आहेत. एकूण विचार केलातर पूर्वीची पाच गावे होती. भोसरी,आकुर्डी,निगडी, चिंचवड आणि पिंपरी, या पाच गावांची मिळून १९७८ साली ही नगरपालिका स्थापन झाली. त्याआधी नगरपरिषद होती. तेव्हापासून महापालिकेच्या माध्यमातून या गावांचा विकास होतो आहे. म्हणजे इतक्या वर्षांनंतर ही गावे या स्टेजला आहेत. नंतरच्या काळात पिंपळे गुरव असेल, पिंपळे सौदागर असेल, वाकड, रहाटणी, काळेवाडी ही गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर इथला विकास झाला. दिघीपासून तळवडे, पुनावळे ही गावे महापालिकेत समाविष्ट झाली. त्यावेळी या सगळ्या गावांचा महापालिकेत समावेश होण्यासाठी विरोध होत होता, त्यावेळी मा.दत्तात्रय साने या कामात पुढाकार घेत होते. त्यांचे म्हणणे होते, आमची गावे महापालिकेत समाविष्ट करुन घेऊ नये. तिथल्या नागरीकांनी, ग्रामपंचायत यांनी ५/७ वर्षे लढा दिला. त्यांचे म्हणणे होते की, आम्ही महापालिकेत आलो तरी आम्हाला महापालिकेच्या कुठल्याही सुविधा नको. म्हणून तिथे मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकला नाही. तेथे विकास न होण्यामागील हे मुख्य कारण आहे. जर ही पार्श्वभूमी लक्षात घेतली आणि बाकी गावे जी इतकी वर्षे या महापालिकेत आहेत, त्यामुळे त्यांचा इथला विकास आणि तिथला विकास यात फार तफावत आहे. परंतू हे सगळे करत असताना मा.महापौर साहेब, मी आज निश्चितपणे तुमचे मनापासून अभिनंदन करतो. तुम्ही समाविष्ट गावांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला. निधी उपलब्ध करुन दिलात. टेंडर काढले. मघाशी मा.योगेश बहल यांनी सुद्धा सांगितले की, आमचा कामाला मुळीच विरोध नाही. मा.दत्तात्रय साने यांचा कामाला मुळीच विरोध नाही. त्यांचे म्हणणे एवढेच होते की, ही जी कामे काढली आहेत, त्या जागा ताब्यात आलेल्या आहेत का. जागा ताब्यात आल्या असतील तर चांगलेच आहे. त्याठिकाणी महापौरांनी खुलासा करायचा प्रयत्न केला की, निश्चितपणे तसे झाले असेलतर चांगलेच आहे. ज्याठिकाणी रस्त्याचा विकास

होतो, त्याचठिकाणी ख-या अर्थाने त्या परिसराचा विकास होत असतो. आज पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, काळेवाडी, रहाटणी इथले रस्ते झाल्यामुळे तिथला विकास चांगला झाला आहे. इतर शहरांच्या तुलनेत तो परिसर अधिकचा विकसित झाला आहे. कारण इथले रस्ते चांगल्या पद्धतीने विकसित झाले आहेत. या गावांतील अशाच पद्धतीने रस्ते झाले तर निश्चितपणे जागा मालकांना चांगला मोबदला मिळेल. शेतक-यांना चांगला मोबदला मिळेल. तिथल्या तरुणांना चांगला रोजगार मिळेल याची खात्री आहे. परंतू मा.आयुक्त साहेब, हे सगळे करत असताना सर्वांची तक्रार होती की, ज्या निविदा काढल्या गेल्या, त्या पारदर्शकपणे काढल्या गेल्या नाहीत. अशी तक्रार महापालिकेतील प्रतिनिधींनी केली. महापालिकेच्या बाहेरच्या प्रतिनिधींनी पण केली. खरेतर प्रशासनाने खोलात जाऊन चौकशी करायला पाहीजे होती. परंतू प्रशासनाकडून तसे झाले नाही. या निविदा योग्य दराने दिल्या असतील तर आमचा सपोर्ट आहे. चांगले काम होते आहे. निविदा जादा दराने दिल्या असतील तर त्याचे दर कमी केले गेले पाहिजे होते. अजून सुद्धा वेळ गेलेली नाही. काही करु शकलात तर निश्चितपणे शहराचे आर्थिक नुकसान होते आहे, ते कुठेतरी थांबेल अशी आमच्या पक्षाची भूमिका आहे. नुसता विरोधाला विरोध करायची भूमिका राष्ट्रवादी पक्षाची नाही. या भागाचा विकास होत असताना निश्चितपणे आम्ही सहकार्याची भूमिका ठेवली आहे. तुम्ही सर्वजण सत्ताधारी आहात. निश्चितपणे चांगले काम कराल अशी अपेक्षा आहे. परंतू आपण जी गावे घेणार आहात,आपली तयारी आहे का. आपण त्यांना पुरेसे पाणी देऊ शकतो का. आपल्याकडे पुरेशी ड्रेनेज सिस्टीम आहे का या सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केला पाहीजे. मुख्यतः या गावातील लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहीजे. मुळात ही गावे घेण्यामागे भूमिका अशी होती की, राज्य शासन असेल, मागील शासन असेल, ही गावे घेतल्यानंतर तिथे जो बकालपणा आहे तो थांबेल. पिंपरी चिंचवड महापालिका असेल किंवा परिसरातील आजूबाजूच्या भागातील जी गावे आहेत, तिथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे होतात आणि तिथे बकाल स्वरुप येते. म्हणून दोन्ही महापालिका असतील, किंवा शासन इतर महापालिका परिसरातील गावे घेण्याचा प्रयत्न करते. त्या गावांची किंवा ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती इतकी चांगली नसते की ते सगळ्या सुविधा देऊ शकतील. म्हणून शासनाचे हे धोरण आहे की, या गावांमध्ये चांगला विकास करायचा असेलतर निश्चितपणे ही गावे महापालिकेच्या ताब्यात आली पाहीजेत. डि.पी. प्लॅनचा मुद्दा मा.संजोग वाघेरे यांनी मांडला की, आपण डि.पी. प्लॅन करतो. पण खरेच त्याची अंमलबजावणी किती होते हे पण पाहणे गरजेचे आहे. त्याची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने झाली तर, चांगला नियोजनबद्ध विकास होतो. या पुढील काळात ही गावे घ्यायची असतील तर आमच्या पक्षाची भूमिका मला माहित नाही. परंतू माझे वैयक्तिक मत आहे की, ही गावे महापालिकेत निश्चितपणे घेतली जावीत.

**मा.अश्विनी जाधव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, मी प्रथमतः मा.मुख्यमंत्री यांचे व दोन्ही आमदारांचे मा.महेशदादा लांडगे व मा.लक्ष्मणभाऊ जगताप यांचे अभिनंदन करेन. मा.पक्षनेते एकनाथ पवार आणि मा.स्थायी समिती अध्यक्षा सिमाताई सावळे यांचे अभिनंदन करेन. १९८६ मध्ये आपली महापालिका स्थापन झाली. १९९७ मध्ये आमची गावे त्यात समाविष्ट करण्यात आली. मा.महापौर साहेब, १९९७ ते २०१७ तब्बल

२० वर्षे झाली. तरीसुद्धा आमच्या गावांना न्याय मिळाला नाही. आम्ही आज कुठेतरी न्याय मागतोय तर सगळे म्हणताहेत की, ४०५ कोटींचा भ्रष्टाचार झाला. तुम्ही सांगा. भ्रष्टाचार कसा होऊ शकतो. तुम्हीच सांगा. म्हणजे बाळ जन्माला आहे आणि आज ते २० वर्षांचे झाले आहे. जर तुम्हाला वाटते की भ्रष्टाचार झालातर, तुम्ही पुरावे सादर करा. एक भूमिपुत्र म्हणजे तुम्हाला काय वाटते, गावाबाहेरचे कुत्रे आहे का. गावाबाहेरच्या कुत्र्याला व भूमिपुत्राला तुम्ही काय वागणूक देता आहात हे पहिले स्पष्ट करा. आज सत्तेतील खासदार यांनी पहिला राजिनामा द्यावा. नंतर आमच्या विरोधात भाषा करावी. आज कचरा डेपोचा प्रश्न आमच्या दादांनी हाती घेतलेला आहे. त्याला सुद्धा तुम्ही विरोध करताय हे कुठले राजकारण आहे. आज मा.महेशदादा लांडगे प्रयत्न करतात. मा.मुख्यमंत्री त्यांना प्रतिसाद देतात. २० मी. सिमारेषा कुठेतरी कमी झाली आहे. भारतीय जनता पार्टीला कुठेतरी न्याय मिळतोय तर तुम्ही भ्रष्टाचाराविरुद्ध आरोप का करताय. एवढे बोलते व थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.सारीका सस्ते** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, मी प्रथमतः महापौर, मा.महेशदादा लांडगे, मा.लक्ष्मणभाऊ जगताप, पक्षनेते आणि मा.सिमाताई सावळे यांचे अभिनंदन करते. पहिल्यांदा वीस वर्षांनंतर आमच्या समाविष्ट गावांना न्याय मिळाला आहे. हा न्याय मिळाला म्हणूनच बाकीच्यांच्या पोटात दुखायला लागले आहे. मघाशी त्यांनी सांगितले की, आमचा विकास कामांना विरोध नाही. पोटात दुखत नाही मग होतयं काय. रिंग झाली, भ्रष्टाचार झाला, हे झालं, ते झालं. २० वर्षांपूर्वी या सगळ्या गोष्टी तुम्हाला दिसल्या नाहीत का. जेव्हा गावं खितपत पडली होती. कोणी डोकवून सुद्धा पाहिले नाही की, रस्ते आहेत का बाबा. ॲम्ब्युलन्स कशी जाईल. २० वर्षांपूर्वी कोणीही हा विचार केला नाही. फक्त टीडीआर घ्यायचे. आमच्या गरीब भूमिपुत्रांच्या जमिनींवर आरक्षणे टाकली. डेव्हलपमेंट शून्य. आम्ही फक्त आस लावून बसलो, कोणीतरी येईल, आमचा विकास करेल. आमच्या शेतक-यांना चांगला पैसा मिळेल. पण कोणीही आमच्या गावाकडे रोखून पाहीले नाही. फक्त कोणीही विकास कामे करायला लागला की खो घालायचा. कुठून तरी पत्र यायचे की, नाही राज्य सरकार करणार, पालिका नाही करणार. या सगळ्या गोष्टी कशाला. विकास कामांचे राजकारण का करताय. मागे काही सभांमध्ये मी ऐकले होते की, जनता त्यांना बघून घेईल. काय चाललेय. बीजेपी काय करतेय. त्याच जनतेचा विचार २० वर्षांपूर्वी का केला नाही. आमची गावं खितपत का पडू दिली. टीडीआर घेतला. तुमच्याकडे डेव्हलपमेंट केलीत. कशासाठी या सगळ्या गोष्टी. वर्तमानपत्रांमध्ये रोज न्यूज येतात. रिंग झाली, भ्रष्टाचार झाला, हे झाले, ते झाले. दादांना, भगिनींना मी विनंती करते, तुम्ही त्यावेळी न्यूज का दिली नाहीत की, समाविष्ट गावांमध्ये विकास कामे काही झाला नाहीत. आत्ता तिथे विकास कामे होणार आहेत तर त्यात विरोधात सगळे लिहित आहात. तुम्हाला विनंती आहे की, त्यांचे ऐकून असे काही प्रिंट करु नका. जे आहे तेच प्रिंट करा. समाविष्ट गावांना दादांनी एवढी चांगली संधी दिली आहे. आम्ही विकास कामांसाठीच उभे आहोत. तुम्ही असे वेगळे प्रिंट करुन आमच्या पक्षाची बदनामी करु नका. तुम्हाला हात जोडून विनंती आहे. मा.महापौर साहेब, पंधरा वर्षांपूर्वी हे रस्ते झाले असतेतर महापालिकेचे कोट्यावधी रुपये वाचले असते. या सगळ्या गोष्टींना कोण जबाबदार आहे. सांगा मला कोण जबाबदार आहे. तुम्हीच ना. आता सिमेंट वगैरेचे रेट काय वाढले

आहेत. त्याचवेळी हे झाले असतेतर ही वेळ आली नसती. सगळेजण म्हणतात कॉस्ट सेव्हींग. कॉस्ट वाढली हे झालं,ते झालं. मग तुम्ही त्यावेळीच रस्ते का केले नाहीत. हे आत्ताच दिसतयं का. २० वर्षांपूर्वी का हे दिसलं नाही. समाविष्ट गावांमध्ये १५ वर्षांत खासदारांनी कोणती कामे केलीत ते दाखवा. नुसता चाबुक ओढण्याचे काम करतात ते. काही करत नाहीत. आता आमचे आमदार मा.महेशदादा लांडगे यांनी समाविष्ट गावांत विकास कामांचा धडाका लावला तर तुम्हाला तो भ्रष्टाचार वाटतोय, रिंग वाटतेय. हे विकासाचे राजकारण करायचे सोडा. समाविष्ट गावांत शेतक-यांच्या शेतीवर रोडचे आरक्षण टाकले मान्य आहे. एकही डेव्हलपमेंट झाली नाही. आमचा शेतकरी आस लावून बसला आहे. २० वर्षांत कोणीही डोकावून पाहिले नाही. आज सुद्धा ते आस लावून बसले आहेत. आत्ता त्यांना डेव्हलप करुन द्यायची आम्हाला संधी मिळाली आहे. तरी ही रिंग वाढतेय, भ्रष्टाचार वाढतोय. आमच्या मोशी गावात कचरा डेपो आहे. सगळ्या पिंपरी चिंचवडची घाण इथे येऊन टाकतात. तेव्हा वाटत नाही का, नागरीकांना त्रास होतो आहे. तिथे जगणे मुश्किल झाले आहे. लहान मुले आजारी पडतात. त्यांना नेण्यासाठी सुद्धा रोड व्यवस्थित नाहीत. आमच्या आमदार महेशदादा लांडगे यांनी वेस्ट एनर्जी प्रकल्प करायचा विचार केलातर तुम्ही लोकांनी त्यालासुद्धा खो घातला. हे चालणार नाही. आम्ही विकास कामाला अडथळा येऊ देणार नाही. आम्ही विकास कामांसाठीच प्रतिनिधी झालो आहोत. आणि आम्ही फक्त विकास कामेच करणार आहोत. आमच्या गावातील स्थानिक शेतक-यांना रस्ते नसल्यामुळे त्यांची काहीच विकास झाला नाही. त्यांच्याकडे फक्त आरक्षणे झालीत. त्यांची रोजीरोटी शेतीवर आहे. ती सुद्धा तुम्ही घेतलीत. त्यासाठी तुम्ही विचार करा. तुम्ही २० वर्षांपूर्वी काय केले. आणि आम्ही आत्ता विकास करतोय तर तुम्हाला तो भ्रष्टाचार वाटतोय. नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंतचा रस्ता वाढवण्याचे पत्र आमच्या दादांनी दिले होते. त्यात सुद्धा खासदारांनी खो घातला. नाही हा रस्ता राज्य सरकार करणार आहे, महापालिकेकडे एवढा निधी नाही. काय या गोष्टी. असे झाले नाही पाहीजे. विकास कामांमध्ये विकासच झाला पाहीजे. Lastly I think you people do not have that right to blame on us. Where were you, since last 20 years, when our peole are suffering all this? एवढे बोलते. मा.महापौर साहेब, आपण मला बोलायला संधी दिलीत, त्याबद्दल आपले खूप खूप धन्यवाद.

**मा.उषा उर्फ माई ढोरे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. विषय मंजूरच होणार आहे. मा.महापौर साहेब, आपण अतिशय नशिबवान आहात. गहुंजे,माण,जांबे,मारुंजी,हिंजवडी,सांगवडे,नेरे अशी सात गावे आपण आपल्याकडे घेतो आहोत. मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले ते अतिशय बरोबर आहे. ज्यावेळी आपण आपल्या महापालिकेचा परिसर वाढवत असतो, त्याबरोबर आलेल्या लोकांना वेगळा उत्साह त्यांच्यात असतो की,आपले गाव महापालिकेत समाविष्ट होणार आहे. मग आपल्याला चांगले रस्ते, लाईट, गल्लीबोळांत दिवसा व रात्री यात आपल्याला फरक जाणवणार नाही अशी लाईट तिथे आपल्याला मिळेल. आपल्याला भरपूर पाणी मिळेल. महिलांना तर खूप आनंद होईल. आपल्याला सगळ्या सुविधा मिळणार आहेत. आपण या सुविधा केल्याशिवाय राहणार नाही. आपला विषय शासनाकडे गेल्यानंतर राज्य शासन आपल्याला मान्यता देणारच आहे. मान्यता मिळेपर्यंत आपण असे प्रयत्न करावेत की, भामा-आसखेडचे पाणी आपल्याकडे आले

पाहीजे. मुळात पाण्याचाच प्रश्न उद्धवणार आहे. बाकी कुठलाही प्रश्न येणार नाही. डीपीतील कामे टप्याटप्याने होणारच आहेत. पाणीपुरवठा करत असताना महिलांची फक्त नजर इकडे राहील की, घराघरांत पाणी येणार आहे. ज्यावेळी गावे ताब्यात घेऊ त्यावेळी प्रत्येक घरात भरपूर पाणी कसे जाईल यासाठी आपण प्रयत्नशिल असले पाहीजे. बाकी ज्या-ज्या पद्धतीने डेव्हलपमेंट करणार आहोत. एवढेच सांगू इच्छिते की, जी गावे घेणार आहोत, त्या प्रत्येक गावांत खास शेतकरी वर्ग आहे. शेतकरी वर्ग म्हटला की, प्रत्येकाची शेती त्याठिकाणी आहे. डेव्हलपमेंट प्लॅन करत असताना एका शेतक-यावर अन्याय होणार नाही अशी अट टाकू नये. यासाठी प्रशासनाकडे विचारपूस करावी. रस्ता, रिंगरोड करणार आहोत. ते देखील डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये टाकणार आहोत. आपण पाहतोय, रिंगरोडचा प्रश्न किती गाजत चाललेला आहे. ज्यावेळी प्लॅन करणार आहोत. वेगवेगळ्या गावांमध्ये अशी माहिती पुरवली गेली पाहीजे की, त्याठिकाणी वस्ती वाढणार नाही. कुठे ऍक्विझिशन आहे. त्याचा प्रचार त्या भागात झाला पाहीजे. आपण काही ठिकाणी पाहतो. माझ्या वॉर्डमध्ये रिंग रोड करतोय. एका ठिकाणी एक महिला आहे. ती कोर्टात गेली आहे. ती अजूनही आम्हाला तिथे रस्ता करु देत नाही. आज उद्या देईल पण अशी अडवणूक शहराचा विकास करताना होते. ही अडवणूक होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी. ती आपण घ्याल. मा.सिमाताई सावळे यांनी बजेटला ४२५ कोटींची मंजूरी दिली. अशीच पुढील चेअरमन बजेटला मंजूर करायला संधी देतील. ही गावे लवकरात लवकर समाविष्ट करुन घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करते व थांबते.

**मा.मिनल यादव**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,ही गावे समाविष्ट करावीत अशी आमचीही अपेक्षा आहे. पण हे करायची आत्ता ही योग्य वेळ आहे का याचा सुद्धा विचार करा. पिंपरी चिंचवड महापालिकेसमोर कचरा, पाणी, आरोग्य या मोठ्या प्रमाणावर समस्या आहेत. आत्ता सध्याच्या परिस्थितीत नगरसेवकांवर चार-चार गुन्हे दाखल होत आहेत. ही गावे महापालिकेत समाविष्ट केलीतर पुढील काळात अजून वाईट चित्र आपल्यासमोर येऊ नये म्हणून जुनी समाविष्ट गावे यांचा विकास होतो आहे का. उगीचच एक एक ऍड करत जायचे आणि अंगावर घेऊन शिव्या खायच्या याचा काहीच उपयोग नाही. आत्ताच पाणी पुरत नाही. त्यामुळे ही गावे ऍड केल्यानंतर आहे त्यांना अजून टंचाईचा सामना करावा लागेल. त्यामुळे सध्या ही योग्य वेळ आहे का याचा नक्की विचार करावा.

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, ९७ सालापासून आजपर्यंत समाविष्ट गावांबद्दल चर्चा करायची पद्धत अबाधित आहे. नगरसेविका भगिनींनी आपल्या भागातल्या विकास कामांबद्दल अतिशय उत्तम विवेचन केले. त्या खरोखर अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी विकास कामांसंदर्भात पोटतिडकीने प्रश्न मांडण्यासाठी इथे पुढाकार घेतला. खरेतर या सभागृहात कोणत्याही नेत्याचा नामोल्लेख करणे उचित नाही. पण तुम्ही सभागृहात नाव घेत असताना मा.महेशदादा लांडगे असतील, त्यांचे मोठे बंधू असतील, मा.लक्ष्मणभाऊ जगताप असतील, ते आज नेतृत्व करत आहेत. आम्हाला देखील आनंद आहे की, मागच्या २० वर्षांत तेच आमचे नेतृत्व करतील. त्यामुळे त्यावेळी त्यांची चूक झाली

असेलतरी मी दिलगिरी व्यक्त करतो व चांगल्या कामांसाठी चांगल्या शुभेच्छा देतो. याठिकाणी नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर होत असताना, हे सगळे परिवर्तन होत असताना नियोजन आराखडा म्हणजे नेमके काय. यांचे गांभिर्य कोणीच घेतला नाही. कोण कोण नेतृत्व करत होते. मा.आण्णासाहेब मगर यांच्यापासून ते आत्तापर्यंतच्या कालखंडामध्ये याहीपेक्षा प्रशासन जे काय खेळ करतय, त्याचे प्रायश्चित्त आम्ही सर्व नगरसेवक घेतो आहोत. मा.एकनाथ पवार, जोपर्यंत या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टी म्हणून, राष्ट्रवादी काँग्रेस म्हणून पाहत बसलो आणि बोलत बसलो, तोपर्यंत आपण एकमेकांवर निश्चित आरोप करत राहणार आहोत. परंतू या शहराचे विश्वस्त म्हणून, या महापालिकेचे विश्वस्त म्हणून पाहू. त्यावेळी साकल्याने विचार करा. प्रशासन आपला चेंडू तर करत नाही ना. कारण गेली २५ वर्षे ते कसा चेंडू खेळत आहेत हे आम्ही पाहतोय. याच परिस्थितीचे गांभिर्य ठेवून नगरपालिकेने अनेक कासारवाड्या तयार केल्या. प्राधिकरणाने अनेक रहाटणी, काळेवाड्या तयार केल्या. शहराचे बकाल स्वरुप केले. धनकवडी गाव जेव्हा पुणे महापालिकेत आले होते, तेव्हा या खिडकीतून त्या खिडकीत भाजी जायची. तीन गुंठ्यांत सात हजार स्क्वे.फूट एफ.एस.आय.चा वापर जायचा. तुम्हाला गावं घ्यायची असतील तर मागचा जो प्रकार झाला, तोच आज पुन्हा होणार आहे. माझे नम्र आवाहन आहे की, मागे कोणी काय केले. सगळ्यांच्या तोंडी सगळ्यांच भविष्य, सगळ्यांचा वर्तमान आम्हाला माहित आहे. मा.एकनाथ पवार पूर्वी चांगलेच टिका करायचे. कोणावर टिका करायचे हेही आम्हाला माहित आहे. मा.सिमाताई सावळे यांची तर आक्रमक आंदोलने. आता दुःख होतेय, की त्या आता स्थायी समितीच्या चेअरमन पदी बसल्या आहेत. दुःख म्हणजे आनंद पण होतो आहे की, तुम्ही त्याठिकाणी आता शांत बसला आहात. सगळ्या परिस्थितीचे भान ठेवायचे, ते सगळे करत असताना मा.सिमाताई सावळे, मा.एकनाथ पवार यांना विनंती करतो की, नियोजन आराखडा करायचा असेलतर तातडीने करा. नाहीतर धनकवडी होईल, रुपीनगर होईल, काळेवाडी होईल. आणि वाल्हेकरवाडीतला काही भाग होईल. राजकारणातही आपण काहीतरी विचार करु यात. आमचे काही चूकत असेलतर आम्हाला साकल्याने समजून घ्या. समजण्याइतपत आम्ही सुद्धा समजदार आहोत. असा काही संशय घ्यायचे कारण नाही. पण तुम्ही जर विचारलेच नाही. हे करतोय ते चुकीचे करतोय. हा बोलतोय, कोण बोलतोय, राष्ट्रवादीचा बोलतोय मग तो चुकीचेच बोलतोय अशा भावनेतून केलेतर आपला चेंडू काय आपल्याला दर पाच वर्षांनी निवडणूकांना सामोरे जावे लागते. काय कार्यक्रम करावे लागतात, काय खर्च करावे लागतात हे तुम्हाला सांगायची गरज पण नाही. हे हे सगळे भोगतात. अधिका-यांना काय ते पर्मनन्ट आहेत. आपण टेम्परररी आहोत. पर्मनन्ट माणसे टेम्परररी माणसाची काय चेष्टा करत असतात. हे आपली चेष्टा करत आहेत. म्हणून माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, डी.पी. करायचा असेलतर तो ताबडतोब करा. कारण ज्यादिवशी महापालिकेचा नियोजन आराखडा कसा असतो, हा लिक होतो. कोणत्या ठिकाणी आरक्षण आहे, त्याठिकाणी त्याची ताबडतोब विक्री होते. या संपूर्ण परीसरात ज्या गावांचा नामोल्लेख होतो आहे, तिथे प्लॉटींग चालू आहे, ले-आऊट चालू आहेत. तिथे माझे पण प्लॉटींग असेल. मला पण पैसे कमावयचे आहेत. इथल्या पेक्षा तिथे बरं आहे. मी सुद्धा बांधकाम व्यावसायिक आहे. तुम्ही या सर्व परिस्थितीचे पूर्ण भान ठेवत असालतर या शहराची पूर्ण धारावी होते आहे का अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने टिंगळटवाळी करायचे बंद करा. आम्ही

भांडतोय, तुम्ही मजा करताय. आमचा नगरसेवक तिथे आनंद लुटतो. तुमच्या अधिका-यांना काय बोलले तर तुम्ही काळ्या फिती लावून बसता. हा या पक्षाचा आहे, तो या पक्षाचा आहे. पण सभागृह म्हणून तुम्ही कुठेतरी पावित्र्य ठेवावे. यासंदर्भात पुढाकार घ्यायचा झालातर आम्ही निश्चित घेऊ. पण हा सगळा खेळ प्रशासन करते आहे. विकास कोण करतोय, किती केला, कोणी केला यापेक्षा तो योग्य तिथे व्हावा म्हणून बोलत असेलतर त्याचे उत्तर शोधावे. दरवाज्याच्या बाहेर राजकारण करायला सर्वजण मोकळे आहेत. आमची पण तयारी आहे. तुमची पण तयारी आहे. या सर्व परिस्थितीचे भान महापालिकेच्या प्रशासनाने व आयुक्त साहेबांनी ठेवावे. गंमतजंमत करु नका. एक दिवस आम्ही तुमची गंमतजंमत करु. या सर्व पार्श्वभूमीवर नियोजन आराखडा ताबडतोबीने करायचा असेलतर ताबडतोब करा. नियोजन आराखडा हा पहिला लिक होतो. कोण देतो, काय देतो. कोणत्याही नगरसेवकाने मागायला जा, बिल्डरच्या पी.ए. ने जा. त्याला पहिले मिळेल. त्याला संपूर्ण माहिती मिळेल. नगरसेवकाला मिळणार नाही. आणि मिळाली तरी त्याला चुकीची माहिती मिळेल. असे सगळे चालू आहे. या शहराचे बकालीपण होऊ नये. आज हिंजवडीची काय परिस्थिती आहे. तीन गुंठ्यांत आठ हजार, नऊ हजार. एखादा माणूस गेलातरी घरात जायला रस्ता नाही. या सर्व परिस्थितीचे भान ठेवून नियोजन आराखड्याचा अर्थ असा असतो की, सुनियोजित, नियोजनबद्ध शहर होण्याच्या दृष्टीकोणातून विचार केला पाहीजे की, किती लोकसंख्या होणार आहे, किती रस्ते लागणार आहेत, किती शाळा लागणार आहेत याचे उत्तम नियोजन म्हणजे नियोजन आराखडा. मागे काय झाले ते दुरुस्त करणार नसालतर इतिहास तुम्हाला माफ करणार नाही. म्हणून मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, प्रशासनाने आमची टिंगलटवाळी करु नये. हा विषय ताबडतोब मार्गी लावावा.

**मा.राहूल कलाटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र, नव्याने येणा-या गावांना निश्चितच शिवसेनेचा, आमचा कोणाचाही विरोध नाही. ही गावे महापालिकेत घेत असताना मा.महापौर साहेब तुमचे धन्यवाद द्यायला पाहीजेत. आमचा कामाला विरोध नाहीतर कामात झालेल्या रिंगला विरोध आहे. अधिका-यांना पत्र देऊन सुद्धा त्यांनी कारवाई केलेली नाही. या मुद्यात न जाता एकच सांगायचे आहे की, आमची गावे पहा. तुम्ही स्वतः महापौर आहात. तुम्हाला पैसा नेता आला. लोकांची कामे झाली. याबद्दल कोणाचेही दुमत नाही. आज वाकड पाहीले. ताथवडे पाहीले. पुनावळे पाहीले. ज्या प्रभागातून मी आलो. मा.रेखा दर्शले ताईंनी पण त्यांची व्यथा मांडली. पाण्याची इतकी वाईट अवस्था आहे की, वाकडला पाणी नाही. तुम्ही पवना जलवाहिनी का करत नाही. गल्लीपासून दिल्लीपासून तुम्हीच आहात. आम्ही सुद्धा तुमच्याबरोबर आहोत. तुम्ही जेव्हा आमदारांचे कौतुक करता तेव्हा खासदारांवर टिका करता. तेच पूर्वी तुमचे नेतृत्व करत होते. आत्ताच भाऊसाहेबांनी सांगितले. विकासाबाबतीत पक्ष बाजूला ठेवून विकासात तरी एकत्र या. आजही आम्ही सांगतो की, आमचा ही गावे घ्यायला कुठेही विरोध नाही. वाकड इथली परिस्थिती पाहीली. एक काम काढले. पूर्ण वाकडला या बजेटमध्ये सिमाभिंतीचे एकच काम काढले आहे. पुनावळेला चार/पाच रोड दिलेत, त्याबद्दल धन्यवाद. एक सिमाभिंत आणि गार्डनच्या भिंतीसाठी पण आम्हाला पत्र द्यावे लागले. आमचा विकास कामाला विरोध नाहीतर कामाच्या पद्धतीला विरोध आहे. ही कामे तुम्ही

कशासाठी काढताय. तुम्ही लोकांच्या हितासाठीच कामे काढताय. कोणाचे खिसे भरण्यासाठी कामे निघत नाहीत. मा.भाऊसाहेब भोईर यांनी बरोबर सांगितले. प्रशासन तुमच्या आमच्यात भांडणे लावतयं का. आज हिंजवडीची काय अवस्था आहे. सातही गावांच्या ग्रामपंचायतींची काय परिस्थिती आहे. ते ठराव करुन द्यायला तयार आहेत. पेपरला वाचले, तुम्ही गावे घेणार आहात. आम्हाला इलेक्शनला उभे रहायचे आहे. त्यांचे म्हणणे आहे की, तुम्ही आज ठराव करणार आणि उद्या आमची गावे घेणार. या गोष्टीला कुठेतरी प्रायोरीटी पण द्या. प्रशासनाला सांगणार असेन, मला वाटते नगरसेवक विकास डोळस यांनी सुद्धा हेच सांगितले की, आमचा कामाच्या पद्धतीला विरोध आहे. कामाला विरोध नाही. आज रोड, ड्रेनेज, बेसिक वॉटर. दूधेकर साहेब इथे असतील. आठ दिवसांपासून पाण्याला प्रेशरच नाही. बेसिक नीडस् पूर्ण करा नवीन गावे घ्या पण त्यांची बकाल वस्ती होणार नाही हे बघा. धनकवडीची परिस्थिती काय झाली, हिच परिस्थिती आज हिंजवडीची झाली आहे. आज हिंजवडी आपल्या महापालिकेत आल्यावर जगाच्या पाठिवर आपले नाव जाईल. ती सॉफ्टवेअर सिटी आहे त्यामुळे आज आपण एका मिनिटांत जगाशी कनेक्टेड होतो आहोत. बालेवाडीला पाणी देतोय. हिंजवडीला पण पाणी देतोय. ही गावे घेत असताना त्यांचा नियोजनबद्ध विकास झाला पाहीजे. त्यांच्या बांधकामांचे काय. त्यांची गावठाणातली बांधकामे, उद्या महापालिकेत आल्यावर आमची बांधकामे अनधिकृत होणार या भितीने आज ते त्रासलेले आहे. यांच्यात सुद्धा दुमत आहे. त्यांना वाटते की, आपल्याकडे रस्ते होतील, वीज मिळेल, पाणी मिळेल. पण त्यांच्यातील काही जणांची अशी अवस्था आहे की, आहे ही आपली घरे पाडायला लागतील. जुनी घरे, ग्रामपंचायतीतील घरे आहेत. कोणाचीही रेग्युलराईज नाहीत, कोणाचीही परमिशन घेतलेली नाहीत. करायचे असेलतर लवकरात लवकर करा. देहूगाव महापालिकेत येणार असेलतर आपण भाग्यवान आहोत. जगात कुठेही गेलोतरी संत तुकाराम महाराज यांची गाथा वाचायला मिळते. पक्ष म्हणून, शिवसेना म्हणून आमचा या ठरावाला पाठिंबा आहे. फक्त यावर जी काही कारवाई करायची आहे ती लवकरात लवकर करावी. त्याअगोदर आमच्या गावांना देखील तुम्ही ज्या पद्धतीने काम केले त्या पद्धतीने विकास निधी आम्हाला सुद्धा द्या. पुन्हा एकदा सांगतो, कामाला विरोध नाही. कामात झालेल्या अनियमिततेला विरोध आहे. पुन्हा एकदा सांगतो कामाला कोणाचाही विरोध नाही. धन्यवाद.

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र, आज सभागृहापुढे नवीन गावे समाविष्ट करायचा विषय आला आहे. पहिल्यांदा १९९७ साली १६ गावे समाविष्ट केली होती. त्यानंतर २०१८ला हा विषय सभागृहापुढे आणलेला आहे. जर इच्छाशक्ती असेलतर काहीही होऊ शकते. किंवा ग्रामिण भागाच विकास करायचा असेलतर आपण तो नक्कीच करु शकतो. परंतू मनात शंभर टक्के इच्छाशक्ती पाहीजे. त्यामुळे आज आपण विचार केलातर १९९७ मध्ये महापालिकेत समाविष्ट झालेली गावे, त्यानंतर २००० मध्ये निवडणूका झाल्या. राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी प्रामाणिकपणे सांगावे की, ग्रामिण भागातल्या जनतेने राष्ट्रवादीला झुकते माप दिले. २००७ मध्ये निवडणूका झाल्या त्यावेळी राष्ट्रवादीला झुकते माप दिले. २०१२ ला निवडणूक झाल्या, त्यावेळी देखील ग्रामिण भागातल्या जनतेने राष्ट्रवादीला झुकते माप दिले. प्रत्येक वेळी विश्वास ठेवून जर भ्रमनिरास होत असेलतर जनता

देखील वेगळा निर्णय घेत असते. म्हणून २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टीवर विश्वास ठेवला. जर त्यांचा विश्वास सार्थ ठरवायचा असेल आणि ग्रामिण भागांत मोठा मोठा निधी देऊन कामे काढली असतील, जर या गावांचा विकास होणार असेलतर काय चुकीचे आहे. कामे झाली पाहीजेत, आणि ही इच्छाशक्ती आमच्या नेत्यांची आहे. म्हणून हा एवढा मोठा निधी ग्रामीण भागासाठी काढला आहे. २०१२ ला मी सभागृहापुढे आलो. या सभागृहात समाविष्ट गावांतील लोकप्रतिनिधी आत्ता सुद्धा आहेत. २०१२ पासून आम्ही देखील या सभागृहात बोलतोय की, समाविष्ट गावांना चांगला निधी द्या. जेणेकरुन समाविष्ट गावांचा विकास होईल. जर तुम्ही त्या भागासाठी पहिल्यापासून कमी निधी देताय. तिथे मेटेनन्सची सुद्धा कामे झालेली नाहीत. मग त्या भागातून तुम्ही कररुपाने जो करोडोंनी पैसा येतो आहे, तो तुम्ही थांबवलात का. टीडीआर रुपाने पैसा आला, तो तुम्ही थांबवलात का. त्याठिकाणी टीडीआर रुपाने जो पैसा आला, तो तुम्ही थांबवलात का. या ग्रामिण भागाकडून महसूल रुपात जो पैसा महापालिकेकडे येतो आहे तो तुम्ही थांबवलात का. सर्व काही घेताय. मग त्याठिकाणी विकास कामे करायला हरकत का. आज आम्हाला देखील खंत वाटते की, आमच्यावर सुद्धा जनतेने विश्वास ठेवला. कच-याचा विषय असेल किंवा इंद्रायणी नदीचा विषय असेल. इंद्रायणी नदी शंभर टक्के आज सुद्धा दुषित आहे. परंतू याचा विचार केलातर ज्यावेळी पिंपरी चिंचवड महापालिकेने गावे समाविष्ट केली, त्यानंतर उद्योगधंदे वाढले, त्यानंतर रसायनमिश्रित पाणी इंद्रायणीनदीत गेले, त्यानंतर इंद्रायणी नदी दुषित झाली. त्यामुळे तिथे वेगळ्या पद्धतीने विचार का करु शकले नाहीत की, तिथे एसटीपी करावा. आज तिथे एसटीपीवर सुद्धा निधी ठेवला आहे. मला सभागृहाला आवर्जून एक विषय सांगायचा आहे की, त्याठिकाणी आज स्थायी समितीच्या माध्यमातून निधी ठेवलेला असलातरी जी-जी आरक्षणे ताब्यात आली आहेत, त्याचठिकाणी निधी ठेवलेला आहे. ज्याठिकाणी रस्ते ८० टक्के ताब्यात आले आहेत, त्याचठिकाणी आपण निधी ठेवलेला आहे. आज एसटीपी असेल. ठिक आहे. १०/२० टक्के शेतकरी ताबा देत नाहीत. तो राहून गेला आहे. परंतू ८० टक्के जागा ताब्यात आल्या आहेत. तिथे कामे होणार आहेत. मग विरोध कशासाठी. विरोध करणारे सुद्धा आपलेच. निधी ठेवणारे सुद्धा आपलेच. आणि विकास करायचा म्हणून कळकळीने त्याठिकाणी समाविष्ट गावांतील व्यथा मांडायचे काम सुद्धा आपलेच नगरसेवक करत आहेत. त्यामुळे मा.महापौर साहेब, मी तुम्हाला याठिकाणी प्रामाणिकपणे विनंती करतोय की, समाविष्ट गावांमध्ये खेळाचे मैदान असेल, ड्रेनेजचा विषय असेल, पाणीपुरवठ्याचा विषय असेल, विद्युतचा विषय असेल, किंवा आपले जुने नैसर्गिक नाले असतील, हा सुद्धा विषय गेले २० वर्षांपासून पेंडींग आहे. नैसर्गिक नाल्यांचा विचार केलातर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून स्थापत्य विभागाच्या माध्यमातून दहा/पंधरा वर्षांपूर्वीच कामे व्हायला पाहीजे होती. परंतु आजतागायत ही कमे झालेली नाहीत. हे नाले त्या काळात बांधले असते तर इंद्रायणी नदीमध्ये दूषित पाणी गेले नसते. आज खेळाच्या मैदानाचा विचार केलातर एवढी चाळीस बेचाळीस आरक्षणे टाकून ठेवली आहेत. मा.महापौर साहेब, आपल्या प्रभागामध्ये माझ्या माहितीनुसार १३० आरक्षणे आहेत. मा.महापौर साहेब, आपण प्रामाणिकपणे सांगावे, त्यातली किती डेव्हलप झाली आहेत. वीस वर्षांत आत्तापर्यंत एकही आरक्षण तुम्ही देऊ शकला नाहीत. तुमच्याकडून काय अपेक्षा करायची. आज आम्ही त्याठिकाणी अ प्रपत्र देऊन ब प्रपत्र भरून घेतले. आम्ही आमच्या मानसिकतेनुसार ग्रामिण भागांत काम करायचा प्रयत्न करतोय. तुम्ही

आम्हाला साथ द्या. आम्हाला मदत करा. शंभर टक्के ग्रामिण भागाचा कायापालट केल्याशिवाय आम्हीसुद्धा राहणार नाही. ही आमची इच्छाशक्ती आम्ही तुम्हाला शंभर टक्के दाखवून देऊ. कारण २०१२ मध्ये ही आश्वासने देऊन आम्ही या सभागृहात आलो. शंभर टक्के आमच्याकडून देखील या जनतेचा भ्रमनिरास झाला. परंतू आम्ही देखील २०१७च्या निवडणूकीमध्ये ठामपणे सांगितले की, यावेळी आम्ही तुमची कामे करु. त्यामुळे आम्ही जनतेला बांधील आहोत. त्यामुळे आम्हाला ही कामे करायचीच आहेत. आम्ही देखील जनतेची कामे करणार आहोत. जनतेला जे जे काय पाहीजे ती कामे या समाविष्ट गावांत करण्याचा आमचा मानस आहे. मला मा.भाऊसाहेब भोईर यांच्याकडून एक गोष्ट कळाली. मा.भाऊसाहेब भोईर मला खूप सिनिअर आहेत. या शहराचे प्रतिनिधित्व या शहराचे शहराध्यक्ष मा.लक्ष्मणभाऊ जगताप आणि मा.महेशदादा लांडगे यांनी केले. मला तर असे वाटले, वीस वर्षे महापौर मा.लक्ष्मणभाऊ जगताप होते आणि वीस वर्षे स्थायी समितीचे अध्यक्ष मा.महेशदादा लांडगे हेच होते. दूसरा कोणी लोकप्रतिनिधी याठिकाणी झालाच नाही. का सगळी पदे या दोघांना होती. हे पण याठिकाणी काही कळालेले नाही. त्यावेळी त्यांच्याकडून ही कामे झाली नसतील, पण आज त्यांच्याच माध्यमातून या शहरात शंभर टक्के विकास होणार आहे. आणि तो विकास येणा-या काळात या शहराला दिसून येईल. त्यामुळे येणा-या काळामध्ये आपण सर्वांनीच सहकार्य करावे. ग्रामिण भागाने आजपर्यंत जे भोगलेले आहे. शंभर टक्के सासूरवास भोगलेला आहे. ग्रामिण भागाला चांगले दिवस येतील. त्यासाठी म्हणून सर्वजण मिळून याठिकाणी चांगली कामे करु यात. ज्या काही कामांसाठी तुमची मदत लागेल ती मदत तुम्ही मोठ्या मनाने करा. जे तुम्ही करु शकता नाहीत, ते आम्ही करतोय म्हणून आम्हाला मदत करा. हे देखील या निमित्ताने सांगतो. तुम्हाला अच्छे दिन शंभर टक्के दाखवू हे मी तुम्हाला या सभागृहामध्ये ठामपणे सांगतो. कारण विकास करणार म्हणजे करणार. माझ्या बाजूलाच विकास बसलेला आहे. त्यामुळे मी सुद्धा ध्येयवेडा झालेलो आहे. विकास होणार. शंभर टक्के विकास होणार. म्हणून आज हे सांगताना देखील आनंद वाटतोय की, आज या गोष्टीला विरोध करताय. या सभागृहात आज जश्या पौर्णिमाताई सोनवणे आल्या, तसेच मा.दत्तात्रय साने आणि मी सुद्धा अश्याच गणवेषात आलो होतो. आणि आम्ही सुद्धा त्यावेळी ग्रामिण भागासाठी विशेष पॅकेज मागितले होते. नाही जमले ना, आम्ही निधी देऊ. पाहिजे तेवढा निधी देऊ. तो सुद्धा विकास करुन दाखवू. मी एक गोष्ट आवर्जून सांगतो, मी २०१२ ला म.न.से. तून निवडून आलो होतो. २०१४-१५ मध्ये मला उपोषण करावे लागले होते. त्यावेळी मी तीन दिवसांचे आमरण उपोषण केले. मा.राजीव जाधव हे आयुक्त म्हणून नवीनच आले होते. मा.महापौर साहेब, त्यावेळी उपोषण सोडवायला आयुक्त साहेबांना कोण घेऊन आले असेल? मा.दत्ता काका साने आयुक्तांना घेऊन उपोषण सोडवायला जाधववाडीत आले होते. उपोषण कशासाठी होते, समाविष्ट गावांना विशेष निधी द्या, जेणेकरुन आमच्या गावांचा विकास होईल. त्यावेळी काकांना एवढा कळवळा आला होता. आज काका विरोध कशासाठी? हे माझे प्रामाणिक मत आहे. त्यावेळी स्थायी समितीचे सभापती मा.महेशदादा लांडगे हे होते. त्यावेळी त्यांनी ८.५० कोटी निधी वाढवून दिला. त्यावेळी शिवेचे रस्ते असतील, देहू-आळंदी परिसरातील रस्ते असतील, आपण त्या निधीतून केले. त्याचवेळी या ग्रामिण भागांत आपण विविध कामे केली आहेत. त्यामुळे आज सभागृहातील सर्व आदरणीय, प्रेमळ सदस्यांना मी विनंती करतो, नम्रपूर्वक विनंती करतो.

विशेष म्हणजे विरोधी माझ्या सर्व मित्रांना विनंती करतो, हात जोडून विनंती करतो. यावेळी आपण ज्या पद्धतीने हा निधी ठेवलेला आहे, तो चांगल्या पद्धतीने खर्ची पडेल. या भागात चांगली कामे होतील. या झालेल्या विकासाचे साक्षीदार तुम्ही देखील मोठ्या मनाने व्हा. हे देखील मी मोठ्या मनाने सांगतो व थांबतो. धन्यवाद.

**मा.केशव घोळवे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत सात गावांचा समावेश करायचा हा जो प्रस्ताव इथे आणला आहे, त्याचे सर्वप्रथम मी स्वागत करतो व आपले अभिनंदन सुद्धा करतो. आज आपण पाहिलेतर इथे संपूर्ण पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने वाढत चालले आहे. आणि या शहराकडे आपला देशच नाहीतर संपूर्ण जग एका आश्वासक भावनेने पाहत आहे. या सात गावांमध्ये आपण पाहिलेतर देहू हे तिर्थक्षेत्र आहे. दूसरे हिंजवडी हे गाव म्हटलेतर देशातील दुस-या क्रमांकाचे आय.टी. हब म्हणून याकडे पाहिले जाते. याचा महापालिकेत समावेश होणे हे खरोखरच मी आपल्या सभागृहाचे भाग्य समजतो की, हा ठराव चांगल्या पद्धतीने नावारुपाला येतो आहे. आपण जर पहायचे झालेतर ग्रामपंचायतींना खर्च करण्यासाठी काही मर्यादा आहेत. महापालिका ज्यापद्धतीने पायाभूत सुविधा पुरवू शकते, महापालिकेच्या ज्या काही सोयी सवलती, सुविधा आहेत, ज्यापद्धतीने त्या देता येऊ शकतात, त्यापद्धतीने ग्रामपंचायतींना देता येत नाहीत. म्हणून हा निर्णय नक्कीच संबंधित गावांसाठी आणि महानगरपालिकेसाठी खूप वरदान देणारा असा असणार आहे. आत्ताच अनेक ज्येष्ठ मान्यवरांनी, नगरसदस्यांनी त्याचबरोबर आमच्या भगिनींनी याठिकाणी विविध विषयांवर विवेचन केले. आणि ख-या अर्थाने समाविष्ट गावांतील वीस वर्षांतील खदखद व्यक्त केली. आत्ताच बरेच मान्यवर बोलले की, ग्रामिण भागाचा विशेष विकास याठिकाणी झाला नाही. परंतू २०१७ पासून आत्तापर्यंत पाहतो आहोत की, ग्रामिण भागावर विशेष लक्ष देऊन ख-या अर्थाने विकास कामांचा धडाका सुरु केलेला आहे. यांचे कारण पार्लमेंट ते पालिका फक्त आणि फक्त भा.ज.पा. आजही पाहायचे झालेतर प्रगत राष्ट्र किंवा प्रगत शहरांनी जी प्रगती केली आहे, त्यात काही मार्गदर्शक मूल्ये आणि मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केलेला आहे. त्यात आपण पाहायचे झालेतर त्यांनी पहिल्यापासूनच अडीच मॉडेल्स उदधृत केली आहेत. एक म्हणजे इन्वेस्टमेंट आली पाहीजे, कन्झम्पशन झाले पाहीजे आणि एक्सपान्शन. आणि याच अडीच मॉडेल्सचा मला असे वाटते की, हा ठराव, हा प्रस्ताव मला त्याच्याशी रिलेटेड वाटतो. हा खूप चांगला प्रस्ताव याठिकाणी होतो आहे. आपण आज हिंजवडीमध्ये पाहायचे झाले, आत्ताच मान्यवरांनी सांगितले की, एखाद्याची अर्थी काढायची तर प्रेत न्यायला सुद्धा मुश्कील आहे. कसे आणायचे. जर ही प्रगती आपल्याला साध्य करायची असेलतर ख-या अर्थाने ही गावे लवकरात लवकर कशी समाविष्ट करता येतील हा सगळ्यांत महत्वाचा मुद्दा आहे. अनेकांनी खदखद व्यक्त केली की, २० वर्षांत जी समाविष्ट गावे आली होती त्यांना न्याय मिळत नाही. मला खात्री वाटते की, आत्ता जी नव्याने गावे समाविष्ट करुन घेतोय, त्यांना भारतीय जनता पार्टी कदापिही २० वर्षे लागू देणार नाही. त्यांची सुद्धा प्रगती चांगल्या पद्धतीने केली जाईल. कारण याठिकाणी पाहायचे झालेतर गेल्या वर्षभरात खूप मोठे कार्य ग्रामिण भागामध्ये चांगल्या पद्धतीने करायचे काम भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून विशेषतः मा.महापौर साहेब, मा.स्थायी समिती अध्यक्षा व मा.पक्षनेते यांनी विशेष लक्ष देऊन

ख-या अर्थाने ग्रामिण भागाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम हाती घेतलेले आहे. पुढील काळात सुद्धा हे काम अतिशय चांगल्या पद्धतीने घडू शकेल असा विश्वास वाटतो. अधिक विलंब न करता हा विषय मंजूर करावा. आणि ख-या अर्थाने या चांगल्या कार्याला हातभार लावावा. धन्यवाद.

**मा.सोनाली गव्हाणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,मी फार वेळ घेणार नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की, आधीचे लोक गेल्या २० वर्षांत जे करु शकले नाहीत, ते अवघ्या एका कालावधीमध्ये भा.ज.पा.च्या नगरसेवकांनी करुन दाखवले. I really solute them. तुम्ही हे करु शकले कारण तुम्ही तिथल्या लोकांचे ॲक्च्युअल प्रॉब्लेम्स जाणून घेतले. Hats off to your work. आणि असेच inspiration सगळ्यांनी घ्यावे, असेच मला वाटतेय. Thank you so much.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार मित्र,नवीन गावे आपल्याकडे समाविष्ट करावीत का करु नयेत या सगळ्यावर आत्ता मतेमतांतरे झाली आहेत. गाव महापालिकेत येण्यासाठी लोकं का घाबरतात. जर २० वर्षे या गावांकडे पाहिलेच नसेल, त्यांचा विकास केला नसेल, ज्या अपेक्षेने, ज्या आशेने लोकं महानगरपालिकेत आली आणि परत त्यांना गावाचाच दर्जा राहीला. त्यांना नागरी सुविधा दिल्या गेल्या नाहीत. मग आपलेही तसेच हाल होतील का. १९९७ साली जी गावे महापालिकेत समाविष्ट झाली. या गावांचा विकास होण्यासाठी १९९७ पासून २०१७ वीस वर्षांचा कालावधी लोटला. अजूनही काही झालेले नाही. यावेळी बजेटमध्ये आपण काही तरतूद केल्या असल्या किंवा काही काम काढलेली असतील तरी पॉईंट वन परसेंट सुद्धा आपण काम करु शकणार नाही. कारण पुढील पाच वर्षे सलग असेच काम केलेतरच दर वर्षी पाच टक्के डि.पी. डेव्हलप होईल. म्हणून खरेतर त्याठिकाणी कॉन्सन्ट्रेशन ठेवून काम करायला पाहीजे होते, जे झाले नाही. मघाशी आमच्या भगिनी खूप चांगलं बोलल्या. मा.सारीका सस्ते आणि मा.सोनाली गव्हाणे. मा.सारीक सस्ते-बो-हाडे या टेल्कोमध्ये एच.आर. आहेत. मा.सोनाली गव्हाणे या प्राध्यापिका आहेत. आमच्या मा.अश्विनी जाधव वेल एज्युकेटेड आहेत. मा.सुवर्णा बुर्डे आहेत. एकदम सुंदर बोलल्या. पहिल्यांदाच निवडून आल्या आहेत. चांगल्या शब्दांत मांडलेय. मी त्यांचे प्रथमतः अभिनंदन करते. नविन असताना सुद्धा त्या ज्या भागातून निवडून आल्या आहेत, त्या मातीशी ईमानदार राहण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

मागच्या पंचवार्षिकमध्ये आम्ही या सभागृहात एक तमाशा पाहीला होता. त्यावेळी ग्रामिण भागातले एक नगरसदस्य होते. ते चप्पल घालत नव्हते. मला सुवर्णाताईंनी सांगितले की, ते इथे चप्पल घालत नव्हते. आणि तिथे मात्र जिममध्ये बूट घालून व्यायाम करायचे. मी म्हटलं, असं कसं. त्या म्हणाल्या असंच आहे. पाच वर्षे समाविष्ट गाव, समाविष्ट गाव असा त्यांनी शब्द उच्चारला उच्चारला की, आम्हाला सगळ्यांना अंगला कापरं भरायचं की, एक्झॅक्टीली आहे काय. मी त्यांनी केलेल्या त्यागाला नावे ठेवीत नाही. हा दुटप्पीपणा लक्षात आणून देते. हा दुटप्पीपणा मी एवढ्याचसाठी म्हणेन की, ज्यावेळी तुमच्याकडे विकास होत नव्हता, त्यावेळी तुम्ही पायात चप्पल घातली नाही, बूट घातला नाही. अशी प्रतिज्ञा केली

होती. मग आत्ता त्याठिकाणी विकासाला सुरुवात केली आहे. कामे काढायला सुरुवात केली आहे तर मा.आयुक्त यांना आता अभिनंदनाचे एक दोन ओळींचे पत्र तरी द्या. या सभागृहात आम्ही दोन दोन तीन तीन तास त्यांची भाषणे ऐकली आहेत. या सभागृहात भाषणे ऐकत असताना कृती मात्र शून्य केली गेली. याची कुठे खंतच नाही. दूर्दैवाने ते निवडून पण आले नाहीत. त्यामुळे मी इथे फार वेळ खर्च करणार नाही. मा.महापौर साहेब, मघाशी मी मा.सचिन चिखले यांना म्हटले, वा वा वा, बहोत खूब बोलताय. मी त्यांना यासाठीच बोलले कारण एकिकडे समाविष्ट गावांना निधी देताना, विकास कामे काढताना, गेले महिनाभर आम्ही प्रचंड मोठ्या प्रमाणात टिकेला सामोरे जातो आहोत. ते एक गाणे आहे रिंग रिंग रिंगा, रिंग रिंग रिंगा. आम्ही बोटात घालतो, त्याला पण रिंग म्हणतो. कानात घालतो त्याला पण रिंग म्हणतो. हातात बांगडी घालतो, त्याला पण इंग्लिशमध्ये रिंगच म्हणतात. या रिंगा घालूनच दाखवायच्या. बोलणा-यांच्या हातात या रिंगा घातल्याच पाहीजेत. काय तमाशा लावलाय. याच्या काय म्हणे रिंग झाली, त्याच्यात काय म्हणे रिंग झाली. रिंग झालीतर उघडकीस आणा. एवढे जर माहित होते तर ज्यावेळी रिंग झाली, त्यावेळेसच आक्षेप का घेतला नाही. सेटलमेंटची वाट बघत होता काय. उगाचच साप साप म्हणून भुई धोपटायचं काम चाललयं. आणि ज्यांना ज्यांना असं वाटतेय त्यांनी हे सिद्ध करावे. मघाशी मा.सचिन चिखले तुमचे अभिनंदन अशासाठी केले होतं की, ज्या मुद्यावर आम्ही विकास कामे करताना ग्रामिण भागाला डोळ्यापुढे ठेवून विकास करायचे आमचे ध्येय्य होते. शहराचे ध्येय्य आहे. महानगरपालिकेच, तुमच,आमच,सगळ्यांचचं आहे ना. ठिक आहे. राष्ट्रवादीच्या काळात नाही केले, झाले नाही. कॉन्सनट्रेटनी काम केली नाही म्हणून आत्ता करायचे नाही का. त्यासाठी आपण विशेष मेहनत घेतली असेल, त्याठिकाणी विशेष निधी ठेवला असेल, तर पोटात दुखायचे कारण काय. एकिकडे सांगणार गावांना न्याय दिला नाही म्हणून खंत व्यक्त केली जाते. माझी तुमच्याकडून एक छोटीशीच अपेक्षा होती. जर यात काही भ्रष्टाचार झाला असेल, ज्यांचे ज्यांचे कुणाचे काही म्हणणे आहे. माझे त्यांना जाहीर आव्हान आहे. त्यांनी या व्यासपीठावर यावे. आणि त्यांनी ते दाखवावे की या या ठिकाणी असा असा भ्रष्टाचार झाला आहे. मी म्हणेन माझा एकच बाप आहे. माझा एकच बाप आहे. आणि माझे आव्हान आहे, ज्यांना आपल्या कर्तृत्वावर, आपल्या अस्तित्वावर ऑबजेक्शन असेल, त्या सगळ्यांना माझे याठिकाणी जाहीर आव्हान आहे की, एका बापाचे असालतर या व्यासपीठावर या. सिद्ध करुन दाखवा. राजकारण तुम्ही तरी सोडा किंवा मी तरी सोडते. कोणाला शिकवताय. आम्ही १० वर्षे आयुष्य या सभागृहात जाळलयं. वाट्टेल तसा अपमान, वाट्टेल ती भाषा या सभागृहात आम्ही सोसलेली आहे ती याच्यासाठी नाही की, आल्यानंतर लोकांच्या तिजोरीवर डल्ला मारायला. तुम्ही डल्ला मारताय नाही तर हल्ला करताय. ही कशाची लक्षणे आहेत. ही कशाची लक्षणे आहेत. तुम्हाला वाटतेय ना. मघाशी ज्या-ज्या विषयात मा.दत्तात्रय साने यांनी सांगितले, आमच्या इथे रस्ता ताब्यात नाही. मी आमच्या नवीन नगरसेवकांचे अभिनंदन करेन. त्यांनी सांगितले, तिथे नगरसेवकांची घरे आहेत. जेवढा ताब्यात आला तेवढा रस्ता करु. त्यांनी म्हटले नाही, नाही यांच्या घरांवर बुलडोजर लावा, पाडा. त्यांनी म्हटले नाही. हा समंजसपणा एक पंचवीस वर्षाचा पोरगा दाखवतो. चाळीस वर्षाची व्यक्तीला हा समंजसपणा दाखवता येत नाही. हे या सभागृहाचे दूर्दैव आहे. विकास कामे कोणी करायची, कशी करायची, कधी करायची. राष्ट्रवादीने विकास कामे

केली होती. जी काही केली होती त्यासाठी खास करुन सांगते. आत्ता मा.अजित गव्हाणे खरेतर उठून गेले आहेत. त्यांनी मघाशी सांगितले. योगेशभाई तुम्हाला पण सांगते. तुम्ही मघाशी म्हणालात, कमिशनरांनी काहीतरी दिशाभूल केली. ते कमिशनर आहेत. आयएसआय ऑफीसर आहेत. त्यांना जबाबदारीचे पूर्णपणे भान आहे.

याठिकाणी सगळ्यांच्या माहितीकरीता सांगते. जवाहरलाल नागरी पुनर्वसन योजना बीएसयूपी प्रकल्पांच्या निविदांविषयक माहिती सांगते. निगडी सेक्टर २२, से.क्र.५ - प्राप्त दर ६१ टक्के जादा. कमी केलेला मंजूर दर, मोजावयाच्या कामासाठी २८ टक्के जादा. मग नाव कोण ठेवतोय. सेक्टर क्र.२२ पॅकेज क्र.६- प्राप्त दर ५८ टक्के जादा, कमी केलेला परंतू मंजूर केलेला दर मोजावयाच्या कामासाठी २९.६ टक्के. निगडी सेक्टर क्र.२२ पॅकेज क्र.७ - प्राप्त दर ५४.३० टक्के जादा, कमी केलेला दर २९.४८ टक्के, पॅकेज क्र.८ - ५७ टक्के जादा कमी करुन मंजूर केलेला दर २९.६८ टक्के जादा, निगडी सेक्टर क्र.२२ पॅकेज क्र.९ - ५८ टक्के जादा २९.९ टक्के स्विकृत. अजंठानगर पुनर्वसन प्रकल्प- ५६ टक्के जादा, ३२.६१ टक्के कमी केलेला मंजूर दर, या सगळ्या निविदांची जंत्री माझ्याकडे आहे. जवळपास १८८ कोटींचे विषय होते. ६१८ कोटींच्या निविदा स्विकृत केल्या गेल्या होत्या. आणि एकही काम यामध्ये बिलोतर सोडाच, इथे ६० टक्के जादा दराने निविदा आल्या होत्या. इथे हसावे की रडावे काही कळत नाही. कोणाची किव करु माझी करु, त्यांची करु. का जे रोज उठून रिंग, रिंग, रिंग. लहान मुल म्हणायला लागलेतर त्या लहान मुलाच्या पाठित आपण धपाटा घालतो. काय करतोय आपण. कसली रिंग आणि कुठली रिंग. हातात घालायची रिंग मी शिल्लक ठेवली आहे. आणि ती मी त्यांच्या हातात घालणार आहे. रिंगा केल्यात तुम्ही. गब्बर झालात तुम्ही. भ्रष्टाचार केलात तुम्ही. २० वर्षे समाविष्ट गावांना नादवलेय तुम्ही. अनधिकृत बांधकामांचे भूत बसवले तुम्ही. शास्ती कर लादलात तुम्ही. भोगायचे आम्ही. भोगू ना. पण काहीतरी जबाबदारी घ्या. काहीच जबाबदारी घ्यायची नाही. मा.महापौर साहेब, हे मला काढायचे पण नव्हते. यातले पुढील सगळे प्रकल्प मी तुम्हाला वाचून दाखवते. ईडब्ल्यूएस घरकुल प्रकल्प-सन्मा.गटनेते त्यावेळी घरकुलची एक फूट जागा ताब्यात नसताना २० कोटींची सिमाभिंत बांधायचे काम स्थायी समितीने केले. सन्मा.अजितदादा गव्हाणे, सन्मा. आमच्या उषाताई संजोग वाघिरे पाटील या त्यावेळी चेअरमन होत्या. मा.प्रशांत शितोळे साहेब हे चेअरमन होते. यांच्यातर एवढ्या जंत्री आहेत. आम्हाला नगारे वाजवायचे आहेत, फक्त योग्य वेळेची वाट बघतोय. यात तर मला असेच वाटतेय की, आपणच चौकशी लावून तत्कालिन कमिटी ज्या ज्या होत्या त्यांच्यावर सगळ्यांवर गुन्हे दाखल केले पाहीजेत. होऊ दे एकदाचे काय व्हायचयं ते. आमचे कुणाचे हात दगडाखाली अडकलेले नाहीत. ईडब्ल्युएस घरकुल प्रकल्प पॅकेज क्र.१- प्राप्त दर ६८ टक्के जादा, कामाचा आदेश दिनांक स्विकृत निविदा रक्कम ६८ टक्के जादा आली आहे. घरकुल पॅकेज क्र.५ - ३६ टक्के जादा स्विकृत दर ३६ टक्के जादा, घरकुल प्रकल्प पॅकेज क्र.६ - ३६ टक्के जादा स्विकृत दर ३६ टक्के जादा, या सगळ्या जादाच्या प्रकल्पांमध्ये सेक्टर २२ मध्ये मी सुद्धा त्याठिकाणी सेक्टर २२ मध्ये माझ्यासाठी देश पहिला मग बाकी सगळे. इथे बसलेला प्रत्येक नगरसेवक माझ्या मताशी सहमत असेल.

घरकुल संदर्भात अडीच एफएसआय नसताना ज्याठिकाणी डिपीआरमध्ये आपण केंद्राला कळवतो. मघाशी आपला विषय चालला होता तेव्हा ते म्हणाले होते. पिंपरी चिंचवड नवनगर

विकास प्राधिकरण हे महापालिकेच्या हद्दीत आहे का. तर आपण त्याचा डिपी करु शकतो. मा.महापौर साहेब, ईडब्ल्यूएस प्रकल्प राबवित असताना आपण डीपीआरमध्ये नोंद करुन पाठवले होते की, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अखत्यारीत काम करते. म्हणून इथे अडीच एफएसआय लागला आहे. किती खोटे बोलायचे. मर्यादा आहे का. तुम्ही मर्यादांचे उल्लंघन केले. परंतु त्याठिकाणी आम्ही शंभर टक्के अनेक वेळा कानाडोळा केला. कारण प्रकल्प होत असताना काही त्रुटी राहू शकतात. परंतू किती याला पण मर्यादा पाहिजे. ६० टक्के अबोव्ह निविदा स्विकृत केल्या. माझी एक निविदा दाखवा. राजकारण सोडून देईन. आम्ही इतके मूर्ख निश्चितच नाही. मा.महापौर साहेब, काम करत असताना कमी जास्त या सगळ्या गोष्टी होत असतात. परंतू ज्यांनी याठिकाणी सभागृहात १०/१० वर्षे काढली असतील, आणि विरोधात काढली असतील. त्यांच्याकडून चूक होणार नाही याची आपल्याला सुद्धा खात्री असली पाहीजे. तुम्ही लोकांनी सांगितले, जास्तीच्या निविदा स्विकृत केल्या आहेत. प्र.क्र.७ च-होली, पठारे मळा, डि.वाय.पाटील कॉलेज, विकास आराखड्यातील ३० मी. रुंदीच्या रस्त्याची उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे-डी.पी. रस्ता ३.५९% ने कमी दराची निविदा आहे. दूसरे आहे,च-होलीतील मुख्य रस्ता दाभाडे वस्ती ४५ मी. रुंद रस्ता १०.९८ टक्के कमी दराची निविदा आहे. प्र.क्र.३ आदर्शनगरमधील डि.पी. रस्ते विकसित करणे- ९.३३ टक्केनी कमी निविदा आहे. प्र.क्र.७ काळी भिंत – ४.५ टक्केंनी कमी निविदा आहे. प्र.क्र.७ दाभाडेवस्ती ३० ते ४५ मी. डिपी रस्ता – पावणे पाच टक्केंनी कमी निविदा आहे. मोशी-आळंदी इंद्रायणी नदी पूल केळगाव – ९ टक्केंनी कमी निविदा आहे. चोविसावाडी ७.५ टक्केंनी कमी निविदा आहे. प्र.क्र. च-होली मुख्य रस्ता सर्वे नं.८७ मधील विकास आराखड्यातील १८ मी. रस्ता विकसित करणे – ६ टक्के कमी, ५.८८ टक्केनी कमी आहे. पुन्हा च-होलीचाच १८ मी. रस्त्याचा विषय आहे – पावणे पाच टक्केंनी निविदा कमी आहे. प्र.क्र.७ पुणे-आळंदी रस्ता,ताजणेमळा,काळजेवाडी- च-होली गाव विकास आराखड्यातील १८ मी. रस्ता विकसित करणे – टप्पा २ - ५.४४ टक्केंनी कमी निविदा आहे. प्र.क्र.८ इंद्रायणीनगर चौकापासून एमआयडीसी रस्ता विकसित करणे – ८.७५ टक्केंनी कमी निविदा आहे. प्र.क्र.२ बो-हाडेवाडी डी.पी. रस्ता विकसित करणे – १३.२२ टक्केंनी कमी निविदा आहे. मा.महापौर साहेब, आपण डी.पी.तले जितके रस्ते घेतले आहेत, त्यातला एकही रस्ता अबोव्हचा नाही. पुन्हा गायकवाड यांच्या वॉर्डातला जो रस्ता घेतला होता त्याच्यासाठी तरतूद झिरो आहे. म्हणून त्याची निविदाच केलेली नाही.

मला असे सांगायचे आहे की, याठिकाणी मघाशी काही सदस्यांनी सांगितले, डीएसआर, एसएसआर. माझे सहकारी मा.अमित गावडे याठिकाणी आहेत. मा.राजू मिसाळ आहेत, मा.वैशालीताई काळभोर आहेत. त्यांनी सगळ्यांनी सांगावे. स्थायी समिती सभागृहात ज्या दिवशी डीएसआर, एसएसआरबाबत आमच्यापुढे प्रेझेंटेशन झाले. सादर झाले. त्याच दिवशी सांगितले होते की, दुस-या दिवशी नगरसेवक व पत्रकारांची कार्यशाळा घ्या. डीएसआर, एसएसआर समजून सांगा. जेव्हा जिल्हा दरसूचीनुसार काम करायचे होते, तेव्हा जिल्हा दरसूचीनुसार काम केले. एसएसआरचे दर लागू झाले, त्यावेळी एसएसआर नुसार काम केले. ही सगळी मंडळी अत्यंत मातब्बर आहेत. यांना सगळे खाचखळगे माहित आहेत. त्यामुळे हे विषय फिरवतात. काही लोकांना विषय फिरवलेलेच आवडतात. त्यांच्या पोळ्या भाजल्या जात

नाहीत. म्हणून त्यांना फिरवलेले विषय जास्त गरम करुन घेण्यात मजा वाटते. यातला आमचा एकही विषय जादा दराचा नाही. मी हे अत्यंत जबाबदारीने बोलतेय. नव्हेतर मा.आयुक्त यांनी तसा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे पाठवला आहे. मुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी कारवाईसाठी पाठवले का कार्यवाहीसाठी पाठवले. कारवाईसाठी किंवा कार्यवाहीसाठी. तुम्ही त्याचे पुढे काय केले असेल ते पाठवा, म्हणजे अगेंस्ट काय केले असेलतर ते सुद्धा पाठवा. त्याच्यात सुद्धा गोलमाल, काही कळत नाही. नंतर काय करायचे आहे. या शहराला कुठल्या दिशेला न्यायचे आहे. शहराचे काय करायचे आहे ते ठरवले आहे. आम्ही ज्या-ज्या वेळी विषयाला विरोध करायचो, त्यावेळी आमच्या विरोधात नको ती भाषा वापरली जायची. मा.महापौर साहेब, त्यावेळी आपण सुद्धा या सभागृहात होता. याठिकाणी हे सगळे आय.पी.ॲड्रेस आहेत. ज्यांना कुणाला पाहिजेत त्यांनी घेऊन जावेत. मा.आयुक्त यांच्या ऑफीसमधून नेलेत तरी चालेल. एकही आय.पी. ॲड्रेस एका ठिकाणाहून एका संगणकावरुन भरलेले नाहीत. काहींनी सांगितले, आपल्या मर्जीतल्या ठेकेदारांना पोसण्यासाठी रिंग केली. मी काय गाववाली नाही. मी काय स्थानिक नाही. मी कोण पॉवरफुल नाही. मी ८०० कि.मी. वरुन आलीय. जी काही दहा पंधरा वर्षे राजकारणात काढली आहेत. त्यातली दहा वर्षे शिवसेनेची नगरसेवक म्हणून काढली आहेत. शिवसेना आज काय म्हणत असेल, याच्यापेक्षा जास्त पोटतिडकीने मी शिवसेनेची बाजू या सभागृहामध्ये मांडली आहे. त्यावेळी मला पक्षाचा विरोध शंभर टक्के होता. त्यावेळी सुद्धा पक्षानेच राष्ट्रवादीला सामील होऊन माझ्या विरोधात प्रेस घेतली होती हे उघड सत्य आहे. एकिकडे पक्षप्रमुख मा.उद्धवजी ठाकरे सांगतात. कालच मी त्यांचे भाषण ऐकले. तुम्ही ज्या घरात खूप वर्षे काम करता, त्या घरात तुम्ही बेईमान होऊ शकत नाही. आपुलकी असते. मला मा.शरदचंद्रजी पवार यांच्याबद्दल प्रचंड आदर, आपुलकी आहे. मा.अजितदादांबद्दल देखील खूप आदर, आपुलकी आहे. त्यांच्याबाबत एकेरीत भाषा आम्ही केलीच नाही आणि करणारही नाही. ती आमच्याकडची संस्कृती नाही, आमचे संस्कार नाहीत. काल उद्धवजींच्या भाषणात ऐकले, ते म्हणाले की, राष्ट्रवादीने हल्लाबोल कार्यक्रमात सांगितले, माझ्यावरती, पहिले मला सांगितले की, शिवसेना पहिली वाघांची होती. नंतर शेळी झाली. मग काय ससा झाला. आता काय कासव झाले. एकिकडे त्यांनी सांगितले. हे सगळं काही असलंतरी ज्या शेतक-यांच्या बाजूने राष्ट्रवादी भांडतेय. सगळेजण सर्वसामान्यांसाठी भांडत आहेत. राष्ट्रवादी भांडणाचा आव आणतेय. मी धरणात लघुशंका करणार नाही. इतका मी नालायक नाही. इतक मी प्रामाणिकपणे सांगतोय. अक्षरशः माझ्या डोळ्यांत पाणी आले. मी एक प्रामाणिक नेता म्हणून त्यांच्याकडे पाहते. तुमच्याकडून त्यांच्या विचारांची अपेक्षा आहे. मग शिवसेना व राष्ट्रवादी रिंग करुन आमच्याकडे येतात का. या सभागृहाबाहेर तुम्ही काय ठरवता, याच्यावर माझे ऑबजेक्शन असायचे कारण आहे का. जर तुम्ही वेगवेगळ्या पक्षांकडून, वेगवेगळ्या चिन्हांवर लढलेला आहात. मग तुम्ही रिंग करुन येत नाहीत का. एकच विचार मांडताय. बाळासाहेबांची इथे तसबिर लावलीय ना. ती इथे लावायला सुद्धा मला इथे भारतीय जनता पार्टीचे सत्तापरिवर्तन व्हायची वाट पहावी लागली आहे. ज्या दिवशी बाळासाहेब एक्सपायर झाले होते, तत्कालिन सत्ताधा-यांनी आम्हाला त्या दिवशी प्रॉमिस केले होते की, सभागृहात बाळासाहेबांचे तैलचित्र लावू. त्यानंतर कोणीच पाठपुरावा केला नाही. एखाद दुसरं पत्र दिलं. सभागृहात तर बोलायचेच नाही. आमचा शिवसेनेबद्दलचा आदर काय असेल, प्रेम काय असेल ते

मला सांगायची गरज नाही. परंतू तुम्ही ज्यावेळी एकत्र येऊन अशी काहीतरी भाषा करता, काहीतरी वेगळ्या कुरघोड्या करण्याचा प्रयत्न करता. तुम्ही रिंग करता. तुमच्या लेखी काय म्हणून वागायचे. मग दोघांची ध्येय्य धोरणे एकच आहेत का. एक्झॅक्टली आम्ही पैशांची नाही करत. तुम्ही साबित पण करु शकत नाहीत. तुम्ही साबित पण करु शकत नाहीत. तुम्ही खूप नवीन आहात. या सभागृहासाठी तुम्ही खूप नवीन आहात. तुमच्या म्हणण्याला मी महत्व सुद्धा देणार नाही. माझ्या लेखी तुमचे म्हणणे झिरो आहे. कारण या शिवसेनेसाठी आम्ही इथे काय भोगलेय ते आमचे आम्हाला माहित आहे. आमचे आम्हाला माहित आहे. आमचे आम्हाला माहित आहे. आम्ही धक्काबुक्की सहन केली, शिव्या खाल्यात. राष्ट्रवादीचे नगरसेवक अंगावर यायचे. दादागिरी करायचे. आम्ही सगळं भोगलयं दादा. तुम्ही आत्ता आलात. जेव्हा चांदीच्या ताटात जेवायची वेळ आली तेव्हा तुम्ही आलात. त्यात तुमचा काही दोष नाही. मला ना तुमच्याबद्दल तक्रार आहे ना तुमच्याबद्दल प्रेम. तुम्ही तुमच्या जागी बरोबर आहात. सांगायचे फक्त एकच आहे की, एकिकडे वेगळी भाषा करता. दुसरीकडे त्यांचाच पक्ष अशाप्रकारे राष्ट्रवादीसारखा जर रिंग करत असेलतर बोलण्याचा नैतिक अधिकार कोणाला आहे. मा.महापौर साहेब, याचा सुद्धा विचार करायची वेळ आली आहे.

आम्ही ग्रामिण भागासाठी निधी ठेवला का. शंभर टक्के ठेवला आहे. का ठेवू नये. वीस वर्षे वीस वर्षे तुम्ही त्यांच्याकडे दूर्लक्ष केले. ठाकूर साहेब इथे सभागृहात आहेत. मा.महापौर साहेब, त्यांना एकदा बोलवा. जेवढी आरक्षणे आहेत आणि रस्त्यांची आरक्षणे, यात टीडीआर कुठल्या कुठल्या महाभागाला दिला, त्यांची नावे जाहीर करा. टिडीआर घेऊन गेलात. गावांचा विकास करायचं जमल नाही. परवा दिवशी मा.सुवर्णाताई बुर्डे यांच्याकडे रस्त्याचे उदघाटन करायला गेले होते. मघाशी त्या डोळ्यात पाणी येऊन म्हणाल्या, ताई या रस्त्याने गरोदर बाईने कसे जायचे. गाडीच जात नसेल, तिला फोर व्हिलरमधून दवाखान्यात जायची गरजच पडणार नाही. तिला दवाखान्यात नेईपर्यंत तिची तिथेच डिलिव्हरी होईल. अशी यांच्या घरातल्या बाईची झालीतर यांना चालेल का. नवीन नगरसदस्य असल्यामुळे बोलू शकल्या नाहीत. गेल्यानंतर ज्याप्रकारे गावातले नागरीक एकत्र होत होते आणि जयघोष चालू होता. त्यातून काही लोकांच्या पायाखालून निश्चितच वाळू सरकलेली आहे. खरेतर मला या सगळ्या कुठल्याच विषयावर बोलायचेच नव्हते. सहा महिन्यांपूर्वी आम्हाला म्हणायचे, विकास कामे होत नाहीत. भारतीय जनता पार्टीला सत्ता सांभाळता येत नाही. आम्ही म्हणायचो, पोरं आत्ताशी जन्माला येते आहे. येऊ द्या, रांगू द्या, बोलू द्या. त्याचं योग्य वय झाली की करेन. पण घाई खूप. आजही आरोप करताना किती घाई, किती घाई. बघा, पत्र चाळा. तुमचे काही विषय असतील. तुमचे काही विषय असतील. मला मान्य आहे. मा.राहूल कलाटे विरोधात बोलणार. का बोलणार त्यांच्या कामांना याठिकाणी बजेटमध्ये अडचणी आल्या. म्हणून त्यांनी त्याठिकाणी विरोध केला. विरोधी पक्षाचे नगरसेवक असले की, थोडं असं तसं होत असतं. त्यांचा राग पण आम्हाला मान्य आहे. म्हणून आपण कायमच त्या रागात वागावं अस नसत. त्यासाठी तुम्हाला कुठे ना कुठे सामंजस्याची भूमिका घ्यावीच लागणार आहे.

मा.महापौर साहेब, याठिकाणी मघाशी कोणीतरी म्हटले की, गल्लीपासून दिल्लीपर्यंत तुमचीच सत्ता आहे. पवना जलवाहीनी एकदा मार्गी लावा. पवना जलवाहीनीत बंद पाईपलाईन योजनेत रु.२०० कोटींचे पाईप घेतले. एक फूट जागा ताब्यात नव्हती. ते पाईप सडले.

मोबोलायजेशन ॲडव्हान्स रु.२० कोटी दिलात. आज आपल्यावर कोर्टात केस चालू आहे. शेतक-यांना गोळ्या घातल्या. आम्ही त्यावेळी शिवसेनेत होतो. आम्ही शिवसेनेच्या वतीने त्याठिकाणी विरोध केला. शेतक-यांवर गोळीबार झाला म्हणून आम्हाला नको, नळ चालू केला की त्यातून आम्हाला रक्ताचे पाणी नको आहे. एक फूट जागा ताब्यात नसतांना तत्कालिन सभापती मा.सौ.उषाताई संजोग वाघेरे पाटील यांनी करारनाम्यावर सह्या केल्या. कुणाकडून घ्यायची नुकसान भरपाई, कुणाकडून घ्यायची. प्रकल्प नाही. पैसेही गेले. तीन लोकांचा जीव पण गेले. काही लोक इंज्युअर्ड पण झाले. आज कायमची अढी बसली ती बसलीच. पाण्याचा प्रॉब्लेम आता चालू होणारच आहे. किंवा तो आता झालेलाच आहे. याला जबाबदार कोण. जागा ताब्यात नव्हती मग दोनशे कोटींचे टेंडर का काढले होते. का वर्कऑर्डर द्यायची घाई केली. कोणी करारनामा करायची घाई केली. जर त्या वेळेस आपण भान ठेवून काम केले असते, आणि भ्रष्टाचाराच्या उद्देशाने काम केले नसतेतर आज महानगरपालिकेचे रु.२०० कोटी रुपये वाचले असते. ४५ लाखांचे काय सांगता. प्रत्येकच कामाला आपण ५ टक्के आकस्मिक निधी देत होतो. रु.७० कोटी वाचवले. शाब्बाशी देणार ना. आणि तुम्हाला पण देणार. का तर ख-याने काम केले. रस्ता केला तर म्हणे तिथे सारखाच रॉक लागत होता. मग खोदायला गेलं की तिथे रॉक लागत नाही. तिथे भूसभूशीत माती लागतेय. मग त्याच्याकडून पैसे भरुन घ्यायचे. आमच्याकडून जास्त गेले. ही प्रशासनाची दुटप्पीपणाची भूमिका होती. त्याठिकाणी स्टँडींग चेअरमन म्हणून मीच तिथे विरोध केला की, आकस्मिक निधी देणार नाही. इतर पक्षांचेही स्टँडींग सदस्य आहेत. तुमचेही आहेत, राष्ट्रवादी पक्षाचेही सदस्य आहेत. त्यांनी पण सांगावे. ७० कोटी रुपये वाचलेत. का शाबासकी देणार नाही. द्यायला पाहीजे ना. ज्या कुठल्या कामात तुम्हाला असे वाटत असेल, कुणी कागदपत्रे काढली, कुणाला सांगितले. रेकॉर्डीग करा, हाणा, वाजवा. भिती काय आहे. जागोजागी टि.व्ही. लावा. आपल्याकडे चौकाचौकात सगळीकडे एलईडी लावलेले आहेत. अनधिकृतपणे उभे आहेत. तुमच्या माझ्या सगळ्या कार्यकर्त्यांचे लावले आहेत. त्याच्यावर द्या. पैसे देऊन सांगा, भारतीय जनता पार्टी भ्रष्टाचार करते आहे. धरलयं कुणी, धरलयं कुणी. आणि धरलेलं नसताना सुद्धा रोज उठून आपण वातावरण गढूळ करायचे काम या शहरभरात करतोय. मी एवढे प्रकल्प वाचून दाखवले. मघाशी योगेशभाई बहल म्हणाले, एसएसआर, डीएसआरमध्ये वारेवा आयुक्त. तुम्ही आमच्या भावना समजून घ्या. मघाशी त्या आमच्या तरुण मुली बोलल्या. आमचा विकास बोलला. आमचा कुंदन बोलला, खरंच, बाई समजत नाही एसएसआर, डीएसआर मधला फरक काय. एसएसआर, डीएसआर कशाला म्हणतात. दरसूची काय असते. एस्टीमेट कसे काढायचे. एस्टीमेट केल्यानंतर काय काय कम्पोनण्ट असतात. कशाला कशाशी खायचे काहीच कळत नाही. म्हणून कार्यशाळा घेतली. निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावेळी डीएसआरमध्ये जीएसटीचा कंपोनण्ट होता. म्हणून जीएसटी ॲड करुन रेट काढावे लागले. एसएसआरमध्ये जीएसटी ॲड नव्हती म्हणून जीएसटी ॲड करुन रेट काढावे लागले. आणि जरी हे रेट काढले नसते तरी जो पोटासाठी काम करतो, तो कुठलाही कॉन्ट्रॅक्टर असलातरी त्याला ते नंतर द्यावेच लागले असते. म्हणून रेट काढले. ॲक्सेप्टन्स लिमिट कशाला म्हणतात. याच्यावर कार्यशाळा घ्यायची नाही का. मग कशावर घ्यायची. मग बरोबर आहे. निविदा ७ टक्के अबोव्ह आल्या. दोनशे कोटी रुपये पाण्यात घालवले याच्यावर कार्यशाळा व्हायला पाहीजे होती. कोट्यावधी रुपयांचा टीडीआर लाटला

याच्यावर कार्यशाळा व्हायला पाहीजे होती. दोन पूररेषांचे नकाशा होते. त्याच्यावर कार्यशाळा व्हायला पाहीजे होती. महापालिकेचे दोन डिपीआर आहेत. त्याच्यावर कार्यशाळा व्हायला पाहीजे होती. राष्ट्वादीच्या विरोधात अंकुश नावाचे माझे एक पुस्तक आहे. हिच सिमा सावळे हे अंकुश नावाचे पुस्तक काढणारी. तुम्ही इथे फोटो बघितलात ना तर तुम्हाला सगळ्यांत पहिला फोटो दिसत असेल, मा.उद्धव ठाकरे साहेबांचा व माझा. यामध्ये खोटारड्यांची यादी वाचली आहे. हे सगळे प्रकल्प तुम्ही अडवले आहेत नाहीतर कोर्टाकडून यावर स्टे घेतलेला आहे. काम कोणी रोखलेले नाही. बीआरटीएस चार हजार कोटींची उपसूचना सभागृहात आली. उपसूचना सभागृहात आलीच नव्हती. तत्कालीन स्थायी समिती सभापती सन्मा.प्रशांत शितोळे यांनी सभागृहात घुसडलेली होती. यांनी भ्रष्टाचारावर बोलावे ? मला हसावे का रडावे हे कळतच नाही. साडे चार हजार कोटींची उपसूचना आली. सभागृहात घुसडली गेली. मला पण कळत नव्हते. आणि त्यांनी भ्रष्टाचारावर बोलायचे. मा.महापौर साहेब,साडे चार हजार कोटींचा. शासनाकडे पाठपुरावा केला. हायकोर्टात गेले. महापालिकेला आर्थिक हिताचा निर्णय घेता येणार नाही म्हणून कोर्टाने या सिमा सावळेच्या बाजूने नाहीतर लोकांच्या बाजूने निर्णय दिला. मा.महापौर साहेब, आपण त्याचे स्वागत करायला पाहीजे. त्यांनी सांगायचे भ्रष्टाचार कसा होतो ते. नाक तरी आहे का. या शवदाहीनीमध्ये त्यांनी मेलेल्या माणसाच्या टाळूवरचे लोणी खायचा भ्रष्टाचार केला. त्यांनी बोलायचे भ्रष्टाचार केला म्हणून. लोकांनी घरी बसवलेय त्यांना. काळं तोंड केलयं. किमान त्याची तरी लाज ठेवा. तुमच्या मॉडेल वॉर्डची इन्क्वायरी लावली होती, येऊन हाता पाय पडलात. इन्क्वायरी करु नका म्हणून दहा लोकांना मध्यस्थी घातले. मॉडेल वॉर्डचे एकही टेंडर ३३ ते ३५ टक्यांच्या खाली नाहीए. तुम्ही सांगा. त्याच्यावरती कार्यशाळा घेते. कोण कुणाला जाब देतयं. कोण कुणाला नाव ठेवतयं. आम्ही राजकारणात रक्ताचं पाणी केलयं आणि रात्रंदिवस लढलोय.

सेक्टर २२ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प तुम्हाला आत्ता वाचून दाखवला. बचत गट महासंघ घोटाळा. माहित्येय कुणाला. आपण यावर कार्यशाळा घेऊ. ११ बचत गट एकत्र येऊन महासंघ तयार होतो. त्यावेळेस त्यांनी तीन कोटींचे लोन घ्यायचे आणि तीस लाख बॅक एण्ड सबसिडी महापालिकेने द्यायची. नाव घेऊ का नको. घेतलं की प्रॉब्लेम, नाही घेतलं की डबल प्रॉब्लेम. नाही नाव घेतलचं पाहिजे. ज्या-ज्या बचतगट महासंघांना तीस लाख बॅक एण्ड सबसिडी होती, त्या महिलांच्या पाठिमागे आमचे एक बंधू होते. ते त्या कंपनीत सुमेध पॉलीमरमध्ये मा.योगेशभाई बहल हे संचालक होते. ज्यादिवशी तीस/तीस लाख रुपये बॅक एण्ड सबसिडी जे प्लास्टीकची पोते पुरवतात त्या कंपनीचे ज्यादिवशी पैसे गेले, त्यादिवशी मा.योगेशभाई बहल यांनी राजिनामा दिला होता. मी काही चुकीचे बोलत नाही. माझ्याकडे याठिकाणी इन्कमटॅक्स विभागाने सुमेध पॉलिमर्सचा अहवाल पाठवला आहे, तो सुद्धा आहे. तीस लाख आतमध्ये घेतले. काय करायचे, तीस लाख रुपये घेतले. महिलांच्या नावावर घेतले. त्या महिला लागल्या ना देशोधडीला. आता त्या महिला भगिनी कोर्टात चकरा मारताहेत. ना प्रकल्प, ना रोजगार. तत्कालिन शिवसेनेच्या गटनेत्या त्यांनी तर सांगितले, धुणंभांडी करणारी कामगार महिला होणार कंपनीची मालकीण, मोलकरणीची मालकीण. मग अभिनंदनाचे ठराव. काय काय नाटकं राव. असलं भारी. लय भारी. मग आम्हाला पण वाटलं. मग आमची पण पळापळ चालू. मग याच्या गाडीला हात लाव, याच्या पाया पड. साहेब, आम्हाला एवढं करुन

देता का. नाही संपला निधी. काय कुठे. यामध्ये बँक ऑफ बडोदाचे मॅनेजर होते. त्यांच्यावर सीआयडी यांनी रेड केली. आणि बँक ऑफ बरोडा यांनी त्यांना बडतर्फ केले. जे म्हणतात ना हे खोटं आहे. हे खरं आहे. याचा अहवाल आहे. अहवाल खोटे बोलत नाही. माझे पुढील पुस्तक आहे. याच्यापुढे काय झाले ते सुद्धा छापतेय. आणि याच्यामध्ये ज्या महिला भगिनींचे नाव आहे. समजा मी आहे. तुम्ही काय करणार, मी किती भारी, मी किती भारी. यात मा.अजित गव्हाणे यांचे नाव आहे. माजी महापौर मा.मोहिनीताई लांडे या सुद्धा यात होत्या. यांच्या सगळ्या प्रकल्पांच्या संदर्भात, मा.वैशालीताई घोडेकर यांचा होता, मा.कमरुनिस्सा खान यांचा सुद्धा प्रकल्प होता. पैसा कुठे गेला माहीत नाही. प्रकल्पच चालू नाही. पहिला कुणी केला माहिती नाही. काही ठिकाणी अस आहे की, व्यवसायच चालला नाही. बॅक एण्ड सबसिडी फ्रण्ट एण्ड सबसिडी झाली. मग आम्ही म्हणालो, बॅक एण्ड होतीतर बॅक एण्ड का ठेवली नाही. मग तुम्ही पहिले का नाही दिलं. बँकेचा मॅनेजर मलिदा घेत होता. सत्ताधा-यांनी कोणी दबाव आणला. बँक मॅनेजर काहीच सांगायला तयार नाही. पण मी मात्र त्याचा खूप पाठपुरावा केला. आयबीएम लोकमतचे श्री.गोविंद वाकडे होते. त्यांनी सलग तीन दिवस ही बातमी दाखवली. यांनीच सगळ्यांनी हे घडवले होते. सगळ्या पत्रकार बंधूंचे उपकार मी आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. आता यांनी असा घोटाळा केला. कोण बोललं. मग सभागृहात काय करायचं. मग शिवसेनेचे किती इन मीन चार. मग महापौरांनी सभागृहात म्हणायचं, एकाच विषयावर बोलायला देणार. परत दुस-या विषयावर बोलयचं नाही. असं नाही, तसं नाही. मग पहिली शिवी कुठल्या नगरसेवकानी घालायची हे सुद्धा ठरलेलं असायचं. मग यांनी शिवी दिली की मी उचकणार. नंतर नंतर आमच्या लक्षात आलं की, यांनी शिवी दिलीतरी आपण उचकायचचं नाही. मग मी बोलले.

विकास नियंत्रण नियमावली फेरबदल प्रकरण - पूररेषेत टीडीआर द्यावा का नाही द्यावा, द्यायचा असेलतर गव्हर्नमेंटने तो प्रपोज केला होता. आपण खालच्या खाली इथेच लगेच चार्ट बदलवला. घाईघाई. याच महापालिकेचे कारभारी कोण ताथवडेत घुसलं, कोण रावेतमध्ये घुसलं, कोण ग्रामिण पट्टयात गेला. पटापटा यांनी सगळ्यांनी ग्रामिण पट्टयातून जागा घेतल्या. कुठल्या, पूररेषेतल्या, ब्लू लाईनमधल्या. ब्लू लाईन आली, ब्लू लाईन आली. गरीब, बिचारे शेतकरी अनपढ आहेत कळत नव्हतं. अनपढ म्हणण्यापेक्षा त्यांना कायद्यातलं माहित नव्हतं. त्यांनी कवडीमोलाने त्यांच्या जागा दिल्या. दोन महिन्यांपूर्वी जागा घेतल्या. आणि तिस-या, चौथ्या महिन्यातच सभागृहात विषय. गव्हर्नमेंटने प्रपोर्शन ठरवून दिले होते. किती टक्के टिडीआर घ्यायचा. यांनी इथे पाऊंट फोरवरुन डायरेक्ट एक वर आणला. काही महाभागांना टिडीआरचे सर्टिफिकेट दिले. मी त्यांना शंभर/दोनशे कोटींना कामाला लावले.

घरकुल योजना- साडेतीन हजार लोकांचा ड्रॉ काढला. दीड लाख अर्ज छापले. तीस चाळीस हजार लोकांनी अर्ज केले. जे विकले गेले नाहीत, उरलेले अर्ज कुठे गेले. मग ते बघा. बाकी नागरीक सारखी तक्रार करत होते की, माझा अर्ज सापडत नाही. तुमचा सिरियल नंबर सांगा. सिरियल नंबर सांगितल्यानंतर तो अर्ज असा असा असायचा. कुठल्याही ड्रॉमध्ये नाव नसायचे. मग ते अर्ज कुठे आहेत. मग आम्ही त्याचा खूप पाठपुरावा केला. सायन्स ऍण्ड टेक्नॉलॉजी पार्क यांना अर्ज छापायचे काम दिले. जिथे मोठमोठे प्रकल्प करतात, तिथे त्यांनी ते काम केले. अर्ज छपाईत त्यांनी घोटाळा केला. दोन पूररेषांच मी सांगितलं, लाभार्थी सुद्धा

सभागृहातच आहेत. पत्रकार बंधुंना तर माहितच आहे, ते कोण-कोण आहेत ते. बीआरटीएस मध्ये ३ पॉईंट एफएसआय प्रिमियमचा ७१ कोटींचा घोटाळा. वडमुखवाडीला त्याठिकाणी बीआरटीएस रुटमध्ये जागा होती. त्याचा प्रिमियम भरायला पाहीजे होता तो भरला नाही. आपण पत्र दिले. तत्कालिन त्यावेळचे राजेमहाराजांनी सांगितले, कुणाला काय पाहीजे, असले करुन चालणार नाही. आमच्याशी गाठ आहे. आम्ही त्यांना सांगितले, तसलं करुन चालणार नाही. तुमची कुणाशी गाठ आहे, त्याने आम्हाला काही फरक पडत नाही. त्यांना सांगा. पैसे भरा. आमचे काही म्हणणे नाही. चार कोटी भरायला लावले. शाबासकी द्यायला नको का. पूररेषाच वळवली होती. महापालिकेत आली आली पूररेषा आली, पूररेषा आली. आली तर काय केले. त्यावेळचे जलसिंचन विभागाचे व्यंकटराव गायकवाड यांचे चिरंजीव विक्रम डेव्हलपर्सचे विक्रम गायकवाड यांची साईट. यांनी पूररेषा बघितलेली. इथे चापेकर चौकात आणली. त्यांचा प्रकल्प पूररेषेत होता. मग ती वळवली. मग ती वळवली म्हणून लक्षात आले. म्हणून त्याच्यावर ऑबजेक्शन घेतले. त्याला सुद्धा दंड भरायला लावला. शाबासकी नको द्यायला. द्याना शाबासकी. या सगळ्या प्रकरणांत, जेव्हा संधी होती तेव्हा दिली नाही. आत्ता काय करणार. तेव्हा मला लिंबूटिंबू समजत होते. आत्ता काय करणार. आत्ता सगळ्यांच्या डोळ्यावर आहे. तुम्हाला दोन पूररेषांची एक स्टोरी पाच मिनिटांत सांगते. दोन पूररेषांसंदर्भात सभागृहात विषय होता. याठिकाणी चिंचवडमधली चाळीस गुंठे जागा आपण संबंधितांना हस्तांतरीत करायची. आणि त्यांनी च-होलीतील १०० गुंठे जागा आपल्याला द्यायची. का तर इथली शंभर टक्के जागा पूररेषेत होती. विषय सभागृहापुढे आला. विषय आला म्हटल्यावर मला छंदच लागला होता. डॉकेटस् वाचायचे सभागृहात आपले म्हणणे मांडायचे. आम्हाला कोणी विचारात घेत नव्हते. म्हणून याठिकाणी माहिती घेतली. त्यानंतर लक्षात आले की, खरेच आहे, शंभर टक्के जागा पूररेषेत आहे. मी पत्र तयार करुन आणले. मी पत्रात काय लिहिले असेल की, जो कोणी विकसक आहे त्याचे अभिनंदन केले होते. कारण त्याने चांगले काम केले होते की, त्याने हे लक्षात आणून दिले होते. इथली पूररेषातली जागा घेतली आणि तो त्याची च-होलीतली शंभर गुंठे जागा देतो आहे, त्याबद्दल त्याचे अभिनंदन. मी पत्र द्यायला नगररचना विभागात गेले. तिथल्या एका अधिका-याकडे गेले. त्याला म्हणाले, मला असे पत्र द्यायचे आहे. नकाशा मी आणला नाही. याला नकाशा जोडायचा आहे. मला तेवढी प्रिंट देता का. तो म्हणाला, देतो. त्याने कम्प्यूटर चालू केला. तो म्हणाला, सिमाताई तुमचे पत्र चुकले आहे असे वाटत नाही का. सर्वे नंबर सो ऍण्ड सो. इथे पूररेषा शंभर टक्के बाहेर. आपल्याकडे विषय शंभर टक्के आत. मग त्याची प्रिंट घेतली. घरी फोन केला. ताबडतोब पालिकेत या, असे असे झाले आहे. तत्कालिन आयुक्त मा.आशिष शर्मा यांना जावून भेटले. असा विषय आहे. काय करणार, तुम्ही रद्द केले पाहीजे. त्यांनी ऐकले नाही. शासनाकडे दाद मागितली. आजही सभागृहात लाभार्थी आहेत. खात्री आहे. पूररेषेच्या आतमध्ये आजही चिंचवड भागातले आमचे नगरसेवक येतात. चापेकर चौकापर्यंत पूररेषा आणली आहे. मला सभागृहाचा जास्त वेळ घ्यायचा नाही. मला फक्त एवढेच सांगायचे होते की, ज्यांना कोणाला आमच्यावर आरोप करायचे आहेत, त्यांनी फक्त नीट आरोप करावेत.

महापालिकेची निवडणूक प्रभागरचनेने झाली हे आपल्याला सगळ्यांना माहितच आहे. औद्योगिक क्षेत्रातील ऐतवार. २०१७ च्या पहिल्यात मिटींगमध्ये ऐतवारावर, इंडस्ट्रीयल टू

रेसिडेन्शिल झोन वर सगळ्यांत पहिली हरकत कोणी घेतली असेलतर ती मी घेतली आहे. पण म्हणतात ना नवीन असल्यामुळे कोणी लक्ष दिले नाही. आज कोट्यावधी रुपयांची जागा आपण बिल्डरांकडून आपल्याकडे घेतोय. ती घ्यायची तर सोडाच पण ती जागा परत बिल्डरांना कशी परत देता येईल, यासाठी या महाभागांनी प्रयत्न केले. शासनाकडून विषय पण मंजूर करुन आणला. बांधकाम परवानगीला एलिमिनेटेड ओपन स्पेस नाही. त्या डी.सी. रुलमध्ये नाही. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या बाजूची जी बिल्डींग आहे, त्या बिल्डींगमध्ये तत्कालिन आयुक्त मा.दिलीप बंड, या शहराची वाट कुणी लावली असेलतर त्यांनी लावली आहे. मा.दिलीप बंड यांनी मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेत एलिमिनिटेड ओपन स्पेसला मान्यता मिळेल या उमेदमान्यतेवर तो प्लॅन पास केला. आज शहरात हक्काची जागा नाही. सर्वसामान्य नागरीक बिल्डींगमध्ये घर घेतो, त्यांच्या मुलांचे खेळायचे प्लेग्राऊंडसुद्धा बिल्डरने हिसकावून घेतले आहे. त्यामध्ये तत्कालीन राष्ट्रवादीचे हे सगळे नेते सामिल होते. सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर बोलायचा अधिकार त्यांना आहे का. तुमच्या तिजो-या भरल्या, तुमच्या तुमड्या भरल्या. तुमची पोटं भरली. ढेकर देताय, उलट्या करताय. आणि आज तुम्ही सांगताय. लोकांच्या पुढे खूप आव आणताय. लिंक रोड झोपडपट्टी पुनर्वसन – रु.२५ कोटींचे काम. यांनी सगळ्यांनी माझी प्रतिमा कशी केली, गरीबांच्या विरोधात. अशी माझी प्रतिमा तयार केली होती. पण रु.२५ कोटींचे काम राष्ट्रवादीने बी.जी.शिर्के यांना डायरेक्ट दिले. ३३ टक्के अबोव्ह टेंडर,डायरेक्ट काम दिले. एकही निविदा नाही. बोलणारे कमी. विरोध किती करायचा. विरोध,विरोध,विरोध,विरोध. त्या विरोधातूनच सिमा सावळे तयार झाली. पंचवीस कोटींचे काम दिले. त्याठिकाणी तत्कालिन नगरसदस्य होते. त्यापैकी पस्तीस/छत्तीस गाळे त्यांनीच ठेवले होते. त्याठिकाणी भाजी मंडईच्या जागेवर आरक्षणांत फेरबदल न करताच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविला. जो नियम सर्वसामान्यांना असेल तोच नियम महापालिकेला पण असला पाहीजे. सेक्टर २२ मध्ये सर्वसामान्य नागरीकांना तुम्ही बांधकामांना परवानगी देत नाहीत. तिथे महापालिकेने ६०० कोटींचा प्रकल्प उभा केला. एकही निविदा ४५/५० टक्यांखाली नाही. यांच्याकडून नुकसानभरपाई घेतलीच पाहीजे ना. ही सगळी माणसे शिक्षेस पात्र आहेत. ताथवडेमध्ये विकास आराखडा करताना मा.महापौर साहेब तुम्ही सुद्धा या सभागृहात होता. मा.निलेश बारणे सुद्धा या सभागृहात होते. विकास आराखडा करताना ज्या-ज्या बिल्डरांच्या साठी ज्या ज्या जागांवर आरक्षणे असतीलतर ती सर्वसामान्य नागरीकांच्या घरांवर टाकली. सगळीकडे झोपड्यांवर आरक्षणे होती. मग परत युद्ध. त्यावेळी सुद्धा वापर केला. त्यांनी बॉम्बच टाकला. आपण त्यात फसलो. त्यांनी परत शिवसेना विरोधात शिवसेना रंगवले. मग सभागृहात माझी व राष्ट्रवादीची जुगलबंदी बघायच्या आधी तत्कालीन गटनेत्या व माझी जुगलबंदी बघायला लागली. एखाद्या विषयासाठी एखादा चांगले काही मांडत असेलतर त्यांनी माझ्या बाजूने थांबायला पाहिजे होते. त्या माझ्या बाजूने थांबल्या नाहीत. मग त्यांनी माझ्या विरोधात प्रेस घेतली. मग आम्हाला तिथल्या लोकांच्या घरांच्या टॅक्सच्या पावत्या दाखवायला लागल्या. मग एक, दोन नव्हेतर तब्बल अडीच ते तीन हजार लोकांच्या टॅक्सच्या पावत्या या सभागृहात दाखवल्या. आणि तसे करुन आम्ही ते आरक्षण दाखवले. आमचा कोणी नगरसेवक नाही. आणि काहीच नाही. गावात चावडी वाचन घेतले. गावात जाऊन दवंडी पिटवायचो, जायचो. चला या बघा. कायद्याच्या भाषेत याठिकाणी आम्ही तुम्हाला ऑबजेक्शन घेऊन देतो. तुम्ही

घ्या. आजही त्या गावांत गेलो की, लोक आपुलकीने एक ग्लास पाणी देऊ का एवढ तरी विचारतात. आता तुम्ही महापालिकेत आलात त्यामुळे तुमच्या जागेत आता पूररेषा आली म्हणून दहा एकर जागा घेतली. त्याचे प्लॉट केले आणि विकून टाकले. त्यांचे नाव सांगू का. त्या गरीबाने दहा लाख रुपयांना घेतले. प्लॅन पास करायला आलेतर, जागा पूररेषेत येते आहे. त्यांनी येऊन बोंबच केली. जे सत्ताधारी होते. ज्यांनी लाखांचे करोड रुपये केले. त्यांच्याकडे नैतिकताच नाही. आणि मग त्यांनी कशाला म्हणायचे, रिंग झाली. तुम्ही कशाकशाची रिंग केली नव्हती. सगळ्या घोटाळ्यांच्या रिंगा आम्ही उघडकीस आणल्या आहेत. नव्हेतर आम्ही यासंदर्भात हायकोर्टात गेलो आहोत. समावेशक आरक्षणे असतील. सिटी सेंटरसारखा मोठा प्रोजेक्ट करणार होते. आपण १७७ कोटींना पाच वर्षांत १७७ कोटी घेणार आहोत. सायन्स टेक्नॉलाजी पार्क समोरची जागा आहे. त्यातले बारकावे सांगायला लागलेतर, त्यासाठी ती साडेचार हजार कोटींची उपसूचना घूसवली होती. त्या बिल्डरचा फायदा व्हावा म्हणून. राष्ट्रवादीच्या भ्रष्टाचारावर अश्या अनेक कार्यशाळा घेता येतील. त्यामुळे राष्ट्रवादीला नैतिक अधिकार नाही. त्यांनी पहिले या सर्व गोष्टींची उत्तरे द्यावीत मगच आमच्यावर आरोप करावेत. जर त्यांचे आरोप चांगले असतील, योग्य असतील, त्यांनी पूरावे दिलेतर निश्चितपणे आम्ही काय असेल ती आरोपीवर ॲक्शन घेणार. परंतू मा.महापौर साहेब, आम्ही ज्यावेळी डीएसआर, एसएसआरवर कार्यशाळा घेतली होती, त्यावेळी हे सदस्य का आले होते. त्यांना असे वाटले का ते खूप हुशार होते. काही नगरसदस्यांनी, मा.राहूलदादा कलाटे यांनी पण पत्र दिले होते, आम्हाला डिएसआर, एसएसआर समजून सांगा. तो विषय निराळा. पहिली प्रेस झाली, नंतर पत्र दिले. आम्ही कार्यशाळा घेतली. प्रशासनाची चूकच आहे. ज्या दिवशी स्टँडींग समितीत विषय पास झाला, दुस-याच दिवशी प्रशासनाला सांगितले होते की, डीएसआर व एसएसआर यामध्ये काय तफावत आहे ते समजून सांगा. सांगितले नाही. काही लोकांची या सभागृहात मोनोपॉली आहे. ती मोनोपॉली ते बाहेर सुद्धा चालवतात. मा.महापौर साहेब, खरेतर ही सगळी गावे घेतांना, नवी गावे घेत असतांना आपल्याला त्याठिकाणी कॉन्सनट्रेट करुन निधी ठेवावा लागणार आहे. परत म्हणतील गल्ली ते दिल्ली यांचेच सरकार. गावे घेतली पण विकास केला नाही. आज जे राष्ट्रवादी ऐकतेय, ते उद्या आपल्याला सुद्धा ऐकावे लागणार. त्यामुळे आपल्याला सुद्धा काम करत असताना त्याठिकाणी जागरुकपणे काम करावे लागणार आहे. मला असे वाटते, आपण जागरुकपणे काम करत असताना हिंजवडीसारखा भाग आपल्याकडे आलातर आपण खूप चांगल्या प्रकारच्या सुविधा करु शकतो. तिथे मेट्रो देण्याचा विषय तर चालूच आहे. तिथे त्यांना पाणी दिले पाहीजे. रस्ते मोठे केले पाहीजेत. माण,मारुंजी या सगळ्या गावक-यांना माझी विनंती आहे, नव्हे शब्द असेल की, पुढील पंचवार्षिकमध्ये आम्ही जर राहीलो तर, कोण येतं, कोण जातं, इलेक्शन होतात, हे तेव्हाच तेव्हाच ठरतं. परंतू या वर्षी वर्षभरात गावे आलीतर पुढील बजेटपासून या गावांवर आपल्याला लक्ष द्यावे लागणार आहे. पुणे महानगरपालिकेत दापोडी असताना तत्कालिन नगरसेविका मा.चंद्रकांता सोनकांबळे या पुणे महानगरपालिकेत पण नगरसदस्या होत्या. आणि इकडे निवडणूक लागली, त्या इकडे पण नगरसदस्या होत्या. त्यामुळे काही विषय नाही. पंचायत समिती असेल, तिथले आपले बंधू असतील त्यांना आपण चांगल्या प्रकारे समजून सांगू शकतो. मा.महापौर साहेब, या भागातला विकास करत असताना मी म्हणणार नाही की मला कोणीच मदत केली नाही. मी पहिले तुमचे

अभिनंदन करेन. अभिनंदन यासाठी करेन की, ज्या दिवशी दि.३१ मार्चनंतर बिले देणार नाही असे ठणकावून सांगितले, त्यावेळी सुद्धा वावड्या उठल्या होत्या, इतके टक्के घेतले, तितके टक्के घेतले. असे झाले, तसे झाले. यामधून जे पैसे उरले २०५ कोटी रुपये हा निधी आम्ही डि.पी. साठी वापरला. राष्ट्रवादीचे यात काय चूकले तर त्यांना असे डेडिकेटेड काम करायला जमले नाही. त्यांनी कधी फोकस ठेवून काम केले नाही. त्यामुळे मला टिका करण्याशिवाय पर्यायच नाही. निवडणूका जवळ आल्या आहेत. खासदारकी, आमदारकी जवळच आहे. त्यामुळे त्यांना असे वाटते, किती बोलू किती नाही. किती बोलू किती नाही. माझी पत्रकार बंधूंना विनंती आहे की, याचा सगळ्यांनी जाब विचारावा. विचारा ना. विनंती आहे. तुम्ही सगळे यात साथीदार आहात. तुम्ही घडवलयं. तुम्ही त्यांचं काय छापताय. तथ्य असेलतर शंभर टक्के छापा. आणि आमच्या तोंडाला काळं फासा. त्यांना विचारा की तुम्ही इतकी वर्ष काय केलत. तुम्हाला सत्ता दिली होती ना. इतकी वर्षे तुमची एकहाती सत्ता होती. याठिकाणी या महापालिकेच्या सोबत होते. बत्तीस वर्षे काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सत्ता उपभोगली. वीस वर्षांपूर्वी महापालिकेत ही गावे आली असतील तर विकास करायची कोणाची जबाबदारी होती, यांचीच होती ना. नाही केलं ना, मग यांना जाब का विचारला नाहीत. कारण लोकांमध्ये धाडसच नव्हते. मघाशी केबलचा विषय झाला. तो केबलचे विषयपत्र नीट वाचा. खुनशीने वागायचे ठरवले असते तर. मा.अजितदादा पवार यांनी तत्कालिन उपमुख्यमंत्री असताना एमएसईबीचा तो विषय मांडला होता. त्यांचा शब्द ऑनर केला. ऑनर केला. मी सुद्धा म्हणू शकले असते, महापालिकेचे यात नुकसान होतयं. विरोध कुणाला करायचा. आपली लायकी काय. ते किती उंचीचे आहेत, याचे भान आहे. जसा विषय मा.स्थायी समितीसमोर आला, तो तशाचा तसा विषय आम्ही तुमच्यापुढे फॉरवर्ड केला आहे. मघाशी केबल खोदाईच्या विषयात झालं. मा.महापौर साहेबांना माझी नम्र विनंती असेल की, ज्या-ज्या कुणाला वाटत असेल की यात घोटाळा काय झाले असेल, ते त्यांनी एकदाचे सांगून टाका. मघाशी राष्ट्रवादीचे एक नगरसदस्य बोलले की, डक्ट टाकायला पाहीजेत. मा.अजित गव्हाणे पण बोलले की, डक्ट टाकायला पाहीजे होते. मग तुम्हाला कोणी थांबवले होते. तुम्ही सत्तेत होता, तुम्ही डक्ट टाकलेत? आम्ही तर आत्ता आलो. नवीन गावांतील रस्त्यांत स्टॉर्म वॉटर लाईन घेतल्या आहेत, डक्ट टाकले आहेत, एच.टी.एम.एल. ची लाईन घेतलीय, अंडरग्राऊंड करायचं घेतलय, पाण्याची पाईपलाईन घेतली आहे, दोन्ही बाजूंनी रस्ता घेतलाय, डिव्हायडर घेतलाय. सगळेच घेतले आहे. सगळ्यांच ऍमिनिटीज ऍड केल्या आहेत. तुम्हाला कोणी थांबवले होते. तुम्ही तर सत्ताधारी होता. आज रस्ता करायच्या वेळी डक्ट परत खोदतो. २००७ ला नाना होते. नंतर ताई आल्या. आता ताई व नाना दोघेही आहेत. ते सुद्धा सत्तेत होते. मग तुम्ही का नाही केले. सत्तेत सहभागी असताना मी काय केले हे सांगण्यासारखे तुमच्याकडे नसेल तर आणि तरच तुम्हाला टिका करावीशी वाटते, या मताची मी आहे. मघाशी मा.रेखा दर्शिले यांनी सांगितले की, पुनावळे २० वर्षांपूर्वी महापालिकेत आलेतरी त्याचा अजून विचार झाला नाही. तिथे सुद्धा रस्ते करायला घेतलेच आहेत. मग तिथे विरोधी पक्षाचे नगरसेवक आहेत, मा.राहूल कलाटे, शिवसेना गटनेते तिथले नगरसेवक आहेत म्हणून तसे केले का. रस्ते घेतलेतच ना. मा.महापौर साहेब, हे सगळं सांगायचं तात्पर्य एवढच आहे की, गेले अनेक दिवसांपासून खरेतर खूप लोकांनी मला सांगितलं होत की, तुम्ही अजिबात बोलू नका. आणि मी खरेच बोलायचं नाही असेच ठरवले

होते. परंतू त्या रिंग रिंग ने माझ्या कानातली रिंग वाजायला लागली. त्या रिंगमुळे मला नको नको झाले होते. आता त्या रिंगाच आलेल्या आहेत. हातातल्या रिंगा आहेत, त्या हातात देते व माझे भाषण संपवते. एवढेच याठिकाणी सांगते. मा.महापौर साहेब, वैयक्तिकरित्या मी कोणावरही आरोप केलेले नाहीत. जे-जे या प्रकरणांमध्ये होते, त्या-त्या वेळच्या परिस्थितीनुसार जे-जे पुरावे समोर आले, त्यांचेच नाव याठिकाणी घेतलेले आहे. त्याच्यामुळे याउपर कोणी दुखावले गेले असेलतर मी तुमची दिलगीरी व्यक्त करते परंतू एकिकडे शहराचा विकास होत असताना त्या शहराच्या विकासाला पाठिंबा देण्याऐवजी आपण जर का असाच विरोध करत राहीलात तर मला असे वाटतेय की, काही दिवसांनी लोक सुद्धा तुम्हाला हसतील. जे काही सत्य असेल, त्या सत्याचा सुद्धा पाठपुरावा करा. आमची काय मदत लागलीतर, आम्ही नालायक असू तर नालायक निश्चित म्हणा. परंतू ते म्हणत असताना समोरच्याने काहीच केले नसेलतर त्याचा जाब समोरच्याला निश्चित विचारा. एवढेच सांगते, थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.एकनाथ पवार-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर मा.सिमाताई सावळे यांनी समाविष्ट गावांच्या विकासावरुन तासभर भाषण केले. गेले महिना दोन महिन्यांपासून राजकारण चालू आहे. त्यांनी सडेतोड उत्तर दिले. ताई ज्यावेळी भाषण करत होत्या, पोटतिडकीने आपले म्हणणे सांगायचा प्रयत्न करत होत्या. माझ्या अगोदर ज्या-ज्या व्यक्त्यांनी भाषण केले, सगळ्यांची भूमिका बघितली तर समाविष्ट गावे शहरात घेण्यासंदर्भात सगळ्यांची भूमिका खरोखर वेगवेगळ्या पद्धतीची होती. मा.दत्तात्रय साने यांनी सांगितले, गावे घेतली का नाही पाहीजेत. ब-याच वक्त्यांनी सांगितले. कारण गेल्या २० वर्षांत मग तो कुठल्या पक्षाचा नगरसेवक हे महत्वाचे नाही, गावांची दूरावस्था करायला हे लोक जबाबदार आहेत. गेल्या २० वर्षांत या गावांमध्ये कुठल्याही पद्धतीची कामे होत नाहीत. मला आठवतेय, गेले वीस वर्षांत मी गावांच्या विकासासाठी लढणारा कार्यकर्ता आहे. मागील वर्षी मी सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक झालो. पण महापौरांच्या प्रभागात पंधरा/वीस आंदोलने करणारा मी कार्यकर्ता आहे. ही वस्तुस्थिती आहे. लोक ज्या पद्धतीने या विषयाचे भांडवल करत आहेत. रोज दवंडी पिटवत आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी अगोदर बोलता-बोलता सांगितले. खोड्या करत आहेत. नंतर ताई सांगत होत्या. मला सुद्धा बरेच वेळा मनपा संदर्भातील अंदाज. त्या ३३ व्या सभापती आहेत. बोलता बोलता मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, मा.लक्ष्मणभाऊ जगताप, मा.महेशदादा लांडगे हे सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांना मा.अजितदादा पवार यांचा रिव्हर्ट होता म्हणून ते बाहेर पडले. हे मी सभागृहात सांगतो की, त्यांना काम करायचं स्वातंत्र्य असततर, ज्या पद्धतीने समाविष्ट गावांची दूरावस्था झाली, ती शंभर टक्के झाली नसती. हे खरं आहे. तुम्ही सांगत होता, तुम्हाला सुद्धा वाटतेय की, गावे घेताना दूरदर्शीपणे विचार केला पाहीजे. मला मनापासून समाधानही वाटतेय. ज्या पद्धतीने गेले तीन/चार तास सभागृहात विषय कोणत्याही पद्धतीचा असेल, रिंग संदर्भातील विषय ज्या पद्धतीने, खरेतर माझ्या बहिणींचे कौतुक करायला पाहीजे. माझ्या बो-हाडेताई असतील, अश्विनीताई असतील, विकास असेल, सुवर्णाताई आहेत. खरेतर या बिचा-यांना मनापासून तळमळ वाटतेय. ते आजही भोगताहेत. आपल्या भागात विकासासंदर्भात एकही काम

राष्ट्रवादीच्या मंडळींनी केलेले नाही. हालअपेष्टा सहन केल्या. मा.महेशदादा लांडगे यांच्या विरोधात मी विधानसभा लढलो. मा.महेशदादा लांडगे हे स्थायी समितीचे चेअरमन झाल्यानंतर त्यावेळच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी त्यांच्या ओळखीचे जे जे नगरसेवक असतील त्यांच्या प्रभागातली कामेच होऊ द्यायची नाहीत. तिथे निगेटीव्ह भूमिका घेतली. तुमच्या पक्षात राजकारण करुन एखाद्या गावाला विकासापासून वंचित करायचे पाप तुम्ही केले. हे लक्षात ठेवा. आम्हाला अभिमान आहे. या वेळच्या स्थायी समितीच्या माध्यमातून एकाच वेळेस ४२५ कोटींचे काम केले. चूकले कुठे, एकाच दिवशी ४२५ कोटींच्या निविदा मंजूर केल्या. यात चूक नाही. हे बघवतच नाही. पुढच्या वर्षभराच्या काळात ज्यावेळी ही मंडळी जातील. मा.राहूलदादा सांगत होते की, आमच्या वाकडसारखा विकास झाला पाहीजे. मा.महापौर साहेब, तुमच्या भागांत रस्ते झाले. मी अभिमानाने सांगेन की, दूसरे वाकड, दूसरे पिंपळे सौदागर, च-होलीच्या माध्यमातून आपल्याला या शहरात निर्माण करावे लागणार आहे. ज्या पद्धतीने एक-एक गोष्ट या सगळ्यांकडले दोन/चार दिवसांपूर्वी सहज म्हटले होते, यांची सगळी मंडळी आम्हाला मिळाली आहेत. सभागृहाच्या माध्यमातून मी एवढेच सांगेन. ताईंनी खरेतर पवना जलवाहिनीच्या संदर्भात सगळ्याच गोष्टी सांगितल्या. इथली सत्ता तुमची आहे. वरची सत्ता तुमची आहे. मी तुम्हाला सभागृहाच्या माध्यमातून आश्वस्त करतो, पवना जलवाहिनीचे शुद्ध पाणी शहरात आणण्यासाठी आपण प्रयत्न करतोय. शेतक-यांच्या प्रेमाचे पाणी आपण पिंपरी चिंचवडमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करतोय हे लक्षात ठेवा. मी पाण्यासंदर्भात बरेच वेळा सांगितले की, आमदार मा.महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून भामा-आसखेडचा मुद्दा अंतिम टप्प्यात आहे. खरेतर आम्ही सांगत नाही. गेल्या तीस पस्तीस वर्षांपासून ज्या शहराला लुटण्याचे काम केले. आलटून पालटून ज्या मंडळींनी केले, ज्या पक्षाने केले. आणि आज आपण हे झालं, ते झालं, भूंकण्याचे काम करतोय. या निमित्ताने माझी खरेतर सगळ्या विरोधी पक्षांच्या नेत्यांना विनंती आहे. आपल्याला हातात हात घालून विकास करायचा आहे. आम्हाला या सभागृहात सांगायच्या ऐवजी आपल्या पक्षाच्या नेत्यांना हे सांगितलं. ताई सांगत होत्या, डीएसआर, एसएसआरबद्दल कार्यशाळा घ्यायची का गरज होती. या सभागृहात खूप नगरसेवक नवीन आहेत. खरेतर चांगल्या गोष्टींची माहिती शिकायला, कोणालाच अडचण नाही. शिकायला तर पाहीजे. ट्रेनिंगशिवाय माणूस तयार होऊ शकत नाही. एखाद्या प्रशिक्षणासंदर्भातही तुम्ही चुकीचा अर्थ काढताय. मला वाटतेय, कोणीतरी महाभागाने सांगितले की, जागा ताब्यात नसताना टेंडर काढली. पेपर माझ्या समोर आहे. ९० टक्के जागा ताब्यात आहे. एकही जागा अशी नाही की, वर्कऑर्डर दिली आणि जागा ताब्यात नाही. खरेतर मा.राहूलदादा मी तुम्हाला एवढेच सांगेन की, वाकडच्या विषयात किती चूका होत्या. ज्यावेळी टेंडर काढले गेले, त्यावेळी ५५ टक्के जागा ताब्यात होती. चुकीच्या पद्धतीने महापालिकेच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला लूटायचे काम केले. एखाद्या गोष्टीचा आरोप करत असताना एकतर तुम्ही शंभर टक्के गुन्हा केला. असं म्हणतात ना, शिशूपालाचे शंभर पाप. तुम्ही तेवढे केले. तुम्ही त्याच्यापेक्षाही वाईट परिस्थिती केली आहे. देशात असेल, राज्यात असेल, महापालिकेच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टी विकासाचे काम करते आहे. तुमच्या निवडणूका संपल्या आहेत. खरेतर तुम्ही नेत्यांना बदनाम करायचे षडयंत्र थांबवा. ज्या विकासाच्या माध्यमातून आम्ही या शहराचा कायापालट करायचा प्रयत्न याठिकाणी करतोय. समाविष्ट गावांना यांनी एकही पैसा

दिला नाही. माझ्याकडे ही आकडेवारी आहे की, कुठल्या वर्षी किती निधी दिला आहे. मी हे आकडे काढलेतर तुम्हालाही वाईट वाटेल. तुम्ही म्हणताय, विकासाच्या दृष्टीने खूप काम दिले. माझ्याकडे दहा वर्षांची आकडेवारी आहे. २०१०-११ ला किती दिले, रु.१,४८,००,०००/-. त्यानंतरच्या वर्षात २०११ ला रु.४,१९,७२,५११/-. हे माझे पेपर नाहीत, महापालिकेचे आहेत. हिंजवडी आपल्याकडे आलेतर या शहराचे नाव जगात होईल. गहूंजे आपल्याकडे आलेतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडीयम तिथे आहे. या शहराचे नाव जगात होईल. मी स्थायी समितीच्या सभापती यांचे अभिनंदन करतो. त्यांनी शहराला एक दिशा दिली. ज्या पद्धतीने राष्ट्रवादीच्या नेते मंडळींनी केले. वीस वर्षांपासून विकासापासून दूर ठेवले. मला खात्री आहे, तुम्ही ज्या पद्धतीने खंत व्यक्त केली. तुम्ही लोकांकडे दूर्लक्ष केलेतर जनता तुम्हाला माफ करणार नाही. तुम्ही सांगितले की तुम्हा असाल किंवा नसाल. पुढील दहा नाहीतर पुढील पंचवीस वर्षे या महापालिकेवर भारतीय जनता पार्टीचीच सत्ता असणार आहे. तुमच्या मनात शंका निर्माण करुन घेऊ नका. आपल्याला खात्री आहे, पुढील पाच वर्षांत समाविष्ट गावे शहरात आल्यानंतरच्या काळात मा.योगेशभाई बहल तुम्ही चिंता करु नका. मा.योगेशभाई बहल यांना बोलवून दाखवा. स्वप्न दाखवायचे काम तुम्ही केले आहे. तुम्ही स्वप्न बघा. तुम्ही चिंताच करु नका. आम्ही स्वप्न दाखवतो व पूर्ण करतो. आम्ही लोकांना खोटे आश्वासन देत नाही. एवढेच सांगेन,तुम्ही चिंता नका करु.

**मा.महापौर** – विषयावर बोला. पक्षनेते, तुम्ही बोला. तुम्ही लक्ष देऊ नका. तुम्ही बोला.

**मा.एकनाथ पवार-**मा.महापौर साहेब,मला कोणाचे ऐकायची गरजही नाही. मी सभागृहाच्या माध्यमातून एवढेच सांगेन की, विकासात राजकारण चालत नाही. आम्ही सगळ्यांना बरोबर घेण्याचा प्रयत्न करतो. महापालिकेच्या कामाची सुरुवात होत असताना सगळ्या गटनेत्यांना बरोबर घेऊन करण्याचा प्रयत्न केला आहे. मा.सचिन चिखले आपण बसलो होतो ना. आपण तीन वेळा बसलो होतो. तर काही मंडळी विचार करायला लागली की, भाजपवाले आपल्याला घेऊन बसायला लागले, बोलायला लागले. तर आपली परिस्थिती काय होणार आहे. मी तुम्हाला अभिमानाने एवढेच सांगेन की, सगळे सदस्य आपल्या बरोबर आहेत. अभ्यास करण्यासाठी आहेत. पुढील काळात राहीलेली कामे असतील, मी पोटतिडकीने सांगतो, ताई तुमचा भाग स्वच्छ व्हावा असे मनापासून म्हणतोय. मी या सभागृहाच्या माध्यमातून एवढेच सांगेन की, पुढील काळात या शहराला विकास काय असतो ते दाखवून द्यायचे काम भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून निश्चितच करु. या शहराच्या विकासासाठी आपण जे जे काम करु. खरेतर सगळ्यांना विनंती आहे की, आरोप करताना पुढील काळात शहराला पुढे जायचे आहे. तुम्ही चांगल्या सूचना द्या. तुमच्या चांगल्या सूचनांचा विचार करुन त्याचा निश्चितच पुढील काळात विकासासाठी, पुढे जाण्यासाठी प्रयत्न करु. आमच्या भगिनी, स्थायी समिती अध्यक्षा मा.सिमाताई सावळे यांचे मनापासून अभिनंदन करतो. आपण शहर विकसित करण्यासाठी जे काम केले, विकास गंगा शहरापर्यंत पोहोचावी एवढेच सांगतो. हा विषय मंजूर करावा व पुढील विषय घ्यावा.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - १३३ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ** – १) मा.महापालिका आयुक्त यांचे नर/कावि/१५/१७/२०१८ दि.४/१/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्यास मा. महापालिका सभा ठराव क्र. ६३२ दिः-१०/०२/२०१५ अन्वये प्रदान केल्यानुसार वर नमूद ७ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव शासनास दिः-०३/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आला होता.

उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग पत्र क्र. पीसीसी – ३०१५/ प्र.क्र. ३८१/ नवि-२२, दिः- ०३/०६/२०१६ अन्वये महापालिकेस कळविण्यात आले आहे की, दिनांक ३१/३/२०१५ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरणाची (PMRDA) स्थापना झालेली आहे. या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिचवड महानगरपालिका हद्दीलगतची गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची आता आवश्यकता नाही.

तत्पुर्वी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिः- ०७/०५/२०१३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चाकण सह देहू, आळंदी, म्हाळुंगे, मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणे शक्य आहे काय? याबाबत अभ्यास करुन परिपुर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी शासनास सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सदर बैठकीचे निर्णयाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकात हद्दीत वरील नमूद गावे व इतर परिसराचा समावेश करणेबाबत पिंपरी चिंचवड मनपाचे सर्व पदाधिकारी यांची दि. ३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि पश्चिमेकडील ६ गावे समाविष्ट करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या उत्तरेकडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि पश्चिमेकडील ७ गावे- हिंजेवाडी, जांभे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे अशी एकूण १४ गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करून घेणेबाबातचा प्रस्ताव मा. महापालिका सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने ठराव क्र. ६३२ दिः-१०/०२/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे मनपा हद्दीत समाविष्ठ करण्यास मान्यता प्रदान केली. मा. महापालिका सभेच्या उक्त ठरावानुसार पिंपरी चिंचवड महानगरपलिकेने शासनास दि.०३/०६/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर केला होता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ७ गावे समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाने दि.०३/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये नामंजूर केल्यामुळे मनपामार्फत मा.विभागीय आयुक्त, पुणे यांना दि. ०७/०४/२०१७ रोजीचे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे, तसेच मनपा हद्दीच्या उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंट क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र आणि आळंदी नगरपरिषदेचे संपुर्ण क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश करण्याविषयी शासनास उचित अहवाल सादर करण्याविषयी विनंती देखील करण्यात आली आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावातील मनपा हद्दीचे पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे, तसेच मनपा हद्दीचे उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंटचे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी भौगोलिकदृष्ट्या संलग्नता असल्याने मनपात समाविष्ट होणे योग्य असून देहुगाव या तिर्थक्षेत्र परिसराचा व मनपा हद्दीचे पश्चिमेकडील ७ गावांचा नियोजनबध्द व सुनियोजित विकास होण्यासाठी आणि भागातील नागरीकांना देखील शहरी भागाच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे या भागाचा विकासाचा वेग पाहता गरजेचे आहे व मनपाचे प्रशासकीय यंत्रणेमार्फत हे शक्य होऊ शकेल. म्हणून पिंपरी चिंचवड मनपा हद्दीचे पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजेवाडी, माण, नेरे व सांगवडे ही ७ गावे व उत्तरेकडील इंद्रायणी नदीचे नैसर्गिक हद्दीपर्यंतचे विठ्ठलनगर, देहुगाव या गावांचे देहुरोड कॅन्टॉनमेंटचे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याबाबत शासनास पुनश्च नव्याने हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मौजे दिघी येथील स.नं. ६४ पर्यंत मनपाच्या हददीत ६० मी. रुंद पुणे – आळंदी पालखी मार्ग प्रस्तावीत आहे. सद्यस्थीतीत मनपाच्या हद्दीतील मौजे दिघी पासुन मौजे बोपखेल फाटा येथे जाण्यासाठी सुमारे ७ ते ८ मी. रुंदीचा रस्ता अस्तीत्वात आहे. सदरचा रस्ता रहदारीचा असल्यामुळे दररोज वाहतुकीच्या कोंडीचा नागरीकांना सामना करावा लागतो. सदरचे अंतर सुमारे २ किमी असुन या रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. मौजे दिघी स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंत उजव्याबाजुस VSNL चे क्षेत्र आहे. मौजे दिघी येथील स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंतच्या ६० मी. रस्ता रुंदीकरणासाठी VSNL ची जागा खाजगी वाटाघाटीने अथवा भूसंपादनाने मनपाच्या ताब्यात घेणेची आवश्यकता आहे. तसेच रस्त्याच्या डाव्याबाजुस संरक्षण विभागाची हद्द आहे. ६०.० मी. रस्ता रुंदीकामी संरक्षण विभागाचे हद्दीतील क्षेत्र देखील मनपाचे ताब्यात घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत VSNL चे रस्त्याने बाधीत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी अथवा खाजगी वाटाघाटीने संपादन करणेकामी व संरक्षण विभागाचे हद्दीतील ६० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्र मनपाच्या ताब्यात घेणेकामीचा प्रस्ताव संरक्षण विभागास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे हद्दीतील मौजे दिघी येथील स.नं. ६४ पर्यंत पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेची हद्द आहे. मौजे बोपखेल येथील स.नं. १३३, स.नं १३६ ते १४१ हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असुन VSNL (Tata Communication Ltd) चे मालकीचे आहेत. मौजे दिघी येथील स.नं. ४९ ते ६३ व ६५, ६७ हे VSNL (Tata Communication Ltd) यांचे मालकीचे असुन पिं चि मनपाच्या हद्दीत नाहीत. तसेच मौजे कळस येथील स.नं. ३४ ते ३९ व ४४ ते ५५ मधील VSNL (Tata Communication Ltd) यांचे मालकीचे क्षेत्र देखील पिपंरी चिंचवड मनपाच्या हद्दीत नाही. मौजे दिघी लगत मौजे कळसची शीव आहे. मौजे कळस हे पुणे महानगरपालिकेत सामविष्ट आहे. त्यामुळे दोन्ही मनपाच्या हद्दीमधुन दिघी व कळस येथील काही क्षेत्र सुटलेले आहे. मौजे दिघी स.नं. ६४ पासुन बोपखेल फाटा पर्यंत उजव्याबाजुस VSNL (Tata Communication) चे क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ठ करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी मौजे दिघी व कळस येथील पुणे आळंदी रस्त्या पासुन बोपखेल गावाकडे जाणा-या रस्त्याच्या उत्तरेकडील बाजुस असलेले VSNL (Tata Communication Ltd) चे क्षेत्र पिं. चि. मनपाच्या हद्दीत समाविष्ट करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक-१३४ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्वभाअक/३/कावि/६/२०१८ दि.५/१/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारीमुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र.रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१२/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र 'अ'**

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १२३२३ | |
| केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेतस्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ११६५६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९१६६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ५५०८ | एकुण बांधकाम पुर्ण- ८४७७ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९६९ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ६३५५ लाभार्थी | GOI+GOM=३८१.३० लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१२७.१० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५०८.४० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५२९० लाभार्थी | GOI+GOM=३१७.४० लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१०५.८० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४२३.२ लाख** | |

अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.साधना मळेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सारीका लांडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.पापु/मुख्य/१२७/२०१७ दि.१७/१२/२०१७

शेवाळेवाडी ग्रामपंचायत तर्फे सरपंच व इतर अर्जदार विरूध्द पुणे महानगरपालिका व इतर या अर्ज नं.३७/२०१६ प्रकरणी राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांचे समोर दि.१६/१२/२०१६ रोजी सुनावणी झाली. त्यावेळेस मा. राष्ट्रीय हरीत लवादाने, "शेवाळेवाडी ग्रामपंचायतीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १०,००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या दैनंदिन १० टॅकर ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणेकामी" आदेश दिले आहेत. या बाबतची कार्यवाही त्वरीत करणेची होती. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी – चिंचवड पासून फार लांब (सुमारे ३५ ते ४० कि.मी.) असलेने, दि.१९/१२/२०१६ पासून पुणे महानगरपालिकेच्या रामटेकडी येथील टॅंकर भरणा केंद्रातून सदरचे टॅंकर भरून शेवाळेवाडी येथे पाठविले जात होते. तथापि, साठवणूक क्षमता पुरेशी नसल्याने पाणीपुरवठा बंद करणेबाबत शेवाळेवाडी ग्रामपंचायतीने त्यांच्या दि.२१/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यास अनुसरून दि.२३/१२/२०१६ पासून महानगरपालिकेमार्फत शेवाळेवाडीला टॅंकरने पाणी देणे बंद होते. आता शेवाळेवाडी ग्रामपंचायतीने त्यांच्या दि.२३/११/२०१७ च्या पत्रान्वये कळविलेप्रमाणे दि.०८/१२/२०१७ पासून दैनंदिन टॅंकर सुरू केले आहेत. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने हद्दीबाहेरील कामासाठी तसेच त्याकामापोटी येणा-या खर्चासाठी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सदरबाबत कालावधी निश्चित नसल्याने तुर्तास एक वर्ष कालावधी गृहीत धरून (दि.०८/१२/२०१८ पर्यत) तसेच तातडीने कार्यवाही करणेची असलेने "जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे" या कामातून सदर काम करून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर कामास रक्कम रू.४०,००,०००/- ची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे आणि सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात याकामी रक्कम रू.१०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. शेवाळेवाडी हे गाव महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने उपर्निर्दिष्ट प्रस्तांवाना मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी राष्ट्रीय हरीत लवादाचे आदेशानुसार कार्यवाही करणेकामी, शेवाळेवाडी हे गाव महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने सदर ग्रामपंचायतीस १०,००० लि. क्षमतेच्या दैनंदिन कमाल १० ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणेच्या कामास व त्यापोटी NGT च्या आदेशानुसारच्या कालावधीपर्यंत येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच तुर्तास सदरचे काम "जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी

परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणे" या कामातून दि.१९/१२/२०१६ ते २२/१२/२०१६ या कालावधीत टाकलेल्या ३८ ट्रिप्सना कार्योतर मान्यता मिळणेकामी तसेच दि.०८/१२/२०१७ पासून सुरू करणेत आलेल्या ट्रिप्स व त्यापुढील एक वर्षासाठी शेवाळेवाडीस टँकरने पाणीपुरवठा करणेस व त्यापोटी येणा-या खर्च रक्कम रू.२९,००,०००/- ला मान्यता मिळणेकामी तसेच सदर कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम रू.४०,००,०००/- ला मान्यता मिळणेकामी आणि सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये याकामी रक्कम रू.१०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दी लगत देहू रोड कॅन्टोमेंटची हद्द आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र. १६ मधील विकास नगर, किवळे, मामुर्डी, साईनगर या भागाच्या हद्दी लगत देहू रोड कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमी आहे. विकास नगर मामुर्डी भागातील मनपा हद्दीतील रहिवाशी सदर स्मशान भूमीचा वापर करतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी सदर स्मशान भूमीचा वापर जादा प्रमाणात करीत असल्याने सदर स्मशान भूमीची दुरुस्ती महानगरपालिके मार्फत करणेबाबतचा ठराव महानगरपालिका सभा ठ.क्र. ७४१ विषय क्र. ११ दि.२५/०८/२०१५ रोजी सदस्याचे उपसूचनेव्दारे प्रस्तावास मंजूरी दिली आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी करण्याबाबत मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.३/१२/२०१५ रोजीचे प्रस्तावास मान्यता दिली आहे. सद्यस्थिती मनपाने सदर स्मशानभूमी मध्ये कोणतीही दुरुतीची कामे केलेली नाही.

कॅन्टोमेंट बोर्डाने तसेच नागरिकांच्या सहभागातून सदर स्मशानभूमीची दुरुस्ती व विकास चालू आहे.

तरी वरील विषयास अनुसरुन मा.महापालिका सभा ठराव क्र. ७४१ विषय क्र. ११ दि.२५/०८/२०१५ चे ठरावास अनुसरुन शितला नगर येथील कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमीत विदयुत/डीझेल दाहीनी बसविण्याचे व स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सारीका लांडगे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.संदीप वाघेरे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, शेवाळेवाडीला पाणी देण्याबद्दल ऑबजेक्शन नाही. हरित लवादाने ऑर्डर दिल्याप्रमाणे आपल्याला शेवाळेवाडीला पाणीपुरवठा करावा लागतो आहे. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेपासून ३५ ते ४० कि.मी. आहे. आपल्या कारखान्यादारीमुळे असेल, ड्रेनेजचे पाणी असेल, सुवेजचे पाणी असेल ते नदीत गेले आहे. ते पाणी पुढे पुणे महानगरपालिकेतून शेवाळेवाडीला गेले आहे. त्या माध्यमातून नदी प्रदूषित झाली आहे. आपण पाणी दूषित करायचे पाप केले आहे. त्या पापाचे फळ म्हणून ठिक आहे. उद्या दौंड, इंदापूर म्हणायला लागलेतर आपण कुठे कुठे पाणीपुरवठा करणार आहोत. सन २०१६-१७ मध्ये जेव्हा आपली केस चालली होती, त्या वेळी कायदा विभागाचे ॲड.सतिश पवार यांनी आपली काय बाजू मांडली. पर्यावरण विभागाचे श्री.संजय कुलकर्णी, ड्रेनेज विभाग हे कुठल्या प्रकारचे काम करत आहेत. आपण नदी सुधार प्रकल्प राबवला पाहीजे. पवना, इंद्रायणी दोन्ही नद्या, मुळा नदीचा २८.५ कि.मी.चा काठ आपल्याला लाभलेला आहे. मला सांगा, या विषयावर आत्तापर्यंत काय घडले आहे. कायदा विभागाचे ॲड.सतिश पवार यांना विचारले होते. त्यांना इथे बोलवा. दरवेळी जी.बी. असते, तेव्हा ते गैरहजर असतात. त्यांनी आपली बाजू मांडावी.

**मा.सतिश पवार (प्र.कायदा सल्लागार)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज शेवाळेवाडी ग्रामपंचायतीमार्फत हरीत लवादाकडे ॲप्लिकेशन दाखल झाले होते. त्यात आपण महापालिकेतर्फे हजर होऊन आपली बाजू मांडली आहे. यात पुणे महापालिका पार्टी आहे. एमपीसीबी पार्टी आहे. इरिगेशन व कलेक्टर हे पार्टी आहेत. दि.११ जानेवारी २०१७ रोजी कोर्टाने इंटरीम ऑर्डर दिलेली आहे. दूषित पाणी मिळू नये म्हणून पुणे महापालिकेने २० टँकर्स, पिंपरी चिंचवड महापालिकेने १० टँकर्स द्यावेत असे म्हटले आहे. सब ज्युडीशियरी मॅटर आहे म्हणून त्याच्यावर चर्चा करता येणार नाही.

**मा.संदीप वाघेरे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, आम्ही म्हणत नाही की आम्हाला त्याच्यावर चर्चा करायची आहे. आमचं म्हणणं एकच आहे, आम्ही हरीत लवाद मानतो. आम्हाला त्यातले थोडेफार नॉलेज आहे. असं नाही की आम्ही आजच आलो आणि चालू झालं. आमचं एकच म्हणणं आहे की, जर हा नदी सुधार प्रकल्प राबवला असता तर, आजपर्यंत आपण नदीवर किती खर्च केला आहे. आज पर्यावरण विभागाचे कुलकर्णी साहेब आहेत. ड्रेनेज विभागाचे, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी असतील, यांनी आजपर्यंत नदीबद्दल काय केले आहे. यांनी आजपर्यंत फक्त कागदी घोडे नाचवले आहेत. आज आपल्याला २४.५ कि.मी. पवना नदी आहे, मुळा नदी आहे, इंद्रायणी नदी आहे. आपल्या इंडस्ट्रीमुळे, राहणा-या लोकांमुळे नदी प्रदूषित झाली आहे. आजपर्यंत आपण किती खर्च केला आहे. आपले किती एसटीपी प्लँट फेल गेले आहेत. तुमचे प्रपोजल काय आहे. पर्यावरण विभाग श्री.कुलकर्णी साहेब व कायदा विभागाचे श्री.पवार साहेब यांनी याची माहिती द्यावी की, यात तुम्ही काय करु शकता एवढे सांगावे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक-१३५ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.पापु/मुख्य/१२७/२०१७ दि.१७/१२/२०१७

शेवाळेवाडी ग्रामपंचायत तर्फे सरपंच व इतर अर्जदार विरूध्द पुणे महानगरपालिका व इतर या अर्ज नं.३७/२०१६ प्रकरणी राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांचे समोर दि.१६/१२/२०१६ रोजी सुनावणी झाली. त्यावेळेस मा. राष्ट्रीय हरीत लवादाने, "शेवाळेवाडी ग्रामपंचायतीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १०,००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या दैनंदिन १० टॅकर ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणेकामी" आदेश दिले आहेत. या बाबतची कार्यवाही त्वरीत करणेची होती. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी – चिंचवड पासून फार लांब (सुमारे ३५ ते ४० कि.मी.) असलेने, दि.१९/१२/२०१६ पासून पुणे महानगरपालिकेच्या रामटेकडी येथील टॅंकर भरणा केंद्रातून सदरचे टॅंकर भरून शेवाळेवाडी येथे पाठविले जात होते. तथापि, साठवणूक क्षमता पुरेशी नसल्याने पाणीपुरवठा बंद करणेबाबत शेवाळेवाडी ग्रामपंचायतीने त्यांच्या दि.२१/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यास अनुसरून दि.२३/१२/२०१६ पासून महानगरपालिकेमार्फत शेवाळेवाडीला टॅंकरने पाणी देणे बंद होते. आता शेवाळेवाडी ग्रामपंचायतीने त्यांच्या दि.२३/११/२०१७ च्या पत्रान्वये कळविलेप्रमाणे दि.०८/१२/२०१७ पासून दैनंदिन टॅंकर सुरू केले आहेत. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने हद्दीबाहेरील कामासाठी तसेच त्याकामापोटी येणा-या खर्चासाठी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सदरबाबत कालावधी निश्चित नसल्याने तुर्तास एक वर्ष कालावधी गृहीत धरून (दि.०८/१२/२०१८ पर्यत) तसेच तातडीने कार्यवाही करणेची असलेने "जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे" या कामातून सदर काम करून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर कामास रक्कम रू.४०,००,०००/- ची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे आणि सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात याकामी रक्कम रू.१०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. शेवाळेवाडी हे गाव महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने उपर्निर्दिष्ट प्रस्तांवाना मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी राष्ट्रीय हरीत लवादाचे आदेशानुसार कार्यवाही करणेकामी, शेवाळेवाडी हे गाव महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने सदर ग्रामपंचायतीस १०,००० लि. क्षमतेच्या दैनंदिन कमाल १० ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणेच्या कामास व त्यापोटी NGT च्या आदेशानुसारच्या कालावधीपर्यंत

येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच तुर्तास सदरचे काम “जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणे” या कामातून दि.१९/१२/२०१६ ते २२/१२/२०१६ या कालावधीत टाकलेल्या ३८ ट्रिप्सना कार्योतर मान्यता मिळणेकामी तसेच दि.०८/१२/२०१७ पासून सुरू करणेत आलेल्या ट्रिप्स व त्यापुढील एक वर्षासाठी शेवाळेवाडीस टँकरने पाणीपुरवठा करणेस व त्यापोटी येणा-या खर्च रक्कम रू.२९,००,०००/- ला मान्यता मिळणेकामी तसेच सदर कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम रू.४०,००,०००/- ला मान्यता मिळणेकामी आणि सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये याकामी रक्कम रू.१०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दी लगत देहू रोड कॅन्टोमेंटची हद्द आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.१६ मधील विकास नगर, किवळे, मामुर्डी, साईनगर या भागाच्या हद्दी लगत देहू रोड कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमी आहे. विकास नगर मामुर्डी भागातील मनपा हद्दीतील रहिवाशी सदर स्मशान भूमीचा वापर करतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी सदर स्मशान भूमीचा वापर जादा प्रमाणात करीत असल्याने सदर स्मशान भूमीची दुरुस्ती महानगरपालिके मार्फत करणेबाबतचा ठराव महानगरपालिका सभा ठ.क्र. ७४१ विषय क्र. ११ दि.२५/०८/२०१५ रोजी सदस्याचे उपसूचनेव्दारे प्रस्तावास मंजूरी दिली आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी करण्याबाबत मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.३/१२/२०१५ रोजीचे प्रस्तावास मान्यता दिली आहे. सद्यस्थिती मनपाने सदर स्मशानभूमी मध्ये कोणतीही दुरुतीची कामे केलेली नाही.

कॅन्टोमेंट बोर्डाने तसेच नागरिकांच्या सहभागातून सदर स्मशानभूमीची दुरुस्ती व विकास चालू आहे.

तरी वरील विषयास अनुसरुन मा.महापालिका सभा ठराव क्र. ७४१ विषय क्र. ११ दि.२५/०८/२०१५ चे ठरावास अनुसरुन शितला नगर येथील कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमीत विदयुत/डीझेल दाहीनी बसविण्याचे व स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक – ०५/२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था.उ./कावि/१७९/२०१८ दि.९/१/२०१८

मनपाचे अंदाजपत्रकात सन २०१७-१८ मध्ये खालील नमूद कामाचा समावेश नसल्याने या कामांची निविदा कार्यवाही प्राधान्याने करणे करीता प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच या कामाचा सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात समावेश करणेत येत आहे. सदरचे काम एकूण तीन टप्प्यात करण्याचे नियोजन आहे. चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिर परिसरात ध्वनी आणि प्रकाश (Light and Sound Show) यावर आधारित संकल्पना विकसित करणे या कामासाठी वास्तुविशारद म्हणून मे.आर्चओम कन्सल्टंट यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.१७४५ दि. २०/१२/२०१७ अन्वये नेमणूक करण्यात आलेली आहे. तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरचे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|
| १ | चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिर परिसरात ध्वनी आणि प्रकाश (Light and Sound Show) यावर आधारित संकल्पना विकसित करणे | ९,००,००,०००/- |

तरी उपरोक्त नमूद कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुरेश भोईर –** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

प्रभाग क्र.१४ निगडी टिळक येथील लोकमान्य टिळक पुतळ्याच्या परिसराचे सुशोभिकरण करणे या कामाचा म.न.पा.च्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश आहे. तरी सद्यस्थितीतील चौकाचा झालेला विकास लक्षात घेता सदर ठिकाणचा ३० वर्षापुर्वीचा अर्धाकृती पुतळा खराब झालेला आहे. तरी सदर पुतळा नव्याने शिल्पकाराकडून तयार करणेस व बसविण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच या परिसराचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१७-१८ च्या मुळ अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना

लेखाशिर्षातंर्गत स्थापत्य 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत खालील नमुद केलेल्या दोन (२) कॉंक्रिटीकरण कामाचा समावेश आहे.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील पान क्र./अ.क्र. | कामाचे नाव | सन २०१७-१८ ची अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|---|
| १ | ६९/२१६ | प्रभाग क्र. १६ मध्ये खंडोबामाळ चौक ते म्हाळसाकांत चौक पर्यंत पालखी मार्गाचे कॉंक्रीटीकरण करणे. (नविन प्रभाग क्र. १५) | १०००००००००/- |
| २ | ६९/२१९ | प्राधिकरण स्पाईन रोड वरील अग्रसेन महाराज चौक ते बिजलीनगर पुलापर्यंत मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.(मधील दोन लेनचे कॉंक्रीटीकरण करणे) (नविन प्रभाग क्र. १५) | ३०००००००००/- |

सदर कामाचे संबंधित सल्लागारांमार्फत तपशिलवार अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेचे काम चालु आहे. तथापि, त्यांनी दिलेल्या दि. ११/०१/२०१८ चे पत्रानुसार, मनपाचे सद्यस्थितीत अंदाजपत्रकासाठी वापरणेत येणारी सा.बां विभाग (PWD) यांचेकडील दरसुची (SSR) व १२% जीएसटी मुळे अंदजापत्रकीय रकमेत वाढ होत आहे. मुळ अंदाजपत्रकात प्रशासकीय मान्यता रक्कम कमी पडत असलेने नव्याने प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार खालील तक्यात नव्याने नमुद केलेनुसार प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील पान क्र./अ.क्र. | कामाचे नाव | सन २०१७-१८ अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|---|
| १ | ६९/२१६ | प्रभाग क्र. १६ मध्ये खंडोबामाळ चौक ते म्हाळसाकांत चौक पर्यंत पालखी मार्गाचे कॉंक्रीटीकरण करणे. | १५००००००००/- |
| २ | ६९/२१९ | प्राधिकरण स्पाईन रोड वरील अग्रसेन महाराज चौक ते बिजलीनगर पुलापर्यंत मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.(मधील दोन लेनचे कॉंक्रीटीकरण करणे) | ४०००००००००/- |

तसेच मनपाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मा.मनपा सभेची नुक्तीच मान्यता मिळालेली आहे. मा. मनपा सभेमार्फत अंदाजपत्रकास मंजुरी देताना भांडवली व महसुली कामांचे नमुद असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता देणेत येते. सदर अंदाजपत्रकामध्ये ब क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील महसुली कामांसाठी अंदाजपत्रक पुस्तकामध्ये अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्या मध्ये नजर चुकीने मुद्रांक दोष शुन्य रक्कम छापुन आलेली आहे. सदर मुद्रांक दोष दुरूस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु क्र. | पानांक | कामाचा अ.क्र. | लेखाशीर्ष/ कामाचे नाव | वॉर्ड क्र | कामाची अंदाजपत्रकीय र | सन २०१६-१७ चा सुधारीत अंदाज | सन २०१७-१८ चा मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७०३ | २५ | प्रभाग क्र.१७ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | १७ | ३७५०००० | ० | २५००००० |
| २ | | २६ | प्रभाग क्र.१८ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | १८ | ३७५०००० | ० | २५००००० |
| ३ | | २७ | प्रभाग क्र.१९ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | १९ | ३७५०००० | ० | २५००००० |
| ४ | | २८ | प्रभाग क्र.२३ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | २३ | ३७५०००० | ० | २५००००० |
| ५ | | २९ | प्रभाग क्र.२४मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | २४ | ३७५०००० | ० | २५००००० |
| ६ | | ३० | प्रभाग क्र.२५ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे | २५ | ३७५०००० | ० | २५००००० |
| ७ | | ३१ | ब प्रभागा अंतर्गत खड्डे, ट्रेंचेस कोल्ड मिक्स पध्दतीने भरणे. | स.सा | २७००००० | ० | १८००००० |
| ८ | ७०४ | २० | प्रभाग क्र.१७ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | १७ | ९००००० | ० | ६००००० |
| ९ | | २१ | प्रभाग क्र.१८ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | १८ | ९००००० | ० | ६००००० |
| १० | | २२ | प्रभाग क्र.१९ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | १९ | ९००००० | ० | ६००००० |
| ११ | | २३ | प्रभाग क्र.२३ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | २३ | ७५०००० | ० | ५००००० |
| १२ | | २४ | प्रभाग क्र.२४ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | २४ | ७५०००० | ० | ५००००० |
| १३ | | २५ | प्रभाग क्र.२५ मधील रस्त्यांची दुरुस्ती कोल्ड पध्दतीने करणे | २५ | ७५०००० | ० | ५००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | | २६ | प्रभाग क्र.१७ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | १७ | ७५०००० | ० | ५००००० |
| १५ | | २७ | प्रभाग क्र.१८ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | १८ | ७५०००० | ० | ५००००० |
| १६ | | २८ | प्रभाग क्र.१९ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | १९ | ७५०००० | ० | ५००००० |
| १७ | | २९ | प्रभाग क्र.२३ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | २३ | ७५०००० | ० | ५००००० |
| १८ | | ३० | प्रभाग क्र.२४ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | २४ | ७५०००० | ० | ५००००० |
| १९ | | ३१ | प्रभाग क्र.२५ मधील खड्डे, ट्रेचेस, खडीमुरुम पध्दतीने भरणे. | २५ | ७५०००० | ० | ५००००० |
| २० | | ४८ | प्रभाग क्र.१७ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे | १७ | ३०००००० | ० | २०००००० |
| २१ | ७०७ | ४९ | प्रभाग क्र.१८ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे | १८ | ६०००००० | ० | ४०००००० |
| २२ | | ५० | प्रभाग क्र.१९ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे | १९ | ३०००००० | ० | २०००००० |
| २३ | | ५१ | प्रभाग क्र.२३ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे | २३ | ३०००००० | ० | २०००००० |
| २४ | | ५२ | प्रभाग क्र.२४ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे | २४ | ३०००००० | ० | २०००००० |
| २५ | | ५३ | प्रभागक्र.२५ मधील मनपा महापा लिका इमारतीची दुरुस्ती करणे | २५ | ३०००००० | ० | २०००००० |
| २६ | ७०७ | ५४ | प्रभाग क्र.१८ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतींची दुरुस्ती करणे. | १८ | ३०००००० | ० | २०००००० |
| २७ | | ५५ | प्रभाग क्र.२३ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतींची दुरुस्ती करणे. | २३ | ३०००००० | ० | २०००००० |
| २८ | | ५६ | प्रभाग क्र.२४ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतींची दुरुस्ती करणे. | २४ | ३०००००० | ० | २०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | | ५७ | प्रभाग क्र.२५ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतींची दुरुस्ती करणे. | २५ | ३०००००० | ० | २०००००० |
| ३० | | ५८ | प्रभाग क्र.१७ मधील फुटपाथ, डिव्हायडर, स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | १७ | ५४००००० | ० | ३६००००० |
| ३१ | | ५९ | प्रभाग क्र.१८ मधील फुटपाथ, डिव्हायडर, स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | १८ | ५४००००० | ० | ३६००००० |
| ३२ | | ६० | प्रभाग क्र.१९ मधील फुटपाथ, डिव्हायडर, स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | १९ | ५४००००० | ० | ३६००००० |
| ३३ | | ६१ | प्रभाग क्र.२३ मधील फुटपाथ, डिव्हायडर,स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २३ | ५६१०००० | ० | ३७४०००० |
| ३४ | | ६२ | प्रभागक्र.२४ मधील फुटपाथ, डिव्हायडर,स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांचीदुरुस्ती करणे. | २४ | ६०००००० | ० | ४०००००० |
| ३५ | | ६३ | प्रभाग क्र.२५ मधील फुटपाथ, डिव्हायडर, स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २५ | ६०००००० | ० | ४०००००० |
| ३६ | | ६४ | प्रभाग क्र.२५ मधील वाकड भागातील फुटपाथ, डिव्हायडर,स्टॉर्म वॉटर, पेव्हींग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २५ | २७००००० | ० | १८००००० |
| ३७ | | ६५ | प्रभाग क्र.२५ मधील ताथवडे पुनावळे भागातील फुटपाथ, डिव्हायडर, स्टॉर्म वॉटर, पेव्हींगब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २५ | २७००००० | ० | १८००००० |
| ३८ | | ६६ | प्रभाग क्र.१८ मधील श्रीमान महासाधु मोरया गोसावी संजीवन समाधी उत्सवासाठी मंडप व्यवस्था करणे. | १८ | २७००००० | ० | १८००००० |
| ३९ | | ६७ | ब प्रभागा अंतर्गत गणपती विसर्जन सोहळ्यासाठी मंडप व्यवस्था करणे. | स.सा | १५००००० | ० | १०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | ७०८ | ६८ | रामकृष्णमोरे प्रेक्षागृह येथे मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे. | १९ | १५०००० | ० | १०००००० |
| ४१ | | ६९ | ब प्रभागातील रुग्णालयांची दुरुस्ती करणे. | स.सा | ३७५०००० | ० | २५००००० |
| ४२ | ७१२ | १०१ | प्रभागक्र. १७ मधील राडारोडा उचलने कामी वाहन व्यव्स्था करणे. | १७ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ४३ | | १०२ | प्रभाग क्र. १७ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | १७ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ४४ | | १०३ | प्रभाग क्र. १७ मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे. | १७ | १०००००० | ० | ७००००० |
| ४५ | | १०४ | प्रभाग क्र. १७ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | १७ | १०००००० | ० | ७००००० |
| ४६ | | १०५ | प्रभाग क्र. १७ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | १७ | १०००००० | ० | ७००००० |
| ४७ | | १०६ | प्रभाग क्र. १७ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | १७ | १०००००० | ० | ७००००० |
| ४८ | | १०७ | प्रभाग क्र. १८ मधील राडारोडा उचलनेकामी वाहन व्यव्स्था करणे. | १८ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ४९ | | १०८ | प्रभाग क्र. १८ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | १८ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ५० | ७१२ | १०९ | प्रभाग क्र. १८ मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे. | १८ | १०००००० | ० | ७००००० |
| ५१ | | ११० | प्रभाग क्र. १८ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | १८ | १०००००० | ० | ७००००० |
| ५२ | | १११ | प्रभाग क्र. १८ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | १८ | १०००००० | ० | ७००००० |
| ५३ | | ११२ | प्रभाग क्र. १८ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | १८ | १०००००० | ० | ७००००० |
| ५४ | | ११३ | प्रभाग क्र. १९मधील राडारोडा उचलनेकामी वाहन व्यव्स्था करणे. | १९ | ९९०००० | ० | ६६०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५५ | | ११४ | प्रभाग क्र. १९मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | १९ | ९६०००० | ० | ६४०००० |
| ५६ | ७१३ | ११५ | प्रभाग क्र. १९ मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे. | १९ | १०००००० | ० | ७००००० |
| ५७ | | ११६ | प्रभाग क्र. १९ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | १९ | १०००००० | ० | ७००००० |
| ५८ | | ११७ | प्रभाग क्र. १९ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | १९ | १०००००० | ० | ७००००० |
| ५९ | | ११८ | प्रभाग क्र. १९ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | १९ | १०००००० | ० | ७००००० |
| ६० | | ११९ | प्रभाग क्र. २३ मधील राडारोडा उचलनेकामी वाहन व्यव्स्था करणे. | २३ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ६१ | | १२० | प्रभाग क्र. २३ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | २३ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ६२ | | १२१ | प्रभाग क्र. २३मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडपव्यवस्था करणे. | २३ | १०००००० | ० | ७००००० |
| ६३ | | १२२ | प्रभाग क्र. २३ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | २३ | १०००००० | ० | ७००००० |
| ६४ | | १२३ | प्रभाग क्र. २३ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | २३ | १०००००० | ० | ७००००० |
| ६५ | | १२४ | प्रभाग क्र. २३ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | २३ | १०००००० | ० | ७००००० |
| ६६ | | १२५ | प्रभाग क्र. २४ मधील राडारोडा उचलनेकामी वाहन व्यव्स्था करणे. | २४ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ६७ | | १२६ | प्रभाग क्र. २४ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |
| ६८ | | १२७ | प्रभाग क्र. २४मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडपव्यवस्था करणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |
| ६९ | | १२८ | प्रभाग क्र. २४ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७० | | १२९ | प्रभाग क्र. २४ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |
| ७१ | | १३० | प्रभाग क्र. २४ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |
| ७२ | | १३१ | प्रभाग क्र. २५मधील राडारोडा उचलनेकामी वाहन व्यवस्था करणे. | २५ | ९९०००० | ० | ६६०००० |
| ७३ | | १३२ | प्रभाग क्र. २५ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |
| ७४ | | १३३ | प्रभाग क्र. २५मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडपव्यवस्था करणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |
| ७५ | | १३४ | प्रभाग क्र. २५ मध्ये वाहतुक विषयक कामे करणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |
| ७६ | | १३५ | प्रभाग क्र. २५ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |
| ७७ | | १३६ | प्रभाग क्र. २५ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरुस्ती करणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |
| ७८ | | १३७ | प्रभाग क्र.१७ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | १७ | १०००००० | ० | ७००००० |
| ७९ | | १३८ | प्रभाग क्र.१८ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | १८ | १०००००० | ० | ७००००० |
| ८० | | १३९ | प्रभाग क्र.१९ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | १९ | १०००००० | ० | ७००००० |
| ८१ | | १४० | प्रभाग क्र.२३ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | २३ | १०००००० | ० | ७००००० |
| ८२ | ७१३ | १४१ | प्रभाग क्र.२४ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | २४ | १०००००० | ० | ७००००० |
| ८३ | ७१४ | १४२ | प्रभाग क्र.२५ मध्ये खड्डे, ट्रेचेस, जी.एस.बी. व्हेट मिक्स पध्दतीने बुजविणे. | २५ | १०००००० | ० | ७००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **८४** | | **१४३** | प्रभाग क्र. १७ मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | १७ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **८५** | | **१४४** | प्रभाग क्र. १८ मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | १८ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **८६** | | **१४५** | प्रभाग क्र. १९मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | १९ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **८७** | | **१४६** | प्रभाग क्र. २३मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | २३ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **८८** | | **१४७** | प्रभाग क्र. २४ मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | २४ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **८९** | | **१४८** | प्रभाग क्र. २५ मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | २५ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **९०** | | **१४९** | प्रभाग क्र. १७ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | १७ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **९१** | | **१५०** | प्रभाग क्र. १८ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | १८ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **९२** | | **१५१** | प्रभाग क्र. १९ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | १९ | ९९०००० | ० | ६६०००० |
| **९३** | | **१५२** | प्रभाग क्र. २३ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | २३ | ९९०००० | ० | ६६०००० |
